




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार ९ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# आसाम, पुदुचेरी आणि केरळमध्ये आज मतदान






**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आसामच्या १२६, केरळच्या १४० आणि पुदुचेरीच्या ३० जागांसाठी आज गुरुवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे तर तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांत मतदान होईल.या महिन्याच्या अखेरीस पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्येही विधानसभा निवडणुका होणार आहेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी बुधवारी भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून २०२६ च्या राज्य विधानसभा निवडणुकीसाठी सर्वेक्षण इमारतीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

बॅनर्जी भवानीपूर मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत, जिथे त्यांची पुन्हा एकदा भाजप नेते आणि पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांच्याशी लढत होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि राहुल गांधी व प्रियंका गांधी वाड्रा यांच्यासारख्या काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांसह प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी मंगळवारी निवडणूक होणा-या राज्यांमध्ये शेवटच्या क्षणाचा प्रचार केला होता. आसामच्या १२६, केरळच्या १४० आणि पुदुचेरीच्या ३० जागांसाठी गुरुवारी (९ एप्रिल) एकाच टप्प्यात मतदानाला सुरुवात होईल. तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांत मतदान होईल. सर्व विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर केले जातील. २०२१ च्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) ७५ जागा जिंकून सत्ता कायम राखली, आणि राज्यात काँग्रेसव्यतिरिक्तइतर आघाडीने सलग दोन वेळा विजय मिळवण्याची ही पहिलीच वेळ ठरली. केरळमध्येही ९ एप्रिल रोजी सर्व १४० जागांसाठी मतदान होणार आहे. गेल्या दशकापासून केरळमध्ये सीपीआय(एम)च्या नेतृत्वाखालील एलडीएफचे सरकार आहे. २०२१ च्या निवडणुकीत, एलडीएफने ९९ जागा जिंकून सत्ता कायम राखली आणि १९७७ नंतर सलग दोन वेळा सत्ता जिंकणारे ते पहिलेच सरकार ठरले. तामिळनाडूमध्ये सर्व २३४ जागांसाठी २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. २०२१ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत डीएमके-काँग्रेस युती सत्तेवर आली आणि एम. के . स्टॅलिन मुख्यमंत्री झाले. मात्र, सर्वाधिक लक्ष वेधून घेणारी लढत पश्चिम बंगालमध्ये आहे, जिथे भाजप सत्ताधारी तृणमूल काँग्रेसविरुद्ध लढत आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस २०११ पासून पश्चिम बंगालमध्ये सत्तेत आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) २१३ जागा जिंकून विजय मिळवला, तर भाजप ७७ जागांसह प्रमुख विरोधी पक्ष म्हणून उदयास आला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी देवघरमधील बाबा बैद्यनाथ धाम मंदिरात प्रार्थना केली. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री (पान २ वर)




## बुलढाणा हादरले!

# शिक्षकाचा तिसरीतील विद्यार्थीनीवर अत्याचार





**बुलढाणा/प्रतिनिधी :** माणुसकीला आणि पवित्र गुरु-शिष्य परंपरेला काळिमा फासणारी एक अत्यंत घृणास्पद घटना बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील लोणी गवळी गावात घडली आहे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एका ५८ वर्षीय नराधम शिक्षकाने केवळ ९ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेची माहिती मिळताच संपूर्ण गाव संतप्त होउन शाळेवर चालून गेले, ज्यामुळे परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने लोणी गवळी गावात धाव घेउन परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. गावक-यांनी संताप व्यक्त करत या शिक्षकाला पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. पोलिसांनी आरोपी शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोक्सो – POCSO) गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

शाळेतील इतर विद्यार्थ्यांशीही अशा प्रकारचे वर्तन झाले आहे का, याचा शोध पोलीस सध्या घेत आहेत. माहितीनुसार, लोणी गवळी येथील प्राथमिक शाळेत तिसरीत शिकणारी नउ वर्षीय विद्यार्थिनी आज सकाळी नेहमीप्रमाणे शाळेत गेली होती. सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास, जेव्हा शाळा भरलेली होती, त्याच वेळी महादेव आत्माराम मानतोडे (वय ५८ वर्षे) या शिक्षकाने या चिमुकलीसोबत लज्जास्पद आणि अमानवी कृत्य केले. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या एका ज्येष्ठ शिक्षकाने आपल्या नातीच्या वयाच्या मुलीसोबत केलेले हे कृत्य ऐकून संपूर्ण जिल्हा हादरला आहे.शाळेत घडलेल्या या घटनेनंतर ग्रामस्थांनी शिक्षकाला दिलेल्या चोपानंतर परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. पोलिसांनी मोठ्या शिताफीने आणि मध्यस्थीने आक्रमक गावक-यांची समजूत काढली आणि आरोपीला जमावाच्या तावडीतून सोडवून डोनगावमार्गे सुरक्षितरीत्या पोलीस स्थानकात आणले. मात्र, हा संताप केवळ शाळेपुरता मर्यादित राहिला नाही. सध्या जानेफळ पोलीस स्थानकाच्या परिसरात शेकडो नागरिकांनी धाव घेतली असून, तिथे प्रचंड गर्दी जमली आहे. आरोपीवर कठोरतम कारवाई झाल्याशिवाय मागे हटणार नाही, असा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.सद्यस्थितीत पोलीस प्रशासनाकडून पीडित मुलीचा जबाब नोंदवून घेणे आणि आरोपीविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (पोक्सो) कडक कलमान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलीस स्थानकाच्या बाहेर कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## सेवानिवृत्तीला दीड महिना शिल्लक असताना कृत्य

विशेष आणि अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, आरोपी शिक्षक महादेव आत्माराम मानतोडे हा येत्या ३१ मे रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणार होता. आपल्या दीर्घ सेवाकाळाचा सन्मानपूर्वक समारोप करण्याऐवजी, निवृत्तीला अवघा दीड महिना शिल्लक असताना त्याने हे पाशवी कृत्य करून संपूर्ण शिक्षक समाजाची मान शरमेने खाली घातली आहे. वयोवृद्ध असूनही या नराधमाच्या विकृत मानसिकतेने एका चिमुकलीचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केल्याने परिसरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पवित्र शैक्षणिक क्षेत्राला आणि गुरु-शिष्य परंपरेला अत्यंत लज्जास्पद ठरेल अशा घटनेने बुलढाणा जिल्ह्याचे लोणी गवळी गाव हादरले आहे. वयाच्या ५८ व्या वर्षी, जेव्हा एखादी व्यक्ती सामाजिक आदरास पात्र असते, अशा वेळी एका नराधम शिक्षकाने आपल्या नातीच्या वयाच्या विद्यार्थिनीसोबत घृणास्पद कृत्य केले. या घटनेनंतर निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली असून, अखेर आरोपीला पोलीस कोठडीत धाडण्यात आले आहे.




# इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद केली

- लेबनॉनवर इस्रायली हल्ल्यात ८९ मृत्यूनंतर निर्णय
- ट्रम्प म्हणाले- सीजफायरमध्ये हिज्बुल्लाहचा समावेश नाही

**तेल अवीव/तेहरान/वाशिंग्टन डीसी/वृत्तसंस्था :** बुधवारी इस्रायलने लेबनॉनची राजधानी असलेल्या बेरूतमध्ये हवाई हल्ला केला. या हल्ल्यात ८९ लोकांचा मृत्यू झाला, तर ८०० हून अधिक लोक जखमी झाले. ही माहिती लेबनानच्या आरोग्य मंत्रालयाने दिली. 'एपी' (AP) या वृत्तसंस्थेनुसार, या हल्ल्यानंतर इराणने पुन्हा एकदा 'हार्मुझची सामुद्रधुनी' (Strait of Hormuz) बंद केली आहे.तत्पूर्वी, 'हिजबुल्लाह' या दहशतवादी संघटनेने असा इशारा दिला होता की, जर लेबनॉनचा समावेश युद्धबंदी करारामध्ये केला गेला नाही, तर हा करार कोलमडून पडेल.दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे की, इराणसोबतच्या युद्धबंदी योजनेत हिजबुल्लाहचा समावेश करण्यात आलेला नाही. यापूर्वी, इराणने अमेरिकेकडे १०-कलमी युद्धबंदी प्रस्ताव पाठवला होता; ज्यामध्ये हिजबुल्लाहवरील हल्ले थांबवण्याची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी, इस्रायलने आपण हिजबुल्लाहवरील हल्ले थांबवणार नसल्याचे जाहीर केले होते. सुमारे ४० दिवसांनंतर, अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धबंदीवर एकमत झाले आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख यांनी केलेल्या आवाहनानंतरच हा निर्णय घेण्यात आल्याचे ट्रम्प यांनी नमूद केले.



युद्धबंदीच्या घोषणेनंतर इराणची राजधानी तेहरानमध्ये जल्लोष करण्यात आला.




इराणच्या नागरिकांनी तेहरानमध्ये इस्त्रायल आणि अमेरिकेचे झेंडे जाळून युद्धबंदीचा जल्लोष केला.

# व्हिडिओमध्ये कोणती बाई बेशुद्ध दिसते? राज यांच्या पत्नी शर्मिला ठाकरेंचा सवाल

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे च्या शर्मिला राज ठाकरे यांनी महिलांना भोंदूबाबांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. महिलांनी भोंदूबाबांकडे जाणे बंद करावे. हे लोक स्वतःला ब्रह्मा, विष्णू, महेश, लक्ष्मी, पार्वती असे काहीही म्हणतात. आपण त्यांच्या बोलण्याला बळी पडू नये. व्हायरल व्हिडिओमध्ये कोणती बाई बेशुद्ध दिसते? आपला समाज कोणत्या दिशेला चाललाय? असा परखड सवाल त्यांनी या प्रकरणी केला आहे.

राज्यात सध्या नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. यासंबंधीचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेत. त्यानंतर अनेक महिलांनी अशोक खरातने आपण बेशुद्धावस्थेत असताना आपले लैंगिक शोषण केल्याचा दावा केला आहे. पण शर्मिला ठाकरे यांनी हाच धागा पकडत कोणत्या व्हिडिओमध्ये महिला बेशुद्ध दिसतात? असा तिखट सवाल उपस्थित केला आहे. यावेळी त्यांनी महिलांना अशा भोंदूबाबांपासूर स्वतःला दूर ठेवण्याचेही आवाहन केले.शर्मिला ठाकरे म्हणाल्या, महिलांनी सर्वप्रथम भोंदूबाबांकडे जाणे बंद करावे. आमचे १३ आमदार आले (पान २ वर)





## महिलांना भोंदूबाबांकडे न जाण्याचे केले आवाहन

# खरातला 14 दिवसांची न्यायलयीन कोठडी

## ताबा मिळावा म्हणून SIT चा अर्ज

**मुंबई/प्रतिनिधी :** भोंदू अशोक खरातला १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आलीय. खरातला दुस-या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी झालीय. तर तिस-या गुन्ह्यात SIT खरातचा ताबा घेणार असून त्यानंतर २४ तासाच्या आत पुन्हा त्याला कोर्टात हजर करणार आहेत.दरम्यान, इंटरनेटवर लैंगिक अत्याचाराचे अश्लील व्हिडिओ वितरित आणि विकल्याच्या आरोपाखाली महाराष्ट्र सायबर सेलने माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या (आयटी कायदा) कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सायबर सेल प्रमुखांनी स्पष्ट केले आहे की, पीडितांच्या गोपनीयतेचे उल्लंघन करून आर्थिक फायद्यासाठी व्हिडिओ पसरवणा-यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. तपासातून सर्वात धक्कादायक सत्य समोर आले आहे, अशोक खरात सोशल मीडिया आणि पार्नोग्राफिक साइट्सवर त्याच्याकडून लैंगिक अत्याचार होत असलेल्या महिलांचे व्हिडिओ विकत होता. मिळालेल्या माहितीनुसार, खरातशी संबंधित अंदाजे १५ (पान २ वर)



## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2024:अंतिम निकाल जाहीर

# सोलापूरचे विजय लामकाने, आरती जाधव राज्यात प्रथम

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल बुधवार दि. ८ एप्रिल रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लामकाने हे सर्वसाधारण तथा मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम, तर सोलापूर जिल्ह्यातीलच आरती परमेश्वर जाधव या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत.सदर परीक्षा दि. २७ ते २९ मे २०२५ रोजी घेण्यात आली होती. त्यातून विविध २० संवर्गांतील एकूण ४६१ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. सदर निकाल आणि प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा समावेश अंतिम निकालात केलेला नाही. दिव्यांग, अनाथ, खेळाडू, मागास, इत्यादींसाठी आरक्षित पदावर शिफारसपात्र उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे, अशी माहिती राजपत्रित परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे उपसचिव सं. पां. देशमुख यांनी परिपत्रकाद्वारे दिली. उमेदवारांचा सविस्तर निकाल तसेच प्रत्येक प्रवर्गासाठीचे सीमांकन गुण आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असल्याचे आयोगाने स्पष्ट आहे. वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा अंतिम निकालात समावेश करण्यात आलेला नाही. तसेच हा निकाल न्यायालयीन प्रकरणांतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे. आरक्षित प्रवर्गांतील उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येणार असल्याचेही आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले केले आहे.



# समृद्धी महामार्ग अपघात : 8 मृतांच्या कुटुंबीयांना 40 लाखांची मदत

**मुंबई/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर दि. १ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या अपघातात आठ महिलांचा मृत्यू झाला. सदर घटनेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे एकूण रुपये ४० लाख इतकी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. ही रक्कम जिल्हाधिकारी, जालना यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. अपघात जालना शहरालगतच्या कडवंची गावाजवळ सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास घडला. मजुरांना घेउन जाणा-या पिकअप वाहनास मागून येणा-या ट्रकने धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. अपघातात आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला असून पाच व्यक्ती जखमी झाल्या आहेत. जखमींवर जालन्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये लक्ष्मीबाई संतोष मदन, कडुबाई रामदास मदन, ताराबाई गहेनाजी चौधरी, मंगलाबाई प्रकाश सिनगारे, सुमनबाई कचरू अदमाने, अलकाबाई दादाराव अदमाने, (पान २ वर)

# पारंपरिक पुजा-यांसाठी राज्यस्तरीय सर्वसमावेशक धोरण लवकरच

## विधी व न्याय राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विविध देवस्थानांमध्ये पिढ्यानपिढ्या सेवा देणा-या पारंपरिक पुजारी समाजाच्या हक्क व संरक्षणासाठी शासनाने सकारात्मक पाउल उचलले असून, त्यांच्या सन्मान व उपजीविकेची हमी देणारे सर्वसमावेशक राज्यस्तरीय धोरण लवकरच तयार करण्यात येणार असल्याची माहिती राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिली. मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस धर्मादाय आयुक्त एस. एस. कलोती, विधी व न्याय विभागाचे अवर सचिव कस्तुरे, उपसचिव खांडबदाले, तसेच गुरव समाजाचे सल्लागार मुकुंद आगलावे, कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष विजय शिंदे, देवस्थान समितीचे प्रदेशाध्यक्ष धनंजय दरे, राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस रंगनाथ गुरव, प्रदेश युवा अध्यक्ष समीर गुरव यांसह विविध प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यमंत्री ॲड.जयस्वाल म्हणाले की, सध्या पारंपरिक पुजारी वर्ग कोणत्याही ठराविक प्रशासकीय चौकटीत बसत नसल्याने त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलत आहे. सुरक्षा रक्षक, माथाडी कामगार तसेच गिग वर्कर्सप्रमाणे विविध क्षेत्रांतील घटकांसाठी स्वतंत्र धोरणे तयार करण्यात आली आहेत. त्याच धर्तीवर, परंतु पुजा-यांच्या धार्मिक (पान २ वर)



# २ वर्षात शंभर कोटींचे धान मातीमोल

**गडचिरोली :** राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात शेतकरी रात्रंदिवस घाम गाळून धान पिकवत असताना, दुसरीकडे भ्रष्ट अधिकारी, गिरणी मालक आणि खरेदी-विक्री संस्थाचालकांच्या संगनमताने शेतक-यांच्या कष्टाची अक्षरश? माती केली जात आहे. जिल्ह्यात २०२३ ते २५ या दोन वर्षात गडचिरोली आणि अहेरी विभाग मिळून ४ लाख ४७ हजार क्विंटल धानाची तूट असून, सुमारे १०० कोटींचे नुकसान झाले आहे. झिंगानूर येथील प्रकरणानंतर माहिती घेतली असता धक्कादायक वास्तव समोर आले असून यात कोट्यवधीच्या घोटाळ्याची शंका उपस्थित करण्यात येत आहे. (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे

# विदर्भातील पहिले इंटरव्ह्यू क्लिनिकचे थाटात उद्घाटन

### -एमबीए विभागाचा अभिनव उपक्रम

**बडनेरा/प्रतिनिधीः-** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथे विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी एक अभिनव आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रम म्हणून इंटरव्ह्यू क्लिनिकचे भव्य उद्घाटन आज उत्साहात संपन्न झाले. विदर्भातील पहिलाच असा उपक्रम ठरत असून शैक्षणिक क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.

हा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे आणि महाविद्यालयाचे






प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अजय ठाकरे, एमबीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात, प्रकल्प प्रमुख डॉ. लोभस घडेकर आणि प्रा. आतिफ सईद यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख डॉ. लोभस घडेकर यांनी करून या उपक्रमामागील संकल्पना आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात यांनी विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला आणि करिअर संधींना नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला व त्यांनी मुलाखती बाबत जिवंत उदाहरणे दिले. भविष्यात याला एआयची जोड देऊन अधिक प्रभावी करण्याचा मानस व्यक्त केला.कार्यक्रमाचे संचालन संस्कृती ठाकरे आणि अर्पिता मोरशे यांनी केले, तर शर्वरी सावळे हिने सरस्वती वंदन सादर केले. आभार प्रदर्शन प्रा. आतिफ सईद यांनी केले.आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक गुणवत्ता पुरेशी नसून मुलाखत कौशल्ये, आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्ये अत्यंत महत्त्वाची ठरतात. याच पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेले हे इंटरव्ह्यू क्लिनिक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मुलाखतीचा सराव, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि स्वतःमध्ये सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून देणार आहे. या क्लिनिकमध्ये विद्यार्थ्यांचे इन-कॅमेरा इंटरव्ह्यू रेकॉर्डिंग करून त्यांच्या त्रुटींचे विश्लेषण करण्यात येत आहे. तसेच या प्रक्रियेचे लाईव्ह स्ट्रीमिंग करण्यात येत असून इतर विद्यार्थ्यांनाही ते प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळत आहे.

# ११ गोवंशीची सुटका, एक मृत

### मंगरूळ दस्तगीरमध्ये कारवाई




**अमरावती/प्रतिनिधीः-** धामणगाव रेल्वे तालुक्यातील मंगरूळ दस्तगीरमध्ये मंगळवारी रात्री पोलिसांनी फिल्मी स्टाईल कारवाई करून गोवंश तस्करीचा भंडाफोड केला. एका वाहनातून ११ गोवंशाची सुटका केली.यामध्ये एका गोवंशाचा मृत्यू झाला. माहितीनुसार मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाणे हद्दीत पोलीस मंगळवारी मध्यरात्री गस्तीवर असताना एक संशयास्पद पिकअप वाहन दिसले. पोलिसांना पाहून वाहन चालकाने आपली गती वाढवली. पोलिसांनी त्याला थांबण्यासाठी म्हटले तर चालकाने आणखीन गती वाढवली. त्यामुळे पोलिसांनी त्याचा पाठलाग करून काही अंतरावर त्याला घेरले. वाहनाची झडती घेतली असता यामध्ये लहान मोठे १२ गोवंशला कोंबून ठेवले होते. त्यात एका गोवंशाचा मृत्यू झाला होता. ११ गंभीर अवस्थेमध्ये होते. सर्व गोवंशाची सुटका करून धामणगाव येथील गौरक्षण केंद्रात सुरक्षित रवाना करण्यात आले. या धाडसी कारवाईमुळे मुक जनावरांना जीवदान मिळाले. ठाणेदार शरद आहेर यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी जीवन लांडगे, सतीश ठवकर, डावरे यांनी कारवाई केली.

# वीज तारांच्या ठिणगीणे शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला

### -शेतकऱ्याचे स्वप्न भस्मसात, महावितरणकडे भरपाईची मागणी शाखा अभियंत्याने तक्रार न घेतल्याने शेतकरी संतप्त

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मौजा हिरापूर येथे शेतातून गेलेल्या विद्युत तारांच्या घर्षणामुळे पडलेल्या ठिणगीने उभ्या गव्हाच्या पिकाला आग लागली. या आगीत अल्पभूधारक शेतकऱ्याचे काढणीस तयार असलेले गहू पिक संपूर्णपणे जळून खाक झाले असून, आंतरपीक गव्हातील पाच वर्षे वयाची ३०० संत्रा झाडेही होरपळून गेली आहेत. या दुर्घटनेत शेतकऱ्याचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे.

भंडारज येथील निवासी युवा शेतकरी वैभव अशोक ठाकरे (वय २८) यांची मौजा हिरापूर येथे गट क्र. ३१२ मध्ये दोन एकर



शेती आहे. त्यांनी संत्रा बागेत यंदा आंतरपीक म्हणून गहू लागवड केली होती. दि.०७ एप्रिल रोजी काढणीच्या अवस्थेत असलेल्या गव्हाच्या पिकावरून गेलेल्या महावितरणच्या विद्युत तारांमधील घर्षणामुळे ठिणगी पडली आणि काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. आग पसरल्याने दोन एकरापैकी एक एकरातील गहू जळून राख झाला. तसेच आगीच्या झळांमुळे नव्याने वाढीस लागलेली संत्रा झाडेही क्षतिग्रस्त झाली.

दुर्घटनेनंतर वैभव ठाकरे यांनी भंडारज येथील महावितरण कार्यालयात तक्रार देण्यासाठी धाव घेतली. मात्र, शाखा अभियंता पवार यांनी तक्रार न नोंदवताच त्यांना आल्या पावली परत पाठविल्याचा आरोप पीडित शेतकऱ्याने केला आहे.

या प्रकरणी शेतकरी वैभव ठाकरे यांनी तातडीने शेतीच्या नुकसानीचा पंचनामा करून नुकसान भरपाई मिळावी, तसेच तक्रार न घेणारे शाखा अभियंता पवार यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी आमदार गजानन लवटे, उपविभागीय अभियंता व तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख पुण्यतिथी निमित्त १० एप्रिलला पुष्पांजली व मानवंदना



अमरावती/प्रतिनिधीः-

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने शुक्रवार दि.१० एप्रिलला सकाळी ९.३० वाजता पुष्पांजली व मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती भवन, शिवाजी नगर येथे संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आशिष येरेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील तर राज्यसभा सदस्य खा.डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, विधान परिषद सदस्य आमदार संजय खोडके, अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी यांची प्रमुख उपस्थिती राहील.

संस्थेच्या कार्यकारी परिषदेचे पदाधिकारी व सदस्य या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, अशी विनंती संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. वि. गो. ठाकरे यांनी केली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### खाण परवानग्यांचे अधिकार

तहसील किंवा प्रांत स्तरावर प्रक्रिया केली जात असे. मात्र, यात मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यावर तोडगा म्हणून महसूल मंत्र्यांनी आता हे सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नियमात आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात यासाठी एक स्वतंत्र 'सेल' (कक्षा) स्थापन करण्यात येईल, जो वर्षातून एकदाच अर्जांची छाननी करून रीतसर परवानगी देईल.

**दोषी अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी रोखणार-** बैठकीत मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना कडक इशारा दिला की, ज्या ठिकाणी कागदपत्रे नसतानाही खाणी सुरू ठेवण्यास मदत केली गेली आहे, अशा तहसीलदार आणि प्रांत अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्या वेतनवाढी रोखण्याचे प्रस्ताव शासनाला सादर करावेत. 'शासन फसवणूक खपवून घेणार नाही,' असेही त्यांनी बजावले.

**'निसर्ग संपविणाऱ्यांची गय नाही'-** या बैठकीत महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले की, खाणींना परवानगी न देणे हा उद्देश नसून, कायद्याचे पालन होणे महत्त्वाचे आहे. डोंगर फोडून निसर्गाची हानी करणाऱ्या कोणत्याही प्रकल्पाला परवानगी दिली जाणार नाही.

**बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे** पुणे प्रणालीचा विस्तार : पुण्यात यशस्वी ठरलेली डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली आता ठाणे, पालघर आणि रायगडसह राज्यभर लागू केली जाईल. ईटीएस सर्वेक्षण : सर्व ९० खाणींचे तात्काळ सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्वेक्षणात उत्खननात तफावत आढळल्यास संबंधित मालकांवर कठोर दंड आणि फौजदारी कारवाई केली जाईल.

**रात्रीच्या उत्खननावर बंदी** : रात्रीच्या वेळी छुप्या पद्धतीने होणाऱ्या उत्खननामुळे सरकारचा कोट्यवधींचा महसूल बुडतो. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष भरारी पथके तैनात करावीत.

### ड्रग्स प्रकरणातील मुख्य आरोपींना

साठा जप्त केला होता. या प्रकरणाचा तपास पुढे नेत पोलिसांनी राजस्थानमध्ये छापेमारी करत मुख्य सूत्रधार विष्णू गायरी आणि त्याचा साथीदार मांगीलाल यांना अटक केली. त्यानंतर त्यांना अमरावती येथे आणण्यात आले. मंगळवारी आरोपींना अमरावतीत आणल्यानंतर बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानंतर दोघांनाही पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे. या प्रकरणात आणखी राज्यांतील कनेक्शन तसेच आंतरराष्ट्रीय ड्रग्स तस्करीचे धागेदोरे असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे पुढील तपास अधिक वेगाने सुरू आहे.

### महावितरण डीपीला भीषण

वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे अनेक भाग अंधारात गेले आणि नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे सुमारे ७ लाख रुपयांचे नुकसान टळले, तर कारचे अंदाजे २ लाखांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा कोणी जखमी झाल्याची नोंद नाही. दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचा तपास महावितरण आणि संबंधित यंत्रणांकडून सुरू असून, कचऱ्यामुळे ही घटना घडल्याची प्राथमिक शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी

करत आयुक्तांनी पालक आणि मंडळांना समुपदेशनाचे आवाहन केले. 'एका चुकीमुळे करिअर धोक्यात येऊ शकते,' असा इशारा त्यांनी दिला. या बैठकीस जयंती उत्सव समिती, शांतता समिती सदस्य, ॲड. दिलीप एडतकर, ॲड. पी.एस. खडसे यांच्यासह महानगरपालिका, वीज विभाग, अन्न व औषध प्रशासन आणि अग्निशमन दलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे आणि जयंती उत्साहात, शांततेत साजरी करावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाने अमरावतीकरांना केले आहे.

जयंतीदरम्यान सोशल मीडियावरून अफवा किंवा प्रक्षोभक संदेश पसरवण्याच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर सायबर सेल सतर्क झाला आहे. आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून, ऑनलाइन हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे.

**मिरवणुकीसाठी कडक नियम-** मिरवणुकांदरम्यान शस्त्रे, ज्वलनशील पदार्थ किंवा आक्षेपार्ह साहित्याचे प्रदर्शन करण्यास पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येक ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे.

चित्रा चौकातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासह प्रमुख स्मारकांच्या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवण्याचे आदेश महानगरपालिकेला देण्यात आले आहेत. तसेच वीज व पाणीपुरवठा सुरळीत राहील, यासाठी संबंधित विभागांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### धमकी देत अल्पवयीन

तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करत अमानुष कृत्य केले. घटनेनंतर पीडित मुलीने धैर्य दाखवत वरुड पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करत आरोपीविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

### लाच घेताना महावितरणचा

सहाय्यक अभियंता बावनगडे यांनी प्रत्येक कामासाठी १,००० रुपयांप्रमाणे एकूण ४,००० रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने याबाबत अँटी करप्शन ब्युरोकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर सापळा रचण्यात आला. ८ एप्रिल २०२६ रोजी धारणी येथील महावितरण कार्यालयात आरोपी बावनगडे यांनी तक्रारदाराकडून ४,००० रुपयांची लाच स्वीकारताच अँटी करप्शनच्या पथकाने त्यांना रंगेहात अटक केली. प्राथमिक चौकशीत आरोपीने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले असून पुढील कारवाई सुरू आहे. या प्रकरणात धारणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही कारवाई अँटी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्राच्या पथकाने पोलिस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलिस अधीक्षक सचिन शिंदे आणि पोलिस उपअधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पाडली. कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याकडून कामासाठी लाचेची मागणी होत असल्यास त्वरित अँटी करप्शन ब्युरोशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अचलपूर नगरपालिकेची कर

राबवले. नगराध्यक्षा रूपाली माथने, मुख्याधिकारी, नगरसेवक आणि कर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे नागरिकांना आवाहन करत थकीत कर भरण्यासाठी ५०% व्याजमाफीची योजना जाहीर केली.

या योजनेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत केवळ शेवटच्या टप्प्यातच ५ कोटी रुपयांचा कर भरणा केला. त्यामुळे एकूण वसुलीचा आकडा १० कोटींवर पोहोचला. कर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन जनजागृती केली. वेळेचे बंधन न पाळता दिवसाचे १२ तास काम करत नागरिकांना कर भरण्यास प्रवृत्त केले. नगराध्यक्षा रूपाली माथने यांनीही स्वतः पुढाकार घेत मोहिमेवर लक्ष ठेवत प्रशासनाला सतत मार्गदर्शन केले. यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेली थकबाकी मोठ्या प्रमाणावर वसूल करण्यात प्रशासनाला यश आले. ज्या ठिकाणी कर भरणा टाळला जात होता, तिथे नगरपालिकेला कडक पावले उचलावी लागली. यामध्ये फिनले मिल या मोठ्या थकबाकीदाराकडे तब्बल ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक कर बाकी असल्याने त्यांचे कार्यालय सील करण्यात आले होते.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग, सरकारी रुग्णालय आदी शासकीय विभागांनीही आपली थकबाकी भरून पालिकेला सहकार्य केले. सर्वसामान्य नागरिकांनी प्रामाणिकपणे कर भरला असला, तरी वनविभाग आणि फिनले मिल यांच्याकडील कोट्यवधींची थकबाकी अद्याप वसूल झालेली नाही. यामुळे 'सामान्य नागरिकांनी जबाबदारी पार पाडली, पण मोठे थकबाकीदार अजूनही का मोकाट?' असा सवाल उपस्थित होत आहे. या यशस्वी मोहिमेसाठी मुख्याधिकारी धीरज गोहाड, कर अधिकारी आशिष किटुकले, कर निरीक्षक युवराज केंद्रे तसेच कर विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. या सर्व प्रयत्नांना नगराध्यक्षा रूपाली माथने यांच्या नेतृत्वाची भक्कम साथ लाभल्यानेच हे उद्दिष्ट साध्य झाले, असे मत व्यक्त होत आहे.

### स्मशानभूमीत झाडाला गळफास

घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मृताची ओळख त्याच्या चुलत भावाने पटवून दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी झाडाखाली चप्पल आढळून आली असून प्रथमदर्शनी घातपाताचा ठोस पुरावा दिसून येत नाही. मात्र, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी अचलपूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### तरुणीला लॉजमध्ये डांबून

जबरदस्तीने वाहन हिसकावले आणि तिला मारहाण केली. यानंतर आरोपीने तरुणीला चिखलदरा येथे नेण्याचा प्रयत्न करत तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली. विरोध केल्यावर तिचा विनयभंग करण्यात आला. एवढ्यावरच न थांबता आरोपीने तिला एका लॉजमध्ये नेऊन सुमारे दीड तास डांबून ठेवले. या काळात तिचा व्हिडीओ काढून तो व्हायरल करण्याची धमकी देत ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर पीडितेने धैर्य दाखवत नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ आरोपीविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा विकृत प्रवृत्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### नवीन महा-ई-सेवा केंद्राला

क्रमांक दोन नुसार शासनाने दखल घेत यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली आहे. यामध्ये समस्या व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे नवीन केंद्रांना मंजुरी न देण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी निवेदन देतांना संजय वानरे, विनोद तायडे, मनीष चौधरी, सुहास ठाकरे ,सुदर्शन यावले ,निलेश इंगळे, शंकर वाघमारे, संतोष घुले ,अतुल बोबडे, इमरान अयूब शाह आदि उपस्थित होते.

### १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब

आयोजकांनी दिली. आयोजकांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेले कार्य करणाऱ्या मान्यवरांना डॉ. आंबेडकर जीवन गौरव, जीवन संघर्ष, कर्तव्यपूर्ती व कर्तव्यदक्ष पुरस्काराने समितीच्या वतीने सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब यांची १३५ वी जयंती सर्व स्तरावर साजरी होत आहे. प्रसिद्ध व प्रख्यात कोलंबिया विद्यापीठाने जगातील शंभर विद्वानांच्या यादीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रथम क्रमांक दिला आहे. यामुळे प्रत्येक भारतीयांची शान व मान उंचावली आहे. जयंती उत्सव सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला समिती समन्वयक किशोर बोरकर, मुख्य आयोजक एड.दिलीप एडतकर ,एड. खडसे, प्राचार्य गोपीचंद मेश्राम, डॉ. देशमुख, प्रा.जगदीश गोवर्धन, प्रा.अनिल देशमुख, भैय्यासाहेब निचळ, राजा चौधरी, वैभव देशमुख, रमेश रामटेके, समीर जवंजाळ आदि उपस्थित होते.

### रेल्वे पोलिसांनी दुचाकी चोरट्याला

नगर) याला ताब्यात घेतले. त्याच्या कडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. आरोपीवर या पूर्वीही गाडगे नगर, सिटी कोतवाली, फ्रेजरपुरा ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहे. पुढील तपास पोलिस करत आहे. पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे ,दत्ताराम राठोड उपविभागीय अधिकारी पांडुरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली बंडेरा प्रभारी अधिकारी सहाय्यक निरीक्षक अर्चना गाढवे, उपनिरीक्षक बागुल, अंमलदार राहुल हिरोडे, दावर खान, शंकर नेहारे, पवन वघारे, शरद जुनघरे, उल्हास जाधव यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.

### आसाम, पुदुचेरी आणि केरळ

ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला 'अंतिम इशारा' दिल्याचा दावा निवडणूक आयोगाने केल्यानंतर, बुधवारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि भारतीय निवडणूक आयोग यांच्यात शाब्दिक चकमक झाली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी उत्तर २४ परगणा येथे आगामी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी बागदाह विधानसभा मतदारसंघातील मधुपर्णा ठाकूर, बंगाव उत्तर विधानसभा मतदारसंघातील बिस्वजीत दास आणि बंगाव दक्षिण विधानसभा मतदारसंघातील ऋतुपर्णा आध्या यांच्या समर्थनार्थ एका जाहीर सभेला संबोधित केले. गुरुवारी आसाममध्ये होणा-या निवडणुकांमध्ये, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल सर्व संवेदनशील स्थळांना सुरक्षा पुरवेल, सूक्ष्म निरीक्षक बारकाईने लक्ष ठेवतील आणि नागरिकांना आराम मिळावा यासाठी पाणी, शौचालये, व्हीलचेअर, बाक आणि फोन ठेवण्याची जागा यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

### व्हिडिओमध्ये कोणती बाई बेशुद्ध दिसते?

होते, तेव्हा आमच्याकडे भोंदूबाबांसाठी अनेकजण आले होते. हे भोंदूबाबा स्वतःला ब्रह्मा, विष्णू, महेश, लक्ष्मी, पार्वती असे काहीही म्हणतात. पण आम्ही कुणाच्याही पाया पडत नाही. या लोकांनी आमच्यासोबत फोटो काढून लोकांना आम्ही त्यांचे भक्तआहोत असे सांगितले तर आम्ही तिथे येउन त्यांच्या कानशिलात हाणणार. त्यामुळे आमच्याकडे कुणी येतच नाही.भोंदूबाबा फसवतात म्हणजे काय? तुम्ही सुद्धा व्हिडिओ बघितले असतील. त्यात कोणती बाई बेशुद्ध दिसते हो तुम्हाला. काय आहे हे? काय चाललंय हे? आपला समाज कोणत्या दिशेला चालला आहे?, असे शर्मिला ठाकरे म्हणाल्या.

### खरातला १४ दिवसांची न्यायलयीन

ते १७ पार्नोग्राफिक व्हिडिओ फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम आणि इतर प्लॅटफ?र्मवर प्रसारित झाले होते. हे व्हिडिओ पाहण्यास इच्छुक असलेल्यांकडून प्रति व्हिडिओ १५ ते २० रुपये आणि काही प्रकरणांमध्ये ५० रुपयांपर्यंत शुल्क आकारले जात होते. पैसे मिळाल्यानंतर, एका लिंकद्वारे व्हिडिओ पाठवले जात होते. पोलिसांच्या मते, या घृणास्पद कृत्यामुळे केवळ गुन्हेगारीला प्रोत्साहनच मिळाले नाही, तर अनेक पीडितांची ओळखही उघड झाली, ज्यामुळे त्यांच्या गोपनीयतेचे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव यांनी सांगितले की, या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला असून, ज्या चार विशिष्ट सोशल मीडिया लिंक्सद्वारे ही सामग्री पसरवली जात होती, त्या ओळखण्यात आल्या आहेत. तपास यंत्रणा आता हे डिजिटल रॅकेट चालवणा-या खात्यांपर्यंत आणि व्यक्तींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांनी आश्वासन दिले की, गुन्हेगारांना लवकरच अटक करून त्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले जाईल.

### समृद्धी महामार्ग अपघात :

मिनाबाई परमेश्वर अदमाने व कांचनबाई प्रकाश अदमाने यांचा समावेश आहे.

घटनेची माहिती प्राप्त होताच समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्षामार्फत तात्काळ आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी पाठविण्यात आल्या. रुग्णवाहिका व पोलीस यांच्या समन्वयातून जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासात संबंधित ट्रक चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले असून त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

### पारंपरिक पुजा-यांसाठी राज्यस्तरीय

व पारंपरिक स्थानाचा सन्मान राखत, त्यांना स्वतंत्र व सुसंगत दर्जा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. देवस्थानांचे उत्पन्न, पुजा-यांचे मानधन त्यांच्या पारंपरिक हक्कांचे संरक्षण या बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे. राज्यभर एकसमान व न्याय्य प्रणाली विकसित केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. य

### २ वर्षात शंभर कोटींचे धान

जिल्ह्यातील धानोरा, कुरखेडा, एटापल्ली, आरमोरी, चामोर्शी, अहेरी, सिरोंचा आणि आष्टी परिसरातील अनेक केंद्रांवर गेल्या काही काळात सातत्याने धान खरेदी आणि विक्रीतील घोटाळे उघडकीस आले आहेत.


## जाहीर सुचना

आम जनतेस सदरचे सुचना पत्राद्वारे अग्रेसीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने खालील वर्णनांकीत मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला असून तिचे वर्णन खालीलप्रमाणे-

नोंदणी पोटतुकडी त्याचे वर्णन - मौजे टाकळी बु., प्र.पो.तु.ता.कारंजा लाड, जि.प.व शेत सर्व्हे नं./गट नं.२५, क्षेत्रफळ ३ हे.३१ आर, आकार रु.९.५० पैसे, पो.ख.०.०८ यापैकी प्रेयस भगवंत साहू, रा.प्रतिक नगर, हातगांव, मुर्तिजापूर, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला खाते क्र.४७३, क्षेत्रफळ १ हे.३३ आर, आकार रु.३.८२ पैसे, पो.ख.०.०४ खालील चतुःसिमेतील असलेली कोरडवाहू शेतजमीन याची चतुःसिमा-

पुर्वेस - प्रल्हाद भिकाजी निंघोट यांची जमीन
पश्चिमेस - रस्ता नंतर गजानन तुळशिराम निंघोट यांची जमीन
उत्तरेस - नरेंद्र थोरात यांची जमीन
दक्षिणेस - कमलाकर खाडे यांची जमीन

येणेप्रमाणे माझे पक्षकार यांचेशी झालेल्या सौद्यानुसार पूर्ण रकमेची माझे पक्षकाराकडे पुर्तता झाली असून माझे पक्षकार येणाऱ्या नजिकच्या भविष्यात वरील मालमत्तेची खरेदी दिनांक२७.०४.२०२६ रोजी त्यांच्या पक्षात दुय्यम निबंधक कार्यालय, कारंजा लाड येथे नोंदवून घेतील. तत्पुर्वी जर उपरोक्त मालमत्तेवर कोणाचेही कर्ज, गहाण, ताबा, हक्क, बोजा, कुळ, बक्षीस, इतर हक्क संबंध, वारसा हक्क वा इतर तत्सम व्यवहार व सावकारी, निमसरकारी वा सरकारी कर्ज वगैरे असेल तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ०७ दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी दस्तऐवजासह संपर्क साधावा. अन्यथा काहीही तक्रार न आल्यास माझे पक्षकार नियमानुसार खरेदी करुन घेतील व त्यानंतर येणाऱ्या तक्रार वा उजर चालणार नाही, करीता सदरचे सुचनापत्र.

ठिकाण - कारंजा लाड
**दिनांक ०७.०४.२०२६**

नोटीस जाहीर करणार
(**ॲड.अचल डी.कोल्हे**)
अन्नपूर्णा निवास, जवाहर नगर,
अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९६६५९३१६६५

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ९ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अकोला जिल्ह्यातील 'आपले सरकार सेवा केंद्रां'ची व्यापक पडताळणी

## १०८ केंद्रांवर कारवाई; नागरिकांसाठी QR कोड व थेट तक्रार सुविधा सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

डिजिटल इंडिया अभियानांतर्गत नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शक व वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' (णएण २.०) योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांच्या दि. १९ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार या केंद्रांचे विस्तृत जाळे राज्यभर कार्यरत आहे.





या पार्श्वभूमीवर, मा. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार अकोला जिल्ह्यातील सर्व 'आपले सरकार सेवा केंद्र' व 'आधार सेवा केंद्रां'ची सखोल पडताळणी मोहीम राबविण्यात आली. या तपासणीदरम्यान एकूण १०८ केंद्रांचा पंचनामा करण्यात आला, ज्यामध्ये अनेक केंद्रे त्यांच्या नियोजित ठिकाणी कार्यरत नसणे, सेवा गुणवत्तेमध्ये त्रुटी, तसेच नागरिकांना वेळेत सेवा न मिळणे अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्या.

**नागरिक हितासाठी कडक पावले**

जिल्हा प्रशासनाने या अनियमिततेची गंभीर दखल घेत पुढील महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविल्या आहेत: प्रत्येक 'आपले सरकार सेवा केंद्रा'वर QR कोड प्रणाली लागू करण्यात आली आहे. नागरिकांना थेट तक्रार व अभिप्राय नोंदविण्यासाठी विशेष डिजिटल यंत्रणा सुरू. हेल्पलाईन क्रमांक: ०८० ६५९० ९८४४ उपलब्ध करून देण्यात आला आहे. सेवा केंद्रांवर सतत देखरेख व मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू.

**नागरिकांना आवाहन**

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, जर कोणत्याही सेवा केंद्रात अडचणी, गैरसोय किंवा अपूर्ण सेवा आढळल्यास, त्यांनी त्वरित QR कोड स्कॅन करून अथवा दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी. पारदर्शक व जबाबदार प्रशासनाचा संकल्प जिल्हा प्रशासनाचा उद्देश स्पष्ट आहे.

'प्रत्येक नागरिकाला शासकीय सेवा पारदर्शक, सुलभ आणि वेळेत मिळाली पाहिजे.' या मोहिमेमुळे सेवा केंद्रांमध्ये शिस्त, जबाबदारी आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

# मनपात पगारावर दरोडा! कंत्राटी कर्मचा–यांकडून 'कमिशन' वसुलीचा काळा खेळ

■ प्रतिनिधी | अकोला ■

- हातावर पोट असलेल्या कर्मचा-यांची लूट
- पगारातून कपात, रोखीने वसुलीचे आरोप

अकोला महानगर पालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारावरच कंत्राटदार एजन्सीकडून उघड लूट सुरू असल्याचा संतापजनक आरोप समोर आला आहे. पगार देण्याच्या नावाखाली कर्मचाऱ्यांकडून थेट पैशांची मागणी केली जात असून, काही ठिकाणी तर पगारातूनच 'कमिशन' कापून उर्वरित रक्कम खात्यात जमा केली जात असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

महापालिकेतील विविध विभागात कार्यरत सुमारे शंभरच्या वर कंत्राटी कर्मचारी या प्रकारामुळे त्रस्त असून, 'नोकरी टिकवायची असेल तर पैसे द्यावेच लागतील' असा दबाव त्यांच्यावर टाकला जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक कर्मचारी भीतीपोटी तक्रार करण्यासही पुढे येत नाहीत.

निविदेनुसार कर्मचाऱ्यांना पूर्ण पगार, तसेच ईपीएफ व ईएसआयसी सुविधा देणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात मात्र नियमांना पायाखाली तुडवत मनमानी कारभार सुरू असल्याचे दिसत आहे. काही एजन्सीकडून दरमहा ठराविक रक्कम 'कट' म्हणून ठेवली जाते, तर काही ठिकाणी पगार देण्यापूर्वीच 'हिशोब' लावला जातो, अशी माहिती समोर येत आहे.

या प्रकारामुळे आधीच कमी वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी होत असून, त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मनपात चालणारा हा 'कमिशनचा कारभार' आता उघडपणे चर्चेत आला असून, प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.या प्रकरणात संबंधित कंत्राटदार एजन्सींची सखोल चौकशी, कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांची तपासणी, तसेच प्रत्यक्ष चौकशी केल्यास मोठा घोटाळा उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मनपा आयुक्तांनी तातडीने लक्ष घालून या प्रकाराला आळा घालावा, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा मनपेत सुरू असलेले 'कमिशनराज' अधिकच बळावण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# बी.चंद्रकांत रेड्डी अपर पोलीस अधीक्षक अकोला यांचे चांन्नी पोलीस स्टेशन येथे वार्षिक निरिक्षण



■ प्रतिनिधी | चान्नी ■

पोलीस स्टेशन चान्नी येथे दि.०७ एप्रिल २०२६ रोजी अकोला जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांनी वार्षिक निरीक्षणासाठी भेट दिली.

यावेळी सर्वप्रथम पोलीस स्टेशन परिसरातील पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली.या बैठकीत परिसरातील गुन्हेगारीचा आढावा घेण्यात आला.तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण कसे आणता येईल,गुन्हा घडताच त्यावर तत्काळ व योग्य उपाययोजना कशा कराव्यात आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित कशी ठेवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी कायदा व सुव्यवस्था संदर्भात पोलीस कवायत,शस्त्र कवायत तसेच मोब लॉन्चिंग संदर्भातील सराव घेण्यात आला.

# तेल्हारा–माळेगाव बाजार रोडवर गौणखनिजाचा ढीग

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■



तालुक्यातील तेल्हारा–माळेगाव बाजार या मुख्य मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी टाकण्यात आलेल्या गौणखनिजाच्या मोठ्या ढिगामुळे अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला असून, स्थानिक प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी अवैध उत्खनन करणाऱ्यांनी कारवाईच्या भीतीने हा ढीग टाकून पलायन केल्याची माहिती समोर आली आहे.

दररोज शेकडो नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थी या मार्गाचा वापर करतात. अशा महत्त्वाच्या रस्त्यावरच अडथळा निर्माण झाल्याने वाहतुकीला अडचणी येत असून, विशेषतः रात्रीच्या वेळी हा ढीग स्पष्टपणे न दिसल्याने अपघाताची शक्यता अधिकच वाढली आहे. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गंभीर बाब म्हणजे, अनेक दिवस उलटूनही महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा स्थानिक प्रशासन यापैकी कोणत्याही यंत्रणेकडून या धोकादायक परिस्थितीकडे लक्ष देण्यात आलेले नाही. त्यामुळे 'हा ढीग हटवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

स्थानिक युवक चेतन पिंजरकर यांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, 'मी रोज या मार्गाने प्रवास करतो. हा ढीग अनेक दिवसांपासून तसाच आहे. रात्रीच्या वेळी तो अजिबात दिसत नाही. कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊ शकतो. प्रशासनाने तातडीने कारवाई करावी.'

**अपघाताचा धोका वाढला, जबाबदारीवर प्रश्नचिन्ह**

दरम्यान, संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित विभागांनी जबाबदारी निश्चित करून त्वरित हा ढीग हटवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावरच राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# भरदिवसा बँक परिसरातून अडीच लाखांची थरारक चोरी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहरातील स्टेट बँकसमोर असलेल्या वर्धमान प्लाझा कॉम्प्लेक्सच्या आवारात भरदिवसा धाडसी चोरीची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. प्रगती नगर येथील रहिवासी किसन ताटके यांच्या दुचाकीवरील बॅगमधून अज्ञात चोरट्यांनी तब्बल अडीच लाख रुपये लंपास केले. ही घटना सोमवारी सकाळी सुमारे ११:१५ वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, किसन ताटके हे गोल्ड लोन भरण्यासाठी बँकेत गेले होते. मात्र रक्कम अपुरी पडल्याने ते पुन्हा खाली उतरून उर्वरित पैसे आणण्यासाठी बाहेर आले. त्यांनी रक्कम दुचाकीच्या साईड बॅगमध्ये ठेवली आणि निघताच पाळत ठेवून बसलेल्या चोरट्यांनी क्षणाचाही विलंब न करता ही संधी साधली आणि बॅगमधील रक्कम लंपास केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. मात्र, या भागात वारंवार अशा घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्टेट बँक परिसर हा कारंजा शहरातील आर्थिक व्यवहारांचा प्रमुख केंद्रबिंदू मानला जातो. येथे सुमारे १० ते १२ बँका व पतसंस्था असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोकड व्यवहार होत असतात. त्यामुळेच हा परिसर चोरट्यांच्या निशाण्यावर असल्याचे स्पष्ट होत आहे.

# भारतीय जनता पार्टी ४६ वा. स्थापना दिवस संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय जनता पार्टीचा ४६ वा स्थापना दिवस निमित्ताने वाशिम शहरात व ग्रामीण भागात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने भाजपा प्रदेश महामंत्री तथा आमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते भाजपा नेते राजू राजे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर पंचशील नगर परिसरात भेट देऊन तेथेही ध्वजारोहण करण्यात आले तसेच नागरिकांशी संवाद साधून भारतीय जनता पार्टीच्या कार्याची माहिती देण्यात आली व मिठाई वाटप करून उत्सव साजरा करण्यात आला.

यानंतर आमदार श्याम खोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात आमदार डॉ. संजय कुटे यांचे कार्यकर्त्यांकडून जल्लोषात व अतिशबाजी करून स्वागत करण्यात आले.

महेश भवन, वाशिम येथे आयोजित कार्यकर्ता संवाद संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय जनता पार्टीचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री खासदार रावसाहेब दानवे पाटील उपस्थित होते, तर मुख्य वक्ते म्हणून प्रदेश महामंत्री माजी मंत्री आमदार डॉ. संजय कुटे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी दोन्ही मान्यवरांनी भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेत भूतकाळातील संघर्ष, संघटनाची उभारणी तसेच वर्तमानातील विकासाभिमुख कार्य याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा, जनसेवा व संघटन बळकटीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, भाजपा नेते राजू राजे पाटील, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, माजी आमदार विजयराव जाधव, माजी जिल्हाध्यक्ष सुधाकरराव परळकर, भक्तराज, महाराज यांच्यासह जिल्ह्यातील सर्व मंडळ अध्यक्ष, नगरसेवक-नगरसेविका, महिला व पुरुष पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख तसेच विविध मोर्चांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्याची जबाबदारी सुरज चौधरी यांनी यशस्वीरित्या पार पाडली. कार्यक्रमाची प्रस्तावना जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी केली.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने झोडगा येथे गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

झोडगा बुद्रुक येथील विद्यार्थिनी कु. सुजाता भिमराव सरकटे हिने नवोदय परीक्षेमध्ये वाशिम जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला आणि दुसरी विद्यार्थिनी आराध्या समाधान कांबळे इयत्ता ३ री हिने स्पेल बी परीक्षेत मालेगांव तालुक्यातुन प्रथम क्रमांक मिळवला.त्याबद्दल झोडगा गट ग्रामपंचायत कार्यालयात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सत्कार करण्यात आला . यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते कृष्णा देशमुख ( सरपंच वाघळुद ) उपस्थित होते तसेच वंचित बहुजन आघाडीचे मालेगाव तालुक्याचे महासचिव राजू जमदाडे झोडगा ग्रामपंचायतचे सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गौतम गवई झोडगा ग्रामपंचायतचे सरपंच कैलास ठेंगे,ग्रामपंचायत सदस्य डॉक्टर बाबुराव कांबळे, ग्रामपंचायतच्या ग्रामसेविका जयश्री वैद्य , वर्गशिक्षक विकास वाझुळकर सर, मुख्याध्यापक डिगंबर बोरकर सर , मुख्याध्यापिका सविता बोरकर मॅडम ,झोडगा गावाचे पोलीस पाटील रामकिसन वाघ ,मुलीच्या आई वडील भीमराव सरकटे आणि विद्या सरकटे नारायण सरकटे मालता मैंदकर, एकनाथ मुठाळ हे सर्व उपस्थित होते.

# शिवसेना पक्षाची सभा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

प्रदीप कुटे यांच्या निवासस्थानी शिवसेना नेत्या आमदार भावनाताई गवळी तसेच अकोला वाशिम लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख मा आमदार राजन साळवी यांच्या आदेशानुसार घेण्यात आलेल्या शिवसेना कार्यकर्त्यांच्या सभेला



सभेच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये मंगेश महाराज उपजिल्हाप्रमुख. प्रदीप पाटील कुटे तालुकाप्रमुख. मालेगाव नगरपंचायत नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे , नगर पंचायत उपाध्यक्ष पति व सामाजिक कार्यकर्ता महादेवराव खवले , पाणीपुरवठा सभापती आझाद खा पठाण , आरोग्य शिक्षण सभापती पति व सामाजिक कार्यकर्ता संजय सारडा , नगरसेवक सनी घुगे , ऋषीं गजानन सारसकर जिल्हा समन्वयक शिंदे सर. शहराध्यक्ष संतोष बळी , सागर भुतडा ,विकास बळी युवा सेना तालुकाप्रमुख , यांची उपस्थिती लाभली मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला होता, तालुक्यातील १६८ बूथ प्रमुखांचे नावाची यादी वरिष्ठाकडे पाठवण्यात आली असून, पक्ष बळकटीसाठी व लोकांची अडचणीचे कामे सोडवण्याचे कार्य आपन सर्वांनी करत राहावे , तसेच विविध विषयावर चर्चा सुद्धा याप्रसंगी ठाकरे, घुगे, कुटे खवले?, धोंगडे, यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना केले तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन कव्हर यांनी केले , कार्यक्रमाला सचिव राजेश पाटील कव्हर माणिकराव गालट ,अनिल जाधव, विवेक गवळी,गालट सुधाकरराव धोंगडे. पारसनाथ लांडकर सेवारामजी आडे. गजाननराव केंद्रे. ओबीसी सेल तालुकाप्रमुख. अविनाश घुगे तानाजी मुखाडे. अनिल जोगदंड. परमेश्वर कव्हर. विदर्भ अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष जावेद प्रवेश अमोल देशमाने युवा उपजिल्हाप्रमुख,सतीश पोफळे ,गजानन गरड, संतोष पांढरे,सह अनेक पदाधिकारी उपस्थिती प्रामुख्याने होती सभेमध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात आली सभा अतिशय उत्साहात पार पडली.

# राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अनंत जुमडे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पद्मश्री, ज्येष्ठ विद्रोही कवी नामदेव ढसाळ साहित्य नगरी परिसर, स्मृतीशेष ज्येष्ठ आंबेडकरवादी कवी, प्रसेनजित ताकसांडे विचार मंच सभागृह, शिवाजी महाविद्यालय वाशीम येथे दिनांक १२एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या



स्वागताध्यक्षपदी वाशीम येथील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ समाजसेवक , अनंतकुमार केशवराव जुमडे यांची आयोजन समितीच्या वतीने सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यातील मित्र परिवारांकडून तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्नेहमंडळीकडून त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि अभिनंदन होत आहे.

अनंतकुमार केशवराव जुमडे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रांतात कार्यरत आहेत.त्यांना हा वारसा त्यांचे आजोबा दलित मित्र, के. एम. जुमडे तसेच त्यांचे वडिल कॅप्टन केशवराव जुमडे यांच्यापासून प्राप्त झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या शेड्युल कास्ट फेडरेशनचे त्यांचे आजोबा पदाधिकारी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत भारत या वृतपत्राचे प्रतिनिधी होते.

# घरभेटींतून जनगणना नोंदणीची प्रत्यक्ष रंगीत तालीम

## जिल्हाधिका–यांचा नागरिकांशी संवाद; सहकार्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक वाशिम तालुक्यातील काटा तसेच वाशिम शहरातील सिव्हिल लाईन परिसरात दि.८ एप्रिल रोजी उत्साहात पार पडले. या उपक्रमातून जनगणना प्रक्रियेची सखोल माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.

प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी स्वतः घरोघरी भेट देत नागरिकांशी थेट संवाद साधला. जनगणना ही देशाच्या नियोजन प्रक्रियेचा कणा असून, अचूक माहिती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे सांगत त्यांनी नागरिकांना आगामी नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले.



या प्रात्यक्षिकादरम्यान क्षेत्रीय प्रशिक्षकांनी प्रत्यक्ष घरभेटी देऊन माहिती संकलनाची पद्धत, विचारले जाणारे प्रश्न, तसेच डिजिटल साधनांचा वापर याबाबत प्रात्यक्षिक प्रक्रिया राबविण्यात आली. यामुळे नागरिकांच्या शंकांचेही निरसन होऊन जनगणनेबाबत विश्वास आणि जागरूकता वाढीस लागली.यावेळी जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, परिविक्षाधीन तहसीलदार आकाश वर्मा, निलेश पळसकर, चार्ज अधिकारी निलेश गायकवाड,मास्टर ट्रेनर डॉ. राजेश गवई, कार्तिक गडलिंग, मालेगाव तहसीलदार तथा चार्ज ऑफिसर दीपक पुंडे, तसेच जनगणना जिल्हा समन्वयक शशांक रूखने,नायब तहसीलदार साहेबराव नप्ते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

संबंधित अधिकाऱ्यांनीही या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करत प्रशिक्षकांना आवश्यक सूचना दिल्या. या उपक्रमामुळे जनगणना २०२७ ची पूर्वतयारी अधिक भक्कम होत असून, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होत आहे. यावेळी सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३२ ■ गुरुवार, ९ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# देवळीत आगींचा सुळसुळाट; तीन दिवसांत दुसरी घटना, जिनिंग आगीमागे संशयाची सावली

**देवळी जनमाध्यम :** देवळी परिसरात आगींचा सुळसुळाट सुरूच असून, अवघ्या तीन दिवसांत दुसरी मोठी आग लागल्याने खळबळ उडाली आहे. दोन दिवसांपूर्वी आबाजी जिनिंग मध्ये लागलेल्या आगीची धग अजून शमत नाही तोच आता श्री कृष्ण जिनिंगमधील भीषण आगीने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की जिनिंगमध्ये आग लागण्याचे प्रकार घडतात, ही बाब आता नित्याचीच झाली आहे. जिनिंगमध्ये कापूस साठवून ठेवणे हे काही नवीन नाही; मात्र तरीही वारंवार आगी कशा लागतात, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. निष्काळजीपणा की यामागे काही वेगळेच गणित, याची चौकशी होणे गरजेचे आहे.



विशेष म्हणजे, या आगीत जळणारा कापूस हा शेतकऱ्याचा नसून व्यापाऱ्यांचा असतो. जिना मध्ये कापूस जळतो तो व्यापाऱ्यांचा, शेतकऱ्याचा नव्हे ही वस्तुस्थिती असली तरी, या घटनांमुळे बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण होत असून त्याचा फटका अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांनाही बसतो.

बुधवारी श्रीकृष्ण जिनिंगमध्ये लागलेल्या आगीत सुमारे १३०० ते १४०० क्विंटल कापूस जळून खाक झाला असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अग्निशमन दलाने प्रयत्नांची पराकाष्ठा करून आग आटोक्यात आणली, मात्र सलग घडणाऱ्या घटनांमुळे संशयाची सुई अधिक तीव्र झाली आहे.

देवळीत सलग आगीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, या घटनांमागील सत्य बाहेर आणून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

# अखेर... मिळणार अंतिम प्रवासाला सन्मानाचा विसावा

## -ममता बोंगाडे यांचा धडाकेबाज निर्णय; स्मशानभूमीत 'अंतिम विसावा' उभारणीला मंजुरी

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** पळसगाव रोडलगतच्या स्मशानभूमीत 'अंतिम विसावा' नसल्याने वर्षानुवर्षे नागरिकांना रस्त्यावरच अंत्यविधीचे काही संस्कार पार पाडावे लागत होते. ही शरमजनक आणि वेदनादायी स्थिती अखेर संपणार असून सिंदी रेल्वे नगरपालिकेने यावर ठोस पाऊल उचलले आहे. बांधकाम सभापती सौ. ममता अमोल बोंगाडे यांनी पहिल्याच बैठकीत हा मुद्दा आक्रमकपणे मांडत सभागृहाकडून एकमताने मंजुरी मिळवली.

हिंदू धर्मातील परंपरेनुसार मृतदेह स्मशानभूमीत नेताना तिरडीला 'अंतिम विसावा' देणे आवश्यक मानले जाते. याच ठिकाणी खांदेकरी बदलले जातात, पूजन केले जाते आणि काही धार्मिक विधी पार पडतात. मात्र, या अत्यावश्यक सुविधेअभावी नागरिकांना उघड्या रस्त्यावरच हे



विधी करावे लागत होते, ही वस्तुस्थिती अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिली होती.

नव्या पदाधिकाऱ्यांनी मात्र हा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला. बोंगाडे यांनी सभागृहात ठाम भूमिका घेताच सर्व सदस्यांनी त्याला पाठिंबा दिला आणि 'अंतिम विसावा' उभारणीसह दहनशेडमध्ये लोखंडी कठडे बसविण्याच्या कामालाही मंजुरी देण्यात आली.

पालिकेकडून लवकरच टेंडर प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे.

दरम्यान, मरण हे अटळ सत्य आहे. प्रत्येकाला या प्रवासातून जावे लागते. त्यामुळे अंतिम प्रवासात सन्मान आणि आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत व्यक्त करत बोंगाडे यांनी आपल्या कार्यशैलीची झलक दाखवून दिली.

या निर्णयामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना असून, अनेक वर्षांचा दुर्लक्षित प्रश्न मार्गी लागल्याने प्रशासनाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत.

# शाळांचा हिशेब जनतेसमोर; 'समग्र शिक्षे'च्या अंकेक्षणात १३२ शाळांची छाननी

**वर्धा जनमाध्यम :** शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, 'समग्र शिक्षा अभियान' अंतर्गत वर्धा पंचायत समिती सभागृहात पार पडलेल्या सामाजिक अंकेक्षण जनसुनावणीत तब्बल १३२ शाळांच्या कामकाजाचा सखोल हिशेब जनतेसमोर मांडण्यात आला. शाळांमधील सोयी-सुविधा, निधीचा वापर आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा यावर थेट प्रश्नोत्तरांचा भडिमार झाला.

महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी (मंत्रालय, मुंबई) आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या जनसुनावणीत पायाभूत सुविधा, वर्गखोल्यांची स्थिती, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे यांसारख्या मूलभूत बाबींवर काटेकोर चर्चा झाली. अनेक शाळांमध्ये सुविधा अपुऱ्या असल्याच्या बाबी पुढे



आल्याने व्यवस्थेतील त्रुटी उघड झाल्या.

जनसुनावणीस जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे ज्येष्ठ अधिव्याख्याता संजय नवले, राहुल डंबारे, नेमीचंद चव्हाण, शुभांगी कोहळे, गटशिक्षणाधिकारी धर्मपाल कुमरे व शुभम कंटाळे उपस्थित होते. प्रारंभी वरिष्ठ लेखा लिपिक रविकांत देशमुख यांनी अंकेक्षणातील मुद्दे मांडले.

यावेळी शाळांच्या प्रगतीत पालक व ग्रामस्थांचा सहभाग किती प्रभावी आहे, तसेच प्रशासन कितपत पारदर्शकपणे काम करत आहे, यावरही चर्चा रंगली. जनसुनावणीमुळे शिक्षण व्यवस्थेतील उणिवा समोर येऊन त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**शिक्षकांच्या अडचणींनाही वाचा-** शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्या, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक उपाययोजना आणि संसाधनांची कमतरता यावरही यावेळी मते जाणून घेण्यात आली. अंकेक्षणामुळे शालेय कारभारात पारदर्शकता वाढून जबाबदारी निश्चित होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# शेतीत नवे तंत्रज्ञान व योजनांची माहिती देणारी मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**सेलु जनमाध्यम :** तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन आणि शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला परिसरातील मोठ्या संख्येने युवा व प्रगतशील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेत मशरूम लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान, फुलशेती व फळबाग लागवडीचे नियोजन, मसाला पिकांच्या संधी तसेच मल्चिंग पेपरच्या वापराचे फायदे याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यासोबतच शासनाच्या विविध योजनांअंतर्गत उपलब्ध अनुदान, पात्रतेच्या अटी आणि अर्ज प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली.

शेतकऱ्यांना डिजिटल माध्यमातून योजनांचा लाभ सहज व पारदर्शक पद्धतीने मिळावा



यासाठी 'महाविस्तार' ॲप व 'महाडीबीटी' पोर्टलवर नोंदणी आणि कागदपत्रे अपलोड करण्याची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. कृषी अधिकारी वैभव गुडगे यांनी या प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन केले.

# गारपिटीचा तडाखा; संत्रा-मोसंबी बागांचे मोठे नुकसान, तात्काळ पंचनाम्यांची मागणी

## खा.अमर काळे यांनी दिले जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात झालेल्या अकाली पाऊस व गारपिटीमुळे संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः आष्टी तालुक्यात फळबागांना मोठा फटका बसला असून, अनेक ठिकाणी पिके जमीनदोस्त झाली आहेत. या पार्श्वभूमीवर नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी पुढे येत आहे.

गारपिटीच्या तडाख्यामुळे संत्रा व मोसंबीची फळे मोठ्या प्रमाणात झाडांवरून गळून पडली आहेत. झाडांवर राहिलेल्या फळांनाही गारांचा मार बसल्याने त्यांची गुणवत्ता घसरून सडण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी बाजारमूल्य घटण्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच काही शेतकऱ्यांनी शेतात साठवून ठेवलेल्या तुरीच्या गंजी पावसामुळे भिजून नुकसानग्रस्त झाल्या आहेत.



आधीच उत्पादन खर्चात वाढ, नापिकी आणि कमी बाजारभाव यामुळे शेतकरी अडचणीत असताना या नैसर्गिक आपत्तीने संकट अधिक गडद केले आहे. फळपिकातून काही प्रमाणात उत्पन्न मिळेल, या अपेक्षेवर असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

दरम्यान, खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे याबाबत लक्ष वेधले असून, कृषी विभागामार्फत तातडीने सर्वेक्षण करून नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली आहे. तसेच बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने जलद गतीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मत कृषी क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# सेवाग्रामात सर्वोदय विचारांचा जागर; १३ राज्यांतील ११० युवकांचा सहभाग

## विश्व मानवता व सांस्कृतिक मूल्यांवर सखोल चिंतन

**वर्धा जनमाध्यम :** सेवाग्राम येथील सर्व सेवा संघ कार्यालयात ५ ते ८ एप्रिलदरम्यान आयोजित चार दिवसीय सर्वोदय शिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. देशातील १३ राज्यांमधून आलेल्या ११० युवकांनी या शिबिरात सक्रिय सहभाग घेत समाजपरिवर्तनाच्या दिशेने नवी दृष्टी आत्मसात केली.



शिबिरादरम्यान सर्वोदय विचार, भारतीय संविधान, संवैधानिकता, विश्व मानवता आणि सांस्कृतिक हस्तक्षेप या विषयांवर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सर्व सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंदन पाल, ज्येष्ठ गांधीवादी अरविंद अंजुम, हुसैन शेख, रामधीरज, नंदलाल मास्टर, अविनाश काकडे, विभा गुप्ता आणि बजरंग भाऊ यांनी युवकांशी संवाद साधत वर्तमान सामाजिक व राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. नेतृत्व विकासावर भर देत आयोजित या शिबिरात युवक कार्यकर्त्यांनी सर्वोदय पद्धतीद्वारे कार्यकर्ता घडविण्याचे धडे घेतले. जगदीश, अलिभा दास, दिनेश जैन, अंकुर शाश्वत, विक्रांत कांबळे, साक्षी, श्वेता आदींनी सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा निर्धार व्यक्त केला. बजरंग सोनावणे, इश्ताक शहडोली आणि प्रशांत गुजर यांनी परिवर्तन गीतांच्या माध्यमातून युवकांमध्ये प्रेरणा निर्माण केली. खेळ, श्रमदान आणि गटचर्चांमुळे संघभावना वृद्धिंगत झाली.

# हिंगणघाट हत्याप्रकरणी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

**हिंगणघाट जनमाध्यम :** किरकोळ कारणावरून घडलेल्या हत्तेच्या प्रकरणात हिंगणघाट येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. ५० रुपयांच्या उधारीवरून झालेल्या वादातून ही घटना घडली होती.



पोलीस ठाणे हिंगणघाट येथे दाखल गुन्हा क्रमांक ८८९/२०२२ नुसार, ३० सप्टेंबर २०२२ रोजी बिडकर वॉर्ड परिसरात ही घटना घडली. फिर्यादी राहुल कावळे यांच्या तक्रारीनुसार, आरोपी सचिन उर्फ गोलू पेंढाम (वय ३५) याच्या पत्नीने मृतक सतीश बंडेकर यांच्याकडून ५० रुपये उधार घेतले होते. त्यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला.

वादाच्या दरम्यान आरोपीने लाकडी रेंटरने बंडेकर यांच्या डोक्यावर वार केला. गंभीर जखमी झालेल्या बंडेकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणाची सुनावणी जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात झाली.

सरकारी वकील दीपक एस. वैद्य यांनी एकूण १६ साक्षीदार तपासून आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध केला.

तपास अधिकारी पीएसआय सोमनाथ टापरे व एपीआय प्रशांत पाटणकर यांनी तपास करून पुरावे सादर केले. न्यायालयाने आरोपीस भारतीय दंड संहिता कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे. निकाल ७ एप्रिल २०२६ रोजी जाहीर करण्यात आला.

# गावात राहत नाही म्हणताच संताप; आशा स्वयंसेविकेला पोलिस पाटलाची धमकी

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** दहेगाव गोसावी येथे सत्तेचा माज किती बोकाळला आहे, याचे धक्कादायक उदाहरण समोर आले आहे. गावातील आशा स्वयंसेविकेला केवळ सत्य बोलल्याच्या कारणावरून पोलिस पाटलाने थेट धमकावल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी अखेर दहेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आशा स्वयंसेविका आपल्या घरी असताना पोलिस पाटील प्रदीप भास्कर कोल्हे हा तेथे पोहोचला. तू गावकऱ्यांना पोलिस पाटील गावात राहत नाही असे का सांगते असा प्रश्न विचारत त्याने वाद घालण्यास सुरुवात केली. वाद चिघळताच त्याने संतापाच्या भरात तुला आणि तुझ्या संपूर्ण कुटुंबाला आत टाकतो अशी उघड धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, गावपातळीवर काम करणाऱ्या आशा स्वयंसेविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकसेवेचे काम करणाऱ्या महिलांनाच जर अशा प्रकारे धाकदपटशा दाखवण्यात येत असेल, तर सामान्य नागरिकांची स्थिती काय असेल, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, पीडितेच्या तक्रारीवरून दहेगाव पोलिसांनी संबंधित पोलिस पाटलाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. सत्तेच्या जोरावर दडपशाही करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून केले जात आहे.

# फळे, भाजीपाला, फुलशेती व रेशीमसाठी शेतकऱ्यांनी एकत्रित प्रयत्न करा - जिल्हाधिकारी वान्मथी सी


## -प्रगतीशील शेतकऱ्यांशी संवाद व प्रशिक्षण कार्यक्रम

**वर्धा जनमाध्यम :** शासनामार्फत केळी, फुले व भाजीपाला विक्री करीता मार्केट जोडणी, फळे भाजीपाला लागवड तांत्रिक मार्गदर्शन व रेशीम शेती व्यवसाय क्लस्टर विकसित करण्यासाठी व्यवसायाकरीता पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी सांगितले.

पवनार येथील हिवरे सभागृह येथे प्रगतीशील शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत स्ट्रॉबेरी, ड्रॅगन फ्रुट लागवड, मसाले पिक लागवड, फुल शेती लागवड, मशरुम व रेशीम शेती व्यवसायावर आधारीत संवाद व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर, जिल्हा रेशीम विकास अधिकारी रजनी बनसोड, उपविभागीय कृषि अधिकारी वैष्णवी शिंदे, मंडळ कृषि अधिकारी एस.एस.मुडे यांच्यासह कृषि विभागाचे अधिकारी व युवा प्रगतीशील शेतकरी उपस्थित होते.

सिट्रस इस्टेट तळेगाव, आष्टीमार्फत इंडो इस्त्रायल पध्दतीने संत्रा व मोसंबी लागवडसाठी शेतकऱ्यांनी कृषि विभागाच्या योजनेनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले.

मिरची, हळद, अद्रक या मसाला पिकांचे क्लस्टर पध्दतीने नियोजन केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढविण्यास मदत होईल. झेंडू, शेवंती, गुलाब, गॅलरडिया व निशिगंधा या फुलशेती पिकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. स्ट्रॉबेरी व ड्रॅगन फ्रुट लागवड ही नविन व उच्च मुल्य पिके असून योग्य



व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना अधिक नफा मिळू शकतो. यासाठी कृषि विभागाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास योजनेंतर्गत ४० टक्के अनुदान देण्यात येईल. मल्चिंग पेपर व वीड मॅटचा वापर केल्यास तण नियंत्रण प्रभावीपणे होते व मातीतील आर्दता टिकून राहते व उत्पादन वाढते. सोबतच ठिबक व तुषार सिंचन पध्दती अवलंबविल्यास पाण्याची बचत होऊन पीक वाढ अधिक चांगली होण्यास मदत मिळते. तसेच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब केल्यास रासायनिक किटकनाशकांचा वापर कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होते, असे अरविंद उपरीकर मार्गदर्शन करतांना म्हणाले.

रजनी बनसोड यांनी देशी रेशीम किटक संगोपन, चाकी टप्पा कोष निर्मिती प्रक्रिया व रेशीम बाजारपेठ याबाबत मार्गदर्शन केले. तर शेती तज्ञ शेतकरी प्रवीण बाकडे यांनी मशरुम लागवडी विषयी माहिती दिली. देऊन ऑयस्टर मशरुम लागवड ही कमी खर्चात व स्थानिक हवामानास अनुरुप असल्याचे सांगितले.

चर्चासत्रात मसाला पिकांचे क्लस्टर पध्दतीचे नियोजन, फुलशेती, औषधी वनस्पती लागवड, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच काढणीनंतरची प्रक्रिया व बाजार व्यवस्थापन या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ ,अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३५९/२०२६ ने.ता.१५.०४.२०२६

**Applicant:** Ramdas Yashwantrao Sawarkar Through Lrs.

-- विरुध्द --

**Respondent:** Uttamrao Barkaji Gadge and Others

Benam : Jyoti Narendra Bijawe, R/o Divarkar Layout, Near Gajanan Maharaj Mandir, Bachelor Road, Wardha, Tq. Dist.Wardha

**APPLICATION UNDER ORDER 5 RULE 20 OF CPC FOR SUBSTITUTED SERVICE OF SUMMONS UPON RESPONDENT NO.1, 3-B & 3-C**

ज्याअर्थी वरील अर्जदार प्रविण गजाननराव रिठे यांनी जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, अमरावती यांच्या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **ज्योती नरेंद्र बिजवे** यांना वारंवार नोटीस देवूनही न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे त्यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी अर्जाची सुनावणीसाठी दिनांक **१५.०४.२०२६** रोजी सकाळी **१०.३०** वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २७.०३.२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

अमरावती

दिनांक २७.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग)**
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ट्रम्प यांची इराणसोबत 2 आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा



**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठी घोषणा करत सांगितले आहे की, इराणवर होउ शकणारे संभाव्य हल्ले आणि बाम्बहल्ले सध्या दोन आठवड्यांसाठी स्थगित करण्यात आले आहेत. ट्रम्प यांनी स्पष्ट केले की हा दोन्ही बाजूंनी लागू होणारा युद्धविराम (सीजफायर) असेल. म्हणजेच या कालावधीत ना अमेरिका हल्ला करेल, ना इराण कोणतीही आक्रमक कारवाई करेल.मात्र या करारासाठी एक महत्त्वाची अट ठेवण्यात आली आहे इराणने तात्काळ, पूर्णपणे आणि सुरक्षित पद्धतीने होर्मुज सामुद्रधुनी जहाजवाहतुकीसाठी खुली करावी लागेल.ट्रम्प यांच्या मते, अमेरिकेने आधीच आपली अनेक लष्करी उद्दिष्टे साध्य केली असून आता इराणसोबत दीर्घकालीन शांतता करारासाठी वेगाने चर्चा सुरू आहे.त्यांनी सांगितले की इराणकडून १० मुद्द्यांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याला चर्चेचा आधार मानले जात आहे. ट्रम्प यांनी दावा केला की अमेरिका आणि इराण यांच्यातील जुन्या वादांपैकी बहुतांश मुद्द्यांवर सहमती झाली आहे. पुढील दोन आठवड्यांत अंतिम करार करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सर्व काही नियोजनानुसार झाले, तर पश्चिम आशियातील दीर्घकाळ चालत आलेला तणाव कमी करण्याच्या दिशेने हा मोठा टप्पा ठरेल, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथ सोशल वर पोस्ट करत स्पष्ट इशारा दिला होता की, इराणने लवकरात लवकर होर्मुज सामुद्रधुनी खुली केली नाही आणि करार मान्य केला नाही, तर त्याला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले होते, मंगळवार रात्री ८ वाजता (ईस्टर्न टाइम)! यापूर्वी त्यांनी इशारा दिला होता की मार्ग खुला न केल्यास अमेरिका इराणची उर्जा व्यवस्था आणि पायाभूत सुविधा पूर्णपणे उद्ध्वस्त करू शकते. त्यांनी असेही म्हटले होते की, होर्मुज सामुद्रधुनी खुली झाली नाही, तर इराणमधील वीज प्रकल्प आणि पूल हे लक्ष्यावर असतील.

ट्रम्प यांनी यापूर्वी इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम दिला होता, मात्र नंतर ही मुदत अनेकदा वाढवण्यात आली आणि शेवटी ती ८ एप्रिलच्या रात्रीपर्यंत वाढवण्यात आली. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की कराराची शक्यता अजूनही कायम आहे; पण चर्चा अपयशी ठरल्यास ते सर्व काही संपवतील असा इशाराही त्यांनी दिला होता. तसेच, इराणमधील सामान्य नागरिक त्यांच्या सरकारवर नाराज असून अमेरिकेच्या कारवाईला पाठिंबा देउ शकतात, असा दावा देखील ट्रम्प यांनी केला होता.या संघर्षाची सुरु वात २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांपासून झाली. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनेई यांचा मृत्यू झाला होता. अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने आखाती देशांतील अमेरिकन लष्करी तळांवर जोरदार हल्ले केले. तसेच इस्रायलवरही इराणकडून क्षेपणास्त्र डागण्यात आली. या युद्धामुळे होर्मुज सामुद्रधुनी मार्गे होणारी जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली.



## युद्ध थांबवण्यात पाकिस्तानच्या भूमिकेवरून काँग्रेसने पंतप्रधानांवर केली टीका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**काँग्रेसने अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामात पाकिस्तानच्या भूमिकेवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तीव्र टीका केली आहे. पक्षाने याला पंतप्रधान मोदी यांच्या अतिपरिचित वैयक्तिक्र कूटनीतीसाठी मोठा धक्का असल्याचे म्हटले असून, स्वत?ला विश्वगुरू म्हणवणारे पूर्णपणे उघडे पडल्याचा आरोप केला आहे. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी



बुधवारी सांगितले की, पश्चिम आशियामध्ये अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात झालेल्या दोन आठवड्यांच्या युद्धविरामाचे संपूर्ण जग सावधपणे स्वागत करेल. त्यांनी आरोप केला की हा संघर्ष २८ फेब्रुवारी रोजी इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या लक्ष्यित हत्यांपासून सुरू झाला, आणि ही घटना पंतप्रधान मोदी यांच्या इस्रायल दौ-यानंतर अवघ्या दोन दिवसांनी घडली. काँग्रेसच्या मते, या दौ-यामुळे भारताची जागतिक प्रतिमा कमी झाली.जयराम रमेश यांनी असेही म्हटले की, गाझामधील इस्रायलच्या कथित नरसंहाराबाबत आणि ताबा केलेल्या वेस्ट बँकमधील विस्तारवादी धोरणांबाबत पंतप्रधान मोदी यांनी कोणतीही भूमिका मांडली नाही. पाकिस्तानने युद्धविराम घडवून आणण्यात बजावलेली भूमिका ही पंतप्रधान मोदी यांच्या अतिवैयक्तिक्र कूटनीतीच्या आशय आणि शैली दोन्हींसाठी गंभीर धक्का असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांनी पुढे म्हटले की, जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाला पाकिस्तानकडून मिळणा-या सततच्या पाठिंब्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळे ठेवण्याची आणि जगाला तो एक अपयशी राष्ट्र असल्याचे पटवून देण्याची नीती स्पष्टपणे यशस्वी ठरलेली नाही. काँग्रेसच्या मते, बाह्य मदतीवर पूर्णपणे अवलंबून असलेली दिवाळखोर अर्थव्यवस्था आणि अनेक बाबतीत कमकुवत झालेला देश अशी भूमिका निभावू शकला, ही बाब पंतप्रधान मोदी यांच्या परराष्ट्र धोरण आणि कथानक व्यवस्थापनाच्या रणनीतीवर प्रश्न उपस्थित करते.काँग्रेस नेत्यांनी असेही म्हटले की, पंतप्रधान मोदी किंवा त्यांच्या टीमने ऑपरेशन सिंदूर १० मे २०२५ रोजी अचानक का थांबवण्यात आले, याबाबत कधीही स्पष्टीकरण दिले नाही. या निर्णयाची पहिली घोषणा अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री यांनी केली होती, आणि त्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जवळपास शंभर वेळा त्याचे श्रेय घेतले आहे.

## युद्धविरामाच्या घोषणेमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत 17 टक्क्यांची घसरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**-अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धात युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत १७ टक्क्यांची घसरण झाली. ब्रेंट क्रूड प्रति बॅरल ९१.८८ डालरवर आले, तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड प्रति बॅरल ९१.०५ डालरवर घसरले. यापूर्वी, मागील सत्रात ब्रेंट



क्रूड प्रति बॅरल १०९.२७ डालरवर बंद झाले होते, तर डब्ल्यूटीआय क्रूड प्रति बॅरल ११२.९५ डालरवर बंद झाले होते. भारतीय वेळेनुसार सकाळी ९:०० वाजता, ब्रेंट क्रूड १३.४७ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ९४.५६ डालरवर व्यवहार करत होते. त्याचप्रमाणे, डब्ल्यूटीआय क्रूडच्या किमती १५.२० टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ९५.७८ डालरवर आल्या.विशेष म्हणजे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या वीज आणि नागरी पायाभूत सुविधांवर बाम्बहल्ल्यांवर दोन आठवड्यांची स्थगिती जाहीर केल्यानंतर कच्च्या तेलाच्या किमतीत ही घसरण झाली आहे. ट्रम्प यांनी सांगितले की, वादग्रस्त मुद्द्यांवर इराणसोबत एक करार झाला आहे. त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर त्यांनी म्हटले आहे की, हा एक द्विपक्षीय युद्धविराम असेल, जो इराणने होर्मुझची सामुद्रधुनी तात्काळ आणि सुरक्षितपणे पुन्हा उघडण्यास सहमती दर्शवण्यावर अवलंबून असेल.जगातील कच्च्या तेलाचा आणि वायूचा सुमारे २० टक्के पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जातो, परंतु पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धामुळे हा पुरवठा जवळजवळ थांबल्याने जगभरात अशांतता निर्माण झाली आहे आणि कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. विशेषत?, डब्ल्यूटीआय कच्च्या तेलाच्या किमती ७० टक्क्यांनी वाढल्या.युद्धविरामाची घोषणा होउनही, तेल पायाभूत सुविधांचे कामकाज पूर्णपणे पुन्हा सुरू करणे कठीण होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे. युद्धामुळे तेल पायाभूत सुविधांना झालेले भौतिक नुकसान लवकर भरून निघण्याची शक्यता नाही. विशेषत?, युद्धामुळे बंद पडलेल्या तेल विहिरी पुन्हा सुरू करणे, कर्मचारी आणि जहाजे स्थलांतरित करणे, आणि रिफायनरीमधील साठा पुन्हा तयार करणे यासाठी बराच वेळ लागेल. त्यामुळे, तेल बाजारातील ही घसरण काही सत्रांमध्ये कमी होउ लागेल आणि कच्च्या तेलाचा व्यापार पुन्हा एकदा १०० डालरच्या जवळपास किंवा त्याहून अधिक होईल.

## इराण युद्धविरामाचे भारताकडून स्वागत; पश्चिम आशियात शांततेची आशा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धात य।अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविरामाच्या घोषणेमुळे कूटनीतिक तोडगा निघण्याचा मार्ग खुला झाल्याचे दिसत आहे. या युद्धविरामावर भारताकडूनही प्रतिक्रिया समोर आली आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात या युद्धविरामाचे स्वागत



करण्यात आले आहे.मंत्रालयाने म्हटले आहे, आम्ही या युद्धविरामाचे स्वागत करतो आणि यामुळे पश्चिम आशियात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होईल, अशी आशा व्यक्त करतो. यापूर्वीही आम्ही अनेकदा सांगितल्याप्रमाणे, सध्याचा संघर्ष लवकरात लवकर संपवण्यासाठी तणाव कमी करणे, संवाद आणि कूटनीती अत्यावश्यक आहेत.भारताने पुढे म्हटले आहे, या संघर्षामुळे सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या असून जागतिक उर्जा पुरवठा आणि व्यापार नेटवर्कवरही परिणाम झाला आहे. होर्मुज सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक सुरळीत सुरू राहावी आणि जागतिक व्यापाराचा प्रवाह अबाधित राहावा, अशी आम्हाला आशा आहे. उल्लेखनीय म्हणजे, पश्चिम आशियात गेल्या महिनाभराहून अधिक काळ सुरू असलेल्या इराण युद्धामुळे जगभर उर्जा संकट अधिक तीव्र झाले होते.दरम्यान, तेहरानमधील भारतीय दूतावासाने सध्याची परिस्थिती लक्षात घेता भारतीय नागरिकांना तात्काळ देश सोडण्याचा सल्ला दिला आहे. यापूर्वी ७ एप्रिल रोजी जारी करण्यात आलेल्या सल्ल्यात नागरिकांना सतर्क राहून सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. दूतावासाने भारतीय नागरिकांना दूतावासाच्या अधिका-यांशी संपर्कात राहण्याचे आणि त्यांनी सुचवलेल्या सुरक्षित मार्गांचा वापर करूनच इराणमधून बाहेर पडण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, कोणत्याही भारतीय नागरिकाने दूतावासाचा सल्ला न घेता कोणत्याही आंतरराष्ट्रीय सीमेकडे जाण्याचा प्रयत्न करू नये, अशी कडक सूचना देण्यात आली आहे. कोणत्याही सीमेकडे जाण्यापूर्वी दूतावासाशी समन्वय साधणे अनिवार्य असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## पश्चिम बंगालमध्ये मतदानाच्या टक्केवारीत प्रथमच घट; एसआयआरनंतर ६.७५ कोटी मतदार

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, राज्यातील एकूण मतदारसंख्येत प्रथमच घट झाली आहे. २०११ पासून सातत्याने वाढत असलेली मतदारसंख्या आता अंदाजे ६.७५ कोटींवर आली आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांच्या कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या अंतिम पुरवणी यादीच्या विश्लेषणातून ही माहिती समोर आली आहे.

आकडेवारीनुसार, २०११ मध्ये, जेव्हा डाव्या आघाडीचे ३४ वर्षांचे राज्य संपुष्टात आले आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे (टीएमसी) सरकार सत्तेवर आले, तेव्हा राज्यात अंदाजे ५.६२ कोटी मतदार होते. त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकीत मतदारांची संख्या सातत्याने वाढत गेली आहे.



■ **निवडणूक वर्षानुसार मतदारांची संख्या**

**२०११ (विधानसभा निवडणुका) अंदाजे ५.६२ कोटी**

२०१४ (लोकसभा निवडणुका)
■ अंदाजे ६.२७ कोटी

२०१६ (विधानसभा निवडणुका)
■ अंदाजे ६.५८ कोटी

२०१९ (लोकसभा निवडणुका)
■ अंदाजे ६.९८ कोटी

२०२१ (विधानसभा निवडणुका) ■ अंदाजे ७.३३ कोटी

२०२४ (लोकसभा निवडणुका)
■ अंदाजे ७.६० कोटी

मात्र, गेल्या नोव्हेंबरमध्ये सुरू झालेली बंगालमधील एसआयआर (SIR) प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ही संख्या आता ६.७५ कोटींवर आली आहे.

राजकीय पक्षांनी यापूर्वी असा आरोप केला होता की, नवीन आणि प्रथमच मतदान करणा-या मतदारांची नावे समाविष्ट केली जात असताना, मृत, स्थलांतरित, बेपत्ता आणि दुहेरी नावे असलेल्या मतदारांना वगळण्याची प्रक्रिया प्रभावीपणे पार पाडली जात नव्हती.निवडणूक विश्लेषकांच्या मते, या पुनर्तपासणीदरम्यान मृत, स्थलांतरित, बेपत्ता, दुबार आणि बनावट मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळण्यात आली, ज्यामुळे मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीय घट झाली.तज्ज्ञांच्या मते, या प्रक्रियेमुळे मतदार यादी अधिक पारदर्शक आणि शुद्ध झाली आहे, विशेषतः अशा वेळी जेव्हा राज्यात या महिन्यात दोन टप्प्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत.

## देशभरात 9 ते 23 एप्रिल दरम्यान 8 वा पोषण पंधरवडा साजरा केला जाईल

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था :** केंद्र सरकार ९ ते २३ एप्रिल दरम्यान देशभरात ८वा पोषण पंधरवडा २०२६ साजरा करत आहे. या वर्षीची संकल्पना 'आयुष्याच्या पहिल्या सहा वर्षांत मेंदूचा विकास जास्तीत जास्त करणे' ही आहे, ज्याचा उद्देश मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एक मजबूत पाया घालणे आहे. ही मोहीम 'कुपोषणमुक्त भारत' या ध्येयाला बळकटी देईल आणि जनजागृती व सामुदायिक सहभागाला प्रोत्साहन देईल.



केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयानुसार, या पंधरवड्याचा राष्ट्रीय शुभारंभ ९ एप्रिल रोजी दिल्लीतील विज्ञान भवन येथे दुपारी ३ ते ४ या वेळेत होईल. या कार्यक्रमाचे नेतृत्व केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी करतील. यावेळी राज्यमंत्री सावित्री ठाकूर आणि विभागाचे सचिव अनिल मलिक हे देखील उपस्थित राहणार आहेत. 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफर्मवर माहिती देताना, मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी स्पष्ट केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखालील 'मिशन पोषण २.०' या कार्यक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. त्यांनी सांगितले की, मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये पोषण आणि काळजी अधिक मजबूत करण्यावर या उपक्रमाचा भर आहे. पोषण पंधरवड्यादरम्यान, देशभरातील अंगणवाडी केंद्रांमध्ये माता, पालक, कुटुंबे आणि स्थानिक संस्थांच्या सहभागाने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाईल. यामध्ये पोषण पंचायती, जनजागृती मोहीम, सुरुवातीच्या टप्प्यातील उत्तेजन देणारे उपक्रम, खेळावर आधारित शिक्षण आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणा-या कार्यक्रमांचा समावेश असेल. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील उत्कृष्ट उपक्रम देखील प्रदर्शित केले जातील आणि अंगणवाडी सेविकांच्या योगदानाचा गौरव केला जाईल.हा कार्यक्रम एनआयसी वेबकास्ट प्लॅटफार्म आणि मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर थेट प्रसारित केला जाईल.मंत्रालयाच्या मते, मुलाच्या आयुष्यातील पहिल्या सहा वर्षांत मेंदूचा सुमारे ८५ टक्के विकास होतो. परिणामी, पहिले १,००० दिवस पोषण, काळजी आणि शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण मानले जातात. या वर्षीच्या मोहिमेत माता व बालकांचे पोषण, स्तनपान आणि पूरक आहार यावर विशेष भर दिला जाईल. याव्यतिरिक्त ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांसाठी संवेदनशील काळजी आणि प्रारंभिक शिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल, तर ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी खेळावर आधारित शिक्षणाला चालना दिली जाईल.

## अर्जेंटिना दौ-यासाठी भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा

**नवी दिल्ली-** भारतीय महिला हाकी संघाच्या अर्जेंटिना दौ-यासाठी हाकी इंडियाने २४ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. हा दौरा १३ ते १७ एप्रिल २०२६ दरम्यान भारतीय संघाचा हा दौरा असणार आहे. या दौ-यात भारत यजमानांविरुद्ध चार सामन्यांची मालिका खेळणार आहे. एफ. आय. एच. हाकी विश्वचषक २०२६ आणि आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी हा दौरा महत्त्वपूर्ण असणार आहे. संघाकडे अनुभवी आणि तरुण हाकिपटूंचा चांगला समतोल आहे. आपल्या शांत स्वभावासाठी आणि उत्कृष्ट खेळासाठी ओळखल्या जाणा-या मिडफिल्डर सलीमा टेटे यांनी पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व केले आहे. या दौ-यासाठी दुखापतीतून सावरल्यानंतर दीपिका संघात परतली आहे. तिच्या पुनरागमनामुळे पेनल्टी कार्नरवर संघ मजबूत होईल. तिच्या अनुपस्थितीत, नवनीत कौर, मनीषा चौहान, उदिता आणि अन्नू यांसारख्या हाकीपटूंनी उत्कृष्ट कामगिरी केली होती.अनुभवी सविताचे पुनरागमन हा संघासाठी दिलासा आहे. अलीकडील पात्रता स्पर्धेत तिच्या अनुपस्थितीत बिचू देवीने उत्कृष्ट कामगिरी करून तिची योग्यता सिद्ध केली होती. ज्योती आणि मुमताज खान यांचे बचावात पुनरागमन देखील संघाला आणखी मजबूती देणार आहे. त्याचबरोबर बलजित कौर, वैष्णवी फाळके, ऋतुजा पिसाल, इशिका आणि साक्षी राणा यांसारख्या युवा हाकीपटूंवरही सर्वांचे लक्ष असेल.



## माजी केंद्रीय मंत्री मोहसिना किदवई यांचे बुधवारी निधन

**नवी दिल्ली-**काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसिना किदवई यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, वयाच्या ९४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बुधवारी सकाळी नोएडा येथील मेट्रो रुग्णालयात मोहसिना किदवई यांचे निधन झाले. किदवई या माजी केंद्रीय मंत्री होत्या आणि त्यांनी राजीव गांधी यांच्या सरकारमध्ये महत्त्वाची खाती सांभाळली होती. त्यांनी वेळोवेळी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांच्या सदस्य म्हणून काम केले आहे.किदवई यांनी पूर्वी काँग्रेस कार्यकारिणी समिती आणि पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या सदस्य म्हणूनही काम केले आहे. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एका दीर्घ आणि प्रभावशाली पर्वाचा अंत झाला आहे. अनेक दशके राजकारणात सक्रिय राहून स्वतःला वेगळे सिद्ध करणा-या काही मोजक्या नेत्यांपैकी त्या एक होत्या.मोहसिना किदवई यांचा जन्म १९३२ मध्ये उत्तर प्रदेशातील एका सुशिक्षित आणि प्रतिष्ठित कुटुंबात झाला होता. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला आणि राजकारणात लवकरच आपले मजबूत स्थान निर्माण केले. त्या सुरु वातीपासूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी संबंधित होत्या आणि पक्षाची धोरणे व विचारधारा पुढे नेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.त्यांची राजकीय कारकीर्द दीर्घ आणि वैविध्यपूर्ण होती. त्यांनी अनेक वेळा लोकसभा आणि राज्यसभेच्या सदस्य म्हणून काम केले आणि केंद्र सरकारमध्ये विविध महत्त्वाची खाती सांभाळली. त्यांनी नगरविकास, पर्यटन आणि गृहनिर्माण यांसारख्या मंत्रालयांमध्ये मंत्री म्हणून काम केले आणि आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये योगदान दिले.



## महाराष्ट्रात कन्नड भाषेतून 'टीईटी' घेण्याची मागणी; सरकारला पत्र

**सोलापूर, ०८ एप्रिल, (हिं.स.)।** महाराष्ट्रातील कन्नड माध्यमाच्या शाळांमध्ये कार्यरत असलेल्या हजारो शिक्षकांच्या हितासाठी, शिक्षक पात्रता परीक्षा (ट्क्ह) कन्नड माध्यमातूनही आयोजित करण्यात यावी, अशी विनंती कर्नाटक सरकारच्या मुख्य सचिव ड?. शालिनी रजनीश यांनी महाराष्ट्र सरकारकडे पत्राद्वारे केली आहे. या संदर्भात 'आदर्श कन्नड-बळग, महाराष्ट्र' या संघटनेने कर्नाटक सीमा क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे पत्र लिहून सीमाभागातील कन्नड भाषिकांवर होणा-या अन्यायाकडे लक्ष वेधले होते. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, कर्नाटकच्या मुख्य सचिवांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना मंगळवारी पत्र लिहून तातडीने पावले उचलण्याची विनंती केली आहे.

● **अहवालातील प्रमुख मुद्दे:**

घटनात्मक हक्कांचे संरक्षणः महाराष्ट्रातील जत, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर यांसह विविध भागांत सुमारे ३७७ कन्नड माध्यमाच्या शाळा असून, त्यात ४४,८६० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संविधानाच्या कलम ३५० अ नुसार भाषिक अल्पसंख्याकांना त्यांच्या मातृभाषेतून परीक्षा देण्याचा अधिकार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

● **मुदतवाढीची विनंती:** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार २०२७ पर्यंत सर्व शिक्षकांनी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. महाराष्ट्रात सध्या टीईटी अर्जासाठी १६ एप्रिल ही शेवटची तारीख असून, तातडीने कन्नड माध्यमाचा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

## रेपो दर कायम; ग्राहकांना दिलासा पण महागाईची चिंता मात्र कायम

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) ने एप्रिल २०२६ च्या चलनविषयक धोरण बैठकीत रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला असून न्यूट्रल भूमिका जाहीर केली आहे. जागतिक पातळीवरील अनिश्चितता, विशेषतः पश्चिम आशियातील संघर्ष आणि वाढत्या उर्जा किमतींचा विचार करून आरबीआयने हा निर्णय घेतला आहे. महागाई सध्या नियंत्रणात असली तरी उर्जा दरवाढ आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे पुढील काळात जोखीम वाढण्याची शक्यता असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. त्यामुळे व्याजदरात तातडीने बदल करण्याऐवजी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या निर्णयामुळे ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.इनक्रेड मनीच्या विश्लेषणानुसार, मागील दरकपातीचा परिणाम अद्याप कर्जदरांमध्ये दिसून येत असून सध्या कर्जदारांवर अतिरिक्त व्याजाचा भार पडणार नाही. सध्याची परिस्थिती ही मागणीपेक्षा पुरवठ्याशी संबंधित असल्यामुळे व्याजदर कमी करून त्यावर तातडीने परिणाम होणार नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे गृहकर्ज, शिक्षण कर्ज आणि ग्राहक कर्ज घेणा-यांसाठी स्थिरता कायम राहणार आहइन्फोमेरिक्स रेटिंग्जचे मुख्य अर्थतज्ज्ञ डा. मनोरंजन शर्मा यांनी सांगितले की, स्थिर व्याजदरामुळे घरगुती खर्च आणि गुंतवणुकीचे निर्णय अधिक आत्मविशवासाने घेता येतात. यामुळे अर्थव्यवस्थेला सकारात्मक आधार मिळतो. त्याचप्रमाणे इंडियाफर्स्ट लाइफच्या मुख्य गुंतवणूक अधिकारी डा. पूनम टंडन यांनीही हा निर्णय अपेक्षेप्रमाणे असल्याचे सांगितले असून वाढत्या महागाईच्या जोखमींच्या पार्श्वभूमीवर आरबीआय पुढील काळात डेटा-आधारित निर्णय घेईल, असे मत व्यक्त केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, ही भूमिका अर्थव्यवस्थेच्या वाढीस पूरक असून इक्विटी आणि बाँड



बाजारासाठी सकारात्मक संकेत देणारी आहे.दरम्यान, महागाईबाबतची चिंता अद्याप कायम आहे. इनक्रेड मनीच्या मते, शहरी ग्राहकांच्या महागाईच्या अपेक्षा सुमारे ८.५ टक्क्यांपर्यंत वाढल्या आहेत, तर सध्याचा महागाई दर जवळपास ३.२ टक्के आहे. यावरून भविष्यातील किंमतवाढीबाबतची चिंता स्पष्ट होते. ग्रामीण भागातही अन्न आणि इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.आरबीआयच्या अंदाजानुसार, २०२६-२७ या आर्थिक वर्षात जीडीपी वाढ ६.९ टक्क्यांपर्यंत राहण्याची शक्यता आहे. उर्जा किमतींतील वाढ आणि पुरवठा साखळीतील अडचणींमुळे वाढीवर काहीसा दबाव येउ शकतो, मात्र देशांतर्गत मागणी मजबूत असल्याने अर्थव्यवस्था स्थिर राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. एकूणच, आरबीआयचा रेपो दर कायम ठेवण्याचा निर्णय ग्राहकांसाठी स्थैर्य आणि दिलासा देणारा असला तरी महागाई आणि जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पुढील काळात आव्हाने कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांनी खर्च आणि गुंतवणूक करताना सावध आणि विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे..

## व्हिएतनामच्या कंपनीची महाराष्ट्रात ६.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

**मुंबई/प्रतिनिधी :** शाश्वत नागरी विकास, औद्योगिक व पर्यटन वृद्धी, नवीकरणीय उर्जा क्षमता आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्रात व्हिएतनाममधील विन ग्रुप जाईंट स्टाक कंपनी महाराष्ट्रात सुमारे ६.५ अब्ज अमेरिकन डालर्सची गुंतवणूक करणार आहे. यासंदर्भात विन ग्रुप कंपनीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत सामंजस्य करार केला. विन ग्रुप कंपनीच्या गुंतवणुकीमुळे राज्यात शाश्वत विकास, हरित उर्जा, आधुनिक पायाभूत सुविधा आणि गतिशील वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डा. संजय मुखर्जी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन आणि विन ग्रुपचे (आशिया ऑपरेशन्स) मुख्य कार्यकारी अधिकारी फाम सान्ह चाउ यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात सुरू असलेल्या विकासाच्या पार्श्वभूमीवर विन ग्रुपचे महाराष्ट्रात येणे ही आनंददायी आणि सन्मानाची बाब आहे. कंपनी योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी गुंतवणूक करत असून मुंबई व रायगड परिसर हा भविष्यात जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा सर्वात गतिमान शहरी भाग ठरणार आहे. प्रकल्प सुरू झाल्यानंतर सशक्त आणि गतिमान शहरी वातावरण निर्माण होईल. राज्य शासनाची संपूर्ण यंत्रणा गुंतवणूकदारांना पूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन देत कोणतीही अडचण आल्यास संबंधित अधिका-यांसोबत तसेच थेट संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. मागील काही वर्षांच्या अनुभवावरून राज्य प्रशासन कोणतीही समस्या सोडवण्यास सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले. विनग्रुप कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी फाम सान्ह चाउ म्हणाले की, आम्हाला महाराष्ट्र शासन आणि एमएमआरडी व उद्योग विभागासोबत या महत्त्वाच्या प्रकल्पात सहभागी होताना आनंद आणि अभिमान वाटतो. महाराष्ट्र हा आशियातील वेगाने प्रगती करणारा आणि मोठी संधी असलेला प्रदेश आहे. आमच्या विनग्रुप कंपनीकडे एकात्मिक शहरी विकास, इलेक्ट्रिक वाहतूक आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये जागतिक अनुभव आहे. दीर्घकालीन आर्थिक विकास, पर्यावरणाचे संरक्षण आणि लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी आम्ही दर्जेदार आणि उत्तम सुविधा देण्यास कटिबद्ध आहोत.एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेशाला पायाभूत सुविधांच्या विकासाच्या जोरावर आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीतून जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आर्थिक केंद्र बनवण्यास एमएमआरडीए कटिबद्ध आहे. विनग्रुप कंपनी सोबतचे हे सहकार्य आमच्या पुढील पिढीच्या शहरी विकासाच्या दृष्टीकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. यामध्ये मुंबई ३.० आणि एमएमआरडीए विकसित करत असलेल्या नवीन विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) क्षेत्रांचा समावेश आहे.


# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## संकटात उद्योग आणि ग्राहक

**वाढत्या उत्पादन खर्चामुळे फुटवेअर उद्योग संकटात सापडला आहे. महाग होत जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतींमुळे पुरवठा साखळीत व्यत्यय आला. ऊर्जेच्या कमी पुरवठ्यामुळे या उद्योगाला अनेक संकटाना सामोरे जावे लागत आहे. रबर आणि रसायनांचा उत्पादन खर्च युद्धामुळे ४० ते ७० टक्के वाढला.त्यामुळे अनेक कारखान्यांत कामगार उपलब्ध नाही. तसेच अनेक युनिट्सची कार्यान्वयन क्षमता निम्मीही राहिली नाही. सर्वात मोठा प्रश्न आहे तो या उद्योगाला लागणारा गॅस. गीसच्या तुटवड्यामुळे ८० टक्केच काम करण्यास सांगण्यात आले. फुटवेअर उद्योगाचे घटक आहेत ते म्हणजे रबर, रसायने आणि इतर साहित्य. यांना इनपुट म्हणजे उत्पादन खर्चात गणले जाते. पण हा उत्पादन खर्च युद्धामुळे ६० टक्के वाढला. त्यामुळे अनेक उद्योग बंद पडले. काही अर्ध्या क्षमतेनुसार काम करत आहे. फुटवेअर उद्योग हा एमएसएमई क्षेत्रात मोडतो. म्हणजे लहान आणि मध्यम उद्योगाच्या वर्गवारीत. यात जे उद्योग असतात ते उत्पादन, प्रक्रिया आणि सेवा देणे यात असतात. पण युद्धामुळे सर्व एमएसएमई उद्योग संकटात सापडला. कोरोना काळात हा उद्योग सर्वाधिक संकटात सापडला होता. या उद्योगासाठी लागणारी उपकरणे आणि संयंत्रे यांवर गुंतवणूक २५ कोटींच्या वर जात नसते. कोरोना काळातही याच उद्योगाला सर्वाधिक मार पडला होता आणि बरेचसे व्यावसायिक कारखाने बंद करून स्वस्थ बसले होते. कारण कामगारांचा तुटवडा होता. आता कच्चा मालाचा तुटवडा जाणवतो आहे. पण परिणाम तोच आहे. कामगार बेरोजगार होणे आणि उद्योग संकटात पडणे. संपूर्ण देशभर युद्धाचे चटके जाणवत आहेत आणि त्याबरोबरच कामगारांचा तुटवडाही. नॉयडा जेथे फुटवेअर उद्योग जोरात आहे. तेथे कामगारांचा तुटवडा जाणवण्याइतपत गंभीर परिस्थिती निर्माण झाली. आग्रा, चेन्नई आणि अंबुर तसेच रानीपेट हे भाग फुटवेअर उद्योगाचे सर्वात विशाल हब म्हणून गणले जातात. त्यातही आग्रा हे सर्वाधिक देशांतर्गत केंद्र असून ६५ टक्के मागणी तेथूनच येते. पण या सर्वांनाच आता गॅसची टंचाई आणि कामगारांची अनुपस्थिती जाणवत आहे. काही उद्योग तर मान टाकण्याच्या बेतात आहेत, तर नॉयडा हे फॅशन फुटवेअरमध्ये अग्रगण्य मानले जाते. पण साराच उद्योग संकटात आहे आणि प्रत्येकालाच संकटाची झळ लागली आहे. युद्धाचा दुहेरी परिणाम झाला आहे तो म्हणजे पादत्राणांच्या किमतीत ६० टक्के वाढ झाली आहे आणि निर्यात उतरली आहे. हा दुहेरी मार आहे. पण याचे कॅस्कडिंग परिणाम भयंकर आहेत. ते आहेत कामगारांना उपजीविकेचे साधन मिळू शकत नाही आणि पेट्रोलियम आधारित रसायनांचा तुटवडा असल्याने संपूर्ण चामडे उद्योगाला फटका बसला आहे. याचा परिणाम या वस्तू तर महाग होतातच पण निर्यातीतून मिळणारा देशाला होणारा लाभमिळू शकत नाही. केंद्र सरकारने नुकतीच नोटीस काढली आहे आणि ७.५ टक्के आयात ड्युटी हटवली आहे. पण चर्मोद्योग त्या यादीत नाही.एक बाब निश्चित आहे की, पादत्राणे उद्योगाला युद्धाची चांगलीच झळ बसली. सध्या जे पेट्रोकेमिकल पुरवठा व्यत्यय येत आहेत त्यांचा दबाव जागतिक पुरवठा साखळीवर होत आहे. त्यामुळे पादत्राणे इकोसिस्टीमवरच दबाव येत आहे आणि त्याचा परिणाम किमतींवर होत आहे. सध्या चालू असलेल्या इराण-अमेरिका-इस्त्रायल तणावामुळे फुटवेअर उद्योगाला थेट फटका बसला. त्याचा उत्पादन खर्च वाढला. अनेक उद्योजकाना तो परवडणारा नाही आणि ज्याप्रमाणे कोरोना साथीच्या काळात अनेक कारखाने बंद पडले होते तशीच स्थिती उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बरेचसे उद्योग आता काही दिवसांसाठी तरीही उद्योगातून बाहेर पडतील.पण यावर उपाय सरकारला शोधावा लागेल आणि तो आहे उत्पादकाना एक अब्ज डॉलरचे पॅकेज सरकारला जाहीर करावे लागेल. त्यामुळे उत्पादकांची वाढत्या उत्पादन खर्चापासून सुटका होईल. पश्चिम आशिया युद्ध हा तर तात्कालिक परिणाम आहे, पण उत्पादकांना अमेरिकेच्या टॅरिफमुळेही अगोदर संकटाला सामोरे जावे लागले होते. त्यावर सरकारने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आणि कच्च्या मालावरील ७.५ टक्के आयात शुल्क कमी केले. ज्यात पेट्रोलियम आधारित रबर आणि सिंथेटिक म्हणजे कृत्रिम साहित्य यांचा समावेश होतो. दुसरा सर्वात महत्त्वाचा उपाय आहे तो म्हणजे देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे. स्थानिक पातळीवर उत्पादन वाढवणे आणि त्यांचाच जास्तीत जास्त उपयोग करून हे क्षेत्र पुन्हा एकदा आपल्या जुन्या वैभवाला आणणे. काही उपाय उत्पादनाशी निगडित आहेत. ते म्हणजे धोरणात्मक उपाय. यात कामगारांना इन्सेंटिव्ह देणे आणि लाभांशाचे प्रमाण उत्पादनाशी संबंधित ठेवणे आणि उत्पादन क्षमता वाढवणे. विशेषतः बिगर चर्मोद्योग वस्तूंच्या बाबतीत असे काही उपाय आहेत, जे सरकारने करायला हवेत. भारत आता महत्त्वपूर्ण पॅकेज जाहीर करण्याच्या बेतात आहे. संपूर्ण फुटवेअर उद्योगाची पुरवठा साखळी वाढवणे. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण फुटवेअर उद्योग भारताच्या जीडीपीमध्ये एकूण दोन टक्के वाटा उचलतो. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक असल्याने आणि ४.४ दशलक्ष कामगारांना रोजगार देत असल्याने त्याच्याकडे दुर्लक्ष करून कोणत्याच सरकारला चालणार नाही.**

## उन्हाळ्यात पावसाची रिमझिम



**शेतकऱ्याचे गेल्या पाच-दहा वर्षांत झालेले नुकसान यावर्षी निश्चितपणे भरून निघेल. परंतु, तसे घडले नाही. शेतकरी आडाखे बांधत असतानाच त्याच्या मनातील बंगला कधीचाच मोडून पडला. पण, तरीही डोक्यात राग घेऊन बागेतील झाडावर त्याने जेसीबी फिरवला नाही. जेव्हाजेव्हा संकटे येतात, तेव्हातेव्हा हा शेतकरी त्याच तडफेने संघर्ष करत उभा राहातो.**

कोकणात यावर्षी नोव्हेंबर अखेरपर्यंत पाऊस कोसळत होता. पाऊस पडत असल्याने थंडीचा हंगामही लांबला. कोकणात पिकणारा आंबा, काजू, कोकम, सुपारी, नारळ, फणस या सर्व फळांचे त्या-त्या हंगामात चांगले पीक येते. मात्र हवामानाच्या बदलाचा परिणाम यंदा आंबा, काजूवर झाला आहे. कोकणातील आंबा बागायतदार शेतकरी सहकारी सोसायटी किंवा बँकाचे कर्ज घेत नाही. तो आंबा बागायतीसाठी नवी मुंबईतील फळबाजारातील मोठ-मोठ्या आंबा दलालांकडून आगाऊ रक्कम उचल म्हणून घेणाऱ्या आंबा बागायतदारांची संख्या मोठी आहे. आंबा बागायतदार आंबा दलालांकडून आगाऊ रक्कम घेतात व आंब्याचा हंगाम सुरू झाला की आंबा दलाल आगाऊ घेतलेली रक्कम आंबा बागायतदार शेतकऱ्यांच्या एकूण रकमेतून वजा केली जाते. मुंबई फळबाजारातील आंबा दलाल आंबा बागायतदारांना जी आगाऊ रक्कम देतात त्यावर काही ठरावीक व्याज लावले जाते. गेली अनेक वर्षे या पद्धतीने हा आंबा बागायतदार शेतकरी आणि फळबाजारातील आंबा दलाल यांच्यातील हा आर्थिक व्यवहार आहे. नवी मुंबईच्या फळबाजारात जाणाऱ्या आंब्याचा दर आजही आंबा दलाल रुमालाखालीच ठरवत असतात. आंबा दलाल जो दर ठरवेल त्या दराच पत्र (ज्याला पट्टी म्हणतात) किती रुपयाचे काढायचे हे दलालावर अवलंबून असते. मुंबईतील बाजारातील बाजार भावावर काढलेला दर सर्वसाधारणपणे ठरलेला असतो. यावर्षी ज्या आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी दलालांकडून आगाऊ रक्कम घेतली आहे ते बागायतदार शेतकरी कमालीचे अडचणीत सापडले आहेत. एकतर यावर्षी आंबा पीक दहा-पंधरा टक्के इतकेच आहे. त्यामुळे आंबा बागायतदार शेतकऱ्याने बागायतीवर केलेला खर्च, काढलेले कर्ज या अशा आर्थिक संकटात शेतकरी सापडला आहे. आंबा दलालांनी आंबा बागायतदार शेतकऱ्यांना जरी घेतलेल्या आगाऊ रक्कमेवरील व्याज दरात सवलत दिली असली तरी घेतलेल्या पैशांची परतफेड करणे अवघड बनले आहे.

कोकणातील सर्वसामान्य शेतकरी कधी फसवणूक करण्याच्या मानसिकतेत नसतो. घेतलेल्या पैशांची परतफेड केलीच पाहिजे ही त्याची मानसिकता आणि वृत्ती असते. या वर्षीच्या सतत होणाऱ्या वातावरणातील बदलाने बागायतदार शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. सुरुवातीला शेतकऱ्याला वाटलेले गेल्या पाच-दहा वर्षांत झालेले नुकसान यावर्षी निश्चितपणे भरून निघेल; परंतु तसे घडले नाही. अवकाळी पाऊस होतच असतो. यामुळे शेतकऱ्याला जे थोडफार मिळणार आहे ते देखील हातचे निघून जाते. बरे कोकणातच आंबा, काजू, कोकम प्रत्येक गावो-गावी वेगळे अनुभव आहेत. काही ठिकाणी पीक आलेच नाही तर काही भागात काही शेतकऱ्यांना दामदुप्पट फायदा होईल हे ७ नंबर काजू बी च्या बाबतीत घडले. रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंब्याच्या बाबतीत मात्र सर्वत्रच १५ जे २० टक्के इतकेच आंबा झाला. शासनाने कोकणातील आंबा, काजू बागायतदारांसाठी नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये वारंवार नुकसान भरपाई शेतकऱ्यांना दिली जाते. कोकणातील आंबा, काजू बागायतदार यावेळी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे कोकणातील आंबा, काजू बागायतदार शेतकऱ्याला मदत देताना इतरवेळचे निकष लागू करण्यात येऊ नयेत. वेगळे निकष लावले पाहिजे.

तुटपुंजी मदत न देता दामदुप्पट मदत देण्यात यायला हवी. तरच कोकणातील शेतकरी या अस्मानी संकटातून सावरू शकेल. काजूच्या बाबतीत तर काही भागात काजूचे उशिराचे पीक थोडेफार चांगले येण्याची शक्यता होती; परंतु मध्येच मागील चार दिवसांत चार-सहा वेळा पाऊस पडला. एकिकडे एप्रिल महिना सुरू झाल्याने कोकणात बऱ्यापैकी वातावरण उष्ण आहे. कडक उन्हाळ्यात पावसाचा शिडकावा सुरू आहे. यामुळे वातावरण अधिकच उष्ण बनले आहे. या वातावरणाने नेमका काजू, आंब्याला कोणता फायदा होणार की नोटा हेचमुळी शेतकऱ्यांना ठरवणे कठीण झाले आहे.

बदलत्या वातावरणाच्या परिणाम काही कीटकांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने त्यावर उपाय म्हणून कीटकनाशकांचा वापर केला जात आहे. मात्र, या कीटकनाशकांचा कोणताच प्रभाव न जाणवल्याने उलट कीटकनाशकांवर दामदुप्पट खर्च झाला आहे. तो झालेला खर्चही बागायतदार शेतकऱ्याला मिळणाऱ्या उत्पन्नातूनही उलट तोटाच सहन करावा लागण्याची शक्यता अधिक आहे. पूर्वी कोकणातील मालवणी मुलखात शेतकरी म्हणायचे 'ऊन आणि पाऊस कोल्याचा लगीन' आता हे सारे गंमतीने म्हणण्या एवढाही आनंद कोकणातील शेतकऱ्याकडे उरलेला नाही. कोकणात प्रखर उन्हाच्या होरपळीने आणि पावसाच्या शिडकाव्याने जरी वातावरण काहीस आल्हाददायक बनवले तरी कोकणातील शेतकरी मात्र आता पुढे करायच काय याच चिंतेत आहे.

**संतोष वायंगणकर**

## ममतांच्या 'सुरक्षा कवचा'ला तडे



मॅट्रिझ आणि इंडिया टीव्हीने प्रसिद्ध केलेल्या ताज्या ओपिनियन पोलने देशातील राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. केरळ आणि तामिळनाडूमध्ये अटीतटीच्या संघर्षाचे संकेत मिळत असताना, आसाममध्ये मात्र पुन्हा एकदा कमळ फुलताना दिसत आहे. मात्र, संपूर्ण देशाचे डोळे लागले आहेत ते 'बदला'च्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या पश्चिम बंगालकडे. या ओपिनियन पोलनुसार, बंगालमध्ये यावेळी मोठी राजकीय उलथापालथ होऊन सत्तांतर होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.ओपिनियन पोलच्या अंदाजानुसार, पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या २९४ जागांपैकी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला १४० ते १६० जागा मिळण्याची शक्यता आहे, तर भारतीय जनता पक्ष १३० ते १५० जागांसह त्यांच्या मानेवर श्वास रोखून उभा आहे. ८ ते १६ जागा इतर पक्षांच्या पदरात पडू शकतात. २०११ पासून सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्यासाठी ही आकडेवारी धोक्याची घंटा मानली जात आहे.

पश्चिम बंगालच्या राजकारणाचा इतिहास नेहमीच रक्तरंजित संघर्षाचा राहिला आहे. ६० च्या दशकापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व, त्यानंतर सलग तीन दशके डाव्यांची अभेद्य भिंत आणि २०११ पासून ममता बॅनर्जींचा एकछत्री अंमल. ज्या 'साम, दाम, दंड, भेद' नीतीचा वापर करून ममतांनी डाव्यांचे साम्राज्य उद्ध्वस्त केले, त्याच तंत्राने त्यांनी गेल्या १५ वर्षांपासून आपली सत्ता राखली आहे. मात्र, २०२१ ची 'अस्तित्वाची लढाई' जिंकल्यानंतर आता २०२६ ची निवडणूक बंगालच्या 'सामाजिक सुरक्षिततेची' आणि 'प्रशासकीय पारदर्शकतेची' सर्वात मोठी परीक्षा ठरणार आहे.

२०२१ मध्ये तृणमूलच्या विजयाचा सर्वात मोठा आधारस्तंभ 'महिला मतदार' होत्या. 'लक्ष्मी भंडार' सारख्या कल्याणकारी योजनांनी ममतांना एक भक्कम सुरक्षा कवच दिले होते. मात्र, २०२६ मध्ये हेच कवच धोक्यात आले आहे. कोलकाता येथील आर.जी. कर मेडिकल कॉलेजमधील शिकाऊ डॉक्टरवर झालेला अमानवीय अत्याचार आणि हत्येच्या घटनेने केवळ शहरी नव्हे, तर ग्रामीण भागातील महिलांमध्येही प्रचंड संताप निर्माण केला आहे. पीडितेची आई रत्ना देबनाथ यांनी स्वतः निवडणूक लढवण्याचा घेतलेला निर्णय हा 'न्यायासाठीचा लढा' म्हणून अधोरेखित होत असून, तो सत्ताधाऱ्यांची झोप उडवणारा ठरू शकतो. केवळ शहरच नाही, तर उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखली येथील घटनांनी ग्रामीण बंगाल हादरवून सोडला आहे. स्थानिक नेत्यांकडून महिलांवर झालेले अत्याचार आणि शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्याचे प्रकार यामुळे तृणमूलची प्रतिमा डागाळली आहे. 'रीक्लेम द नाईट' सारख्या आंदोलनांनी महिला सुरक्षेला केवळ सामाजिक मुद्दा न ठेवता निवडणुकीचा मुख्य अजेंडा बनवले आहे.

दुसरीकडे, भ्रष्टाचार आता केवळ स्थानिक नेत्यांच्या 'कट मनी'पुरता मर्यादित राहिला नसून, तो 'संस्थात्मक घोटाळ्यांच्या' रूपात समोर आला आहे. शिक्षक भरती घोटाळ्यात माजी मंत्री पार्थ चॅटर्जी आणि रेशन वाटप घोटाळ्यात ज्योतिप्रिया मल्लिक यांच्यासारख्या बड्या नेत्यांना झालेली अटक ही तृणमूलसाठी सर्वात मोठी डोकेदुखी ठरली आहे. २०२१ मध्ये मुख्य लढत भाजप आणि तृणमूलमध्ये एकवटली होती, ज्यामुळे डावे आणि काँग्रेस भुईसपाट झाले होते. परंतु २०२६ मध्ये ए.आय.एम.आय.एम आणि हुमायून कबीर यांच्या 'कौमी अधिकार मंच'च्या युतीमुळे त्रिकोणी संघर्षाचे चित्र निर्माण झाले आहे. यामुळे अल्पसंख्याक मतांचे विभाजन होण्याची दाट शक्यता आहे. जर ही हक्काची मते विभागली गेली, तर तृणमूलचे अनेक बालेकिल्ले ढासळू शकतात.

निवडणूक आयोगाने यावेळी केवळ दोन टप्प्यांत २३ आणि २९ एप्रिल मतदान घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रचाराचा कालावधी अत्यंत मर्यादित झाला असून, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी राजकीय पक्षांची मोठी ओढाताण होणार आहे.आज रस्ते आणि पायाभूत सुविधा झाल्या असल्या, तरी मोठे उद्योग आणि रोजगाराच्या बाबतीत बंगाल अजूनही पिछाडीवर असल्याची भावना सुशिक्षित तरुणांमध्ये प्रबळ आहे. महिलांचे 'सुरक्षा कवच' ममता दीदींच्या पाठीशी उभे राहते की भ्रष्टाचाराच्या चिखलात तृणमूलची नौका अडकते, हे २९ एप्रिलनंतरच स्पष्ट होईल. मात्र, एक गोष्ट नक्की, बंगालचे राजकारण आता एका निर्णायक वळणावर येऊन ठेपले आहे.

'२०२६ ची ही निवडणूक केवळ सत्तेच्या समीकरणांची नसून, ती पश्चिम बंगालच्या राजकीय अस्मितेची आणि प्रशासकीय नैतिकतेची मोठी चाचणी ठरणार आहे. तेलंगणाच्या निकालांनी हे सिद्ध केले आहे की, केवळ 'कल्याणकारी योजनांचा लाभ' मतदारांना कायमस्वरूपी बांधून ठेवू शकत नाही; तर त्यांना आर्थिक मदतीसोबतच सन्मान, सुरक्षा आणि रोजगाराच्या संधींचीही तितकीच आस असते. योजनांचा पाऊस पाडूनही जर प्रशासनात पारदर्शकता नसेल, तर मतदारांचा 'बदला' हा अटळ असतो. तृणमूल काँग्रेससाठी महिलांच्या विश्वासाचे हे 'सुरक्षा कवच' पुन्हा मिळवणे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांतून बाहेर पडणे ही आता अस्तित्वाची लढाई झाली आहे. बंगालचे मतदार आता केवळ आश्वासनांवर नाही, तर कृतीवर आधारित निकालासाठी सज्ज झाले असून, २९ एप्रिलचा कौल राज्याच्या राजकारणाला एक नवीन आणि निर्णायक दिशा देणारा ठरेल, यात शंका नाही.

**अविनाश देशपांडे**

## 'चिकन नेक'वर भारताचा मास्टरस्ट्रोक

**'चि**कन्स नेक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सामरिकदृष्ट्या संवेदनशील सिलीगुडी कॉरिडॉरमध्ये भारत एक भूमिगत रेल्वे बोगदा बांधण्याची योजना आखत आहे. अवघ्या २० ते २२ किलोमीटर रुंदीचा हा अरुंद भूभाग, ईशान्य भारताला देशाच्या उर्वरित भागाशी जोडणारा एकमेव भूमार्ग आहे. त्याची भौगोलिक असुरक्षितता आणि सामरिक महत्त्व लक्षात घेता, प्रस्तावित भूमिगत रेल्वे कॉरिडॉर हे राष्ट्रीय सुरक्षा आणि संपर्क व्यवस्था मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते.

**चिकन नेक म्हणजे काय?**

सिलिगुरी कॉरिडॉर हा पश्चिम बंगालमधील एक अरुंद भूभाग आहे, जो भारताच्या मुख्य भूमीला ईशान्येकडील आठ राज्यांशी जोडतो. याच्या सीमा नेपाळ, भूतान आणि बांगलादेशला लागून आहेत आणि तो चीनच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या चुंबी खोऱ्याच्या अगदी जवळ आहे.चिकन नेक किंवा सिलीगुडी कॉरिडॉर... हा केवळ ६० किलोमीटर लांब आणि अंदाजे २२ किलोमीटर रुंद असा प्रदेश आहे. तरीही, यात एक अशी जीवनवाहिनी आहे जी भारताच्या मुख्य भूमीला ईशान्य भारताशी जोडते. हा प्रदेश बारकाईने निरीक्षणाखाली आहे, कारण असे मानले जाते की या संवेदनशील भागाला हात लावल्यास भारतासाठी गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.

**चिकन नेक महत्त्वाचे का आहे?**

खरं तर, चिकन नेक महत्त्वाचे मानले जाते कारण येथील कोणताही गोंधळ किंवा समस्या मुख्य भारताचा ईशान्य भारताशी असलेला संपर्क खंडित करू शकते. यामुळेच, त्याच्या सभोवतालचे चार देश भूतान, नेपाळ, बांगलादेश आणि चीन जे सर्व सुमारे १०० किलोमीटरच्या अंतरावर आहेत याची पूर्ण जाणीव ठेवतात की तेथील कोणत्याही हालचालीचा भारताच्या सामरिक सुरक्षेवर थेट परिणाम होऊ शकतो. तथापि, भारत पूर्णपणे तयार आहे आणि त्याने आपल्या सामरिक क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. या बोगदा प्रकल्पामागील एक प्रमुख कारण म्हणजे सामरिक सुरक्षा. जमिनीवरील रेल्वे मार्ग उघडे असतात आणि युद्धकाळात रडार, ड्रोन किंवा उपग्रहांद्वारे ते शोधले जाऊ शकतात. यामुळे लष्करी तणावाच्या काळात ते संभाव्य हल्ल्यांसाठी असुरक्षित बनतात.रेल्वे रुळ भूमिगत करून, भारताचा एक असा सुरक्षित वाहतूक मार्ग तयार करण्याचा उद्देश आहे, जो शोधणे आणि लक्ष्य करणे कठीण असेल. हा बोगदा एक संरक्षक ढाल म्हणून काम करेल, ज्यामुळे कठीण परिस्थितीतही अत्यावश्यक पायाभूत सुविधा कार्यरत राहतील याची खात्री होईल.

**अखंड कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करणे** सिलिगुरी कॉरिडॉर केवळ सामरिकदृष्ट्या महत्त्वाचाच नाही, तर तो अत्यंत गर्दीचा देखील आहे. पूर आणि भूस्खलन यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत होऊ शकते. भूमिगत रेल्वे मार्ग ईशान्येशी अखंड कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करेल. खराब हवामान किंवा आपत्कालीन परिस्थितीतही, जीवनावश्यक वस्तू, अन्नपुरवठा, इंधन आणि वैद्यकीय मदतीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू राहील.

**लष्करी रसद आणि गतिशीलतेला चालना** प्रस्तावित बोगद्याचा मार्ग बागडोगरा हवाई दल तळ आणि लष्कराच्या बेंगडुबी छावणीजवळून जातो, जिथे भारतीय लष्कराचे ३३ कॉर्प्स आहे. या सान्निध्यामुळे हवाई आणि रेल्वे रसद पुरवठ्यामधील समन्वय लक्षणीयरीत्या सुधारेल. भूमिगत मार्गामुळे सैन्य, अवजड लष्करी उपकरणे आणि संरक्षण सामग्रीची वाहतूक कोणत्याही धोक्याशिवाय, गुप्तपणे आणि वेगाने करणे शक्य होईल. यामुळे भारताच्या ईशान्य सीमेवरील सज्जता अधिक मजबूत होईल.

**रेल्वे क्षमतेत वाढ**

सध्या, या कॉरिडॉरवरील रेल्वे वाहतूक कमी आहे आणि अनेकदा गर्दीने खचाखच भरलेली असते. नवीन प्रकल्पानुसार या कॉरिडॉरची क्षमता सहा मार्गांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. यामध्ये चार जमिनीवरील आणि दोन भूमिगत मार्गांचा समावेश असेल. यामुळे प्रवासी आणि मालगाड्यांचे स्वतंत्र व्यवस्थापन करणे शक्य होईल, ज्यामुळे कार्यक्षमता वाढेल आणि विलंब कमी होईल. वाढलेल्या रेल्वे क्षमतेमुळे ईशान्य प्रदेशात अधिक आर्थिक विकासालाही चालना मिळेल.ईशान्य भारताला देशाच्या उर्वरित भागाशी जोडणाऱ्या संवेदनशील सिलिगुडी कॉरिडॉरमधील ('चिकन नेक') सुरक्षा आणि संपर्क व्यवस्था वाढवण्यासाठी, सरकार तेथे एक लांब भुयारी रेल्वे बोगदा बांधण्याच्या योजनेवर काम करत आहे. ३५.७६ किमी लांबीचा हा बोगदा पश्चिम बंगालमधील उत्तर दिनाजपूरपासून सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या बागडोगरापर्यंत जाईल.या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट चीन सीमेजवळील पायाभूत सुविधा बळकट करणे आहे, ज्यावर भारत सरकार सातत्याने काम करत आहे. हा बोगदा युद्ध किंवा संकटकाळात देशासाठी एक सुरक्षित आणि विश्वसनीय मार्ग सुनिश्चित करेल.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल वर्धा**

९५६१५९४३०६

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

# रेल्वे प्रकल्पात गौण खनिज उत्खननाचा ५०० कोटींचा संशयित घोटाळा !

## चौकशीची मागणी तीव्र

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वर्धा–यवतमाळ–नांदेड या बहुचर्चित रेल्वे प्रकल्पात अवैध गौण खनिज उत्खननाचा मोठा घोटाळा झाल्याचा आरोप समोर आला असून, याची व्याप्ती तब्बल 500 कोटी रुपयांपर्यंत असल्याचा दावा सामाजिक कार्यकर्ते अमोल कोमावार यांनी केला आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या ईटीएस मोजणी मध्ये धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत.

प्राथमिक अहवाल नुसार, कळंब तालुक्यात सुमारे 23 कोटी रुपये तर यवतमाळ तालुक्यात 62 कोटी रुपयांचे अवैध उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र ही मोजणी केवळ रेल्वे ट्रॅक पुरती मर्यादित असून, ट्रॅकच्या दोन्ही बाजूंना डोंगर पोखरून मोठ्या प्रमाणात गौण खनिज काढण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे प्रत्यक्ष उत्खनन यापेक्षा कितीतरी अधिक असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.यवतमाळ तालुक्यातील कारली ते गोधनी या 17 किमी पट्ट्यात सुमारे 8.90 लाख ब्रास गौण खनिज उत्खनन झाल्याचे समोर आले असून, शासन दरानुसार त्याची किंमत 62 कोटींपेक्षा अधिक आहे.

अजून 16 किमी पट्ट्याची मोजणी बाकी असल्याने एकूण घोटाळा अधिक मोठा असण्याची शक्यता आहे.दरम्यान, 27 ऑगस्ट 2020 पासून या संदर्भात तहसीलदार ते जिल्हाधिकारी स्तरापर्यंत तक्रारी देण्यात आल्याचे कोमावार यांनी सांगितले. मात्र, याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच शासनाची कोट्यवधींची रॉयल्टी बुडविण्यास कारणीभूत ठरलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. "ईटीएस मोजणी करून जर 500 कोटींपेक्षा कमी उत्खनन आढळले, तर माझ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा," असे थेट आव्हानही कोमावार यांनी सरकारला दिले आहे.

### १७ किमी पट्ट्यातील मोजणीचा तपशील

कारली ते गोधनी या 17 किमी रेल्वे लाईनवर सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या मोजणी नुसार अंदाजे 8,90,506 ब्रास गौण खनिज उत्खनन झाले आहे. रेल्वे प्रशासनाच्या अहवालानुसार, या पैकी 8,93,823 ब्रास उत्खनन अधिकृत कामासाठी करण्यात आले होते. त्यातील काही खनिज भरावा साठी वापरण्यात आले, तर 2,87,357 ब्रास शिल्लक राहिल्याचे नमूद करण्यात आले आहे. या शिल्लक खनिजाचा परतावा संबंधित कंत्राटदाराला देण्यात आल्याचे रेल्वेने स्पष्ट केले आहे. आता या कंत्राटदारांची माहिती मागविण्यात आली असून, त्यांना नोटीस बजावून या खनिजाचा वापर कशासाठी केला याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात येणार आहे. अवैध उत्खनन सिद्ध झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, याबाबतची पुढील सुनावणी 16 एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती जनमाध्यम प्रतिनिधींना दिली. **– गोपाल देशपांडे, उपविभागीय अधिकारी**

# किन्ही वन येथे घराला आग

घाटंजी - तालुक्यातील किन्ही वन येथे एका घराला अचानक भीषण आग लागली. यामध्ये घरातील संसारोपयोगी साहित्य, अन्नधान्य, कपडे, रोख रक्कम आणि साठवलेले धान्य जळून खाक झाल्याने कुटुंब उघड्यावर आले आहे. ही घटना रविवार ६ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. भिमराव हनमंतु टेकाम असे आगीत घर जळून खाक झालेल्या नुकसानग्रस्ताचे नाव आहे. ते पारवा मंडळातील किन्ही वन येथील रहिवासी आहे. सोमवारी त्यांच्या घरातून अचानक धूर आणि आगीच्या ज्वाला निघत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. त्यामुळे गावातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आग वेळीच नियंत्रणात आली. मात्र. या भीषण आगीत टेकाम यांच्या घरातील अन्नधान्य, कपडे, दैनंदिन वापराचे साहित्य, तुरीचा साठा, कापूस विक्रीतून मिळालेली रक्कम, सुगीचे धान्य तसेच रोजंदारी मजुरी करून साठवून ठेवलेली रोख संपूर्ण जळून खाक झाली. त्यामुळे कुटुंबासमोर अन्न, वस्त्र आणि निवारा यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. घटनेची माहिती मिळताच तलाठी, ग्रामसेवक आणि पोलीस पाटीलांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

# चिखलगावात झाडांची मोठी चोरी !

## ९८ हजारांचा मुद्देमाल लंपास, २१० बांबू आणि १० सुबाभुळीची झाडे कापली

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - वणी शहरानजीक असलेल्या चिखलगाव परिसरात झाडांची मोठ्या प्रमाणात चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून, अज्ञात चोरट्यांनी तब्बल ९८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी लोकमान्य टिळक महाविद्यालय वणीचे प्राचार्य डॉ. प्रसाद अरुण खानझोडे (वय ४७) यांनी वणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिक्षण प्रसारक मंडळ, वणी यांच्या मालकीची चिखलगाव (यवतमाळ रोड) लालपुलिया परिसरात ३२ एकर जागा आहे. या जागेवर सुमारे सहा वर्षांपूर्वी लावण्यात आलेली १४ बांबूची झुडपे (एकूण अंदाजे २१० बांबू) व १० सुबाभुळीची झाडे होती.दिनांक १७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास फिर्यादी जागेचे मोजमाप करण्यासाठी तेथे गेले असता, संबंधित झाडे पूर्णपणे कापून अज्ञात व्यक्तींनी चोरी केल्याचे आढळून आले. चोरी गेलेल्या बांबूंची किंमत सुमारे ७३,५०० रुपये तर सुबाभुळीच्या झाडांची किंमत सुमारे २५,००० रुपये असून, एकूण नुकसान ९८,५०० रुपये इतके झाले आहे. या प्रकरणाची नोंद दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली असून,पुढील तपास वणी पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल निलकमल भोसले करीत आहेत.

### 'बांबू विकणारा शिक्षक कोण?' शहरात चर्चांना उधाण




दरम्यान,या घटनेनंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः वनस्पतीशास्त्र विषयाशी संबंधित एका शिक्षकाकडून बांबू विक्री केल्याच्या चर्चांनी जोर धरला असून,यामागे नेमके कोण आहे याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.मात्र,या सर्व बाबी केवळ चर्चेच्या पातळीवर असून, अधिकृत तपासाअंतीच सत्य समोर येणार आहे.त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# • वेचक

## ओंकार चेके यांना 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवन गौरव'



यवतमाळ : पत्रकारिता क्षेत्रात गेल्या तीन दशकांपासून सक्रिय राहून जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणारे पत्रकार ओंकार चेके यांना 'भारत रत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम समाज रत्न राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. हा सन्मान ११ एप्रिल रोजी पुणे येथे प्रदान करण्यात येणार आहे.चेके यांनी पत्रकारितेतून विविध गैरप्रकार उघडकीस आणत त्यावर आळा घालण्याचे काम केले. ग्रामीण पत्रकारांचे संघटन उभारून त्यांच्या हक्कांसाठी आंदोलन, धरणे व मोर्चांच्या माध्यमातून शासनापर्यंत आवाज पोहोचवला. सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. नागपूर–तुळजापूर महामार्गावरील अपघातग्रस्तांना तातडीने मदत करून आतापर्यंत १५० हून अधिक जखमींचे प्राण वाचवले आहेत. कोरोना काळात ८० गरजू कुटुंबांना अन्नपुरवठा करत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या या कार्याची दखल घेत पुणे येथील 'एडी फाउंडेशन'तर्फे हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून सावित्रीबाई फुले सभागृहात त्यांचा सन्मान होणार आहे.

## बोरगावमध्ये SIR प्रक्रियेत गोंधळ, BLO कोण याबाबत अनिश्चितता, मतदार वंचित राहण्याची भीती

पांढरकवडा तालुक्यातील बोरगाव येथे सध्या सुरू असलेल्या Special Intensive Revision (SIR) प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) कोण आहे याबाबत मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. या गोंधळामुळे नागरिकांना मतदार यादीशी संबंधित कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. निवडणूक आयोगासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ही SIR प्रक्रिया गावात मात्र विस्कळीत अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. नव्या मतदारांची नोंदणी, नाव दुरुस्ती किंवा वगळण्याच्या प्रक्रियेसाठी BLO शी संपर्क आवश्यक असतो. मात्र बोरगावमध्ये सध्या BLO चा कार्यभार नेमका कोणाकडे आहे, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने नागरिक संभ्रमात आहेत. ग्रामस्थांच्या मते, "आम्ही वारंवार चौकशी करूनही BLO कोण आहे हे समजत नाही. त्यामुळे नाव नोंदणी आणि दुरुस्तीची कामे रखडली आहेत." या परिस्थितीचा सर्वाधिक फटका ग्रामीण आणि वयोवृद्ध नागरिकांना बसत आहे. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे. जर एखादा पात्र मतदार SIR प्रक्रियेत नाव नोंदवू शकला नाही किंवा त्याचे नाव यादीतून वगळले गेले, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? दरम्यान, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देत बोरगावसाठी नियुक्त BLO ची माहिती जाहीर करावी, तसेच SIR प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत रित्या पार पडेल यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## देशी कट्ट्यासह तरुणाला घेतले ताब्यात

यवतमाळ - शहरात देशी कट्ट्याचा धाक दाखवून दहशत माजविणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाला यवतमाळ शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने शिताफीने अटक केली. त्याच्याकडून २५ हजार रुपये किमतीचा देशी बनावटीचा कट्टा जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. मिळालेली माहिती अशी की, ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री यवतमाळ शहर पोलीस ठाण्याचे डी.बी. पथक गस्तीवर असताना त्यांना एक महत्त्वाची गोपनीय माहिती मिळाली. पिंपळगाव ते धामणगाव रोडवर एक तरुण कंबरेला कट्टा लावून दहशत निर्माण करत फिरत असल्याची ही माहिती होती. घटनेचे गांभीर्य ओळखून ठाणेदार रामकृष्ण जाधव यांनी तात्काळ पथकाला आरोपीचा शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी शिताफीने सापळा रचून कुणाल शिवदास गीते (वय २०, रा. मासोळी पोड, मोहा, यवतमाळ) याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्या कंबरेला खोसलेला २५ हजार रुपये किमतीचा देशी बनावटीचा कट्टा मिळून आला. पोलिसांनी सदर कट्टा जप्त केला असून, आरोपी कुणालविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# काँग्रेसचे 'संगठन सृजन अभियान' पुसद येथे उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - ऑल इंडिया काँग्रेस कमिटी यांच्या माध्यमातून देशभर सुरू असलेल्या 'संगठन सृजन अभियान' अंतर्गत पुसद येथे दि.६ एप्रील सोमवार ला महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. रेस्टहाऊस पुसद येथे पार पडलेल्या या बैठकीस अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस,संजयजी कपूर (निरीक्षक) भय्याजी पवार,(जिल्हा निरीक्षक ), शकूरजी नागाणी (प्रदेश निरीक्षक),प्रदेश काँग्रेस महासचिव डॉ. मोहमद नदीम, जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल मानकर,प्रदेश अल्प. महासचिव सय्यद इस्तीयाक, तालुका अध्यक्ष विलास वाघमारे, शहराध्यक्ष झिया शेख, जिल्हा उपाध्यक्ष अनिल शिंदे, जिल्हा अल्प. सचिव अब्दुल वाहाब, कार्याध्यक्ष ज्ञानदीप कांबळे,युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव भगवान पंडागळे होते.



ऑल इंडिया काँग्रेस कमिटी यांच्या माध्यमातून देशभर सुरू असलेल्या 'संगठन सृजन अभियान' अंतर्गत आज पुसद येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. यावेळी मान्यवरांनी संघटन बळकटीकरण,पक्षविस्तार,तसेच तळागाळातील कार्यकर्त्यांशी संवाद वाढविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे पक्ष संघटना अधिक मजबूत करणे,जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष ते बूथ प्रतिनिधी पर्यन्त सामान्य कार्यकर्तेचे मत जाणून घेणे व नवीन कार्यकर्त्यांना जोडणे,जुन्या कार्यकर्त्यांना सक्रिय करणे आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भक्कम संघटन उभारणे हाआहे. यावेळी,तहेसीनखान, नगरसेवक ॲड. वासिम अहेमद, लियाकत पठाण, नगरसेवक जब्बार लाखे, नगरसेवक सुलतान कुरेशी, नगरसेविका योगिता बेमायते,आहेफाज खान, फिरोज खान, सय्यद जानी, गाझी उसामा, प्रकाश नेमायते, इर्शाद कुरेशी,ईद्रीस खान,सरपंच सादिक सौदागर, सेवादल अध्यक्ष गोपाल राठोड, युवक काँग्रेस जिल्हामहासचिव सुजित मानकामे,ॲड.राम भाडंगे, ॲड. प्रभाकर विघ्ने,युवक विधानसभा अध्यक्ष अभिलेष खैरमोडे, इस्माईल बुखारी, सागर देशमुख, इस्त्राईल गुड्डू, साहेद मिर्झा, नईम इजारदार, हकीमोद्दीन सिद्दीकी, वाजीद खान, मो.झिमात, वासिम पठाण, अब्दुला खान, माजी सरपंच भडंगे, गजानन इंगोले, राजू कांबळे, हमीद अली, संजय कन्हेड, माधव दडवे, सय्यद इसाक, सलीम सरताज, मतीन पेंटर,बळीराम चव्हाण सागर धुळे, तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध गौण खनिज उत्खननासह वाळू तस्करी जोमात महसूल व पोलिसांचे दुर्लक्ष ?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - तालुक्यात अवैध मुरूम उत्खनन आणि वाळू तस्करीने पुन्हा डोके वर काढले असून, रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती समोर आली आहे. लिंगी, वाई, रामगाव, मोख, साखरा आदी परिसरात सुरू असलेल्या पांदण रस्त्यांच्या कामांच्या आडून मुरूमाचा अवैध उपसा सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.



माहितीनुसार, जेसीबीच्या साहाय्याने मुरूम काढून कोणतीही रॉयल्टी न भरता तो थेट विविध ठिकाणी वाहून नेला जात आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याची चर्चा आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेत ही वाहतूक सुरू असल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.तसेच नदीपात्र आणि नाल्यांमधून वाळूचा बेसुमार उपसा करून ती ५ ते ७ हजार रुपयांपर्यंत विकली जात असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. ही वाळू डोळंबावाडी, तूपटाकळी, मोख, आरंभीरसह परिसरातील गावांमध्ये पोहोचवली जात असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, या अवैध प्रकारांना महसूल विभाग व पोलिसांचे मौन पाठबळ तर नाही ना, असा सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. काही ठिकाणी संबंधित तलाठ्यांचीही मुकसंमती असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. या संपूर्ण प्रकरणामागे नेमकी कोणाची 'मिलमिली' आहे, याचा शोध घेण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या संदर्भात तहसीलदार मयूर राऊत यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे प्रशासन या गंभीर प्रकाराकडे कधी लक्ष देणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# आंबेडकर जयंतीनिमित्त 'सामाजिक समता सप्ताह'चा शुभारंभ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. ८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुधवारी या सप्ताहाचा उत्साहात शुभारंभ झाला.

उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सदस्य प्राजक्ता इंगळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल जाधव, सहाय्यक संचालक विशाल नगराळे व संशोधन अधिकारी ज्योत्स्ना तिजारे उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मंगला मून यांनी सप्ताहाचा उद्देश स्पष्ट करताना, विविध योजनांची माहिती ग्रामीण व शहरी भागातील मागासवर्गीय विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक स्तरात वाढ घडवणे हा मुख्य हेतू असल्याचे सांगितले.यावेळी विविध योजनांअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्यात आले. स्वाधार योजनेंतर्गत गौरव बडोले, दिपक गजभिये, ऐश्वर्या चालखुरे, यश गजभिये यांना लाभ देण्यात आला. तसेच मॅट्रिकोत्तर परराज्य शिष्यवृत्ती योजनेंतर्गत उज्वला बनसोड, श्रेया नगराळे, निलेश बरडे यांना तर छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेंतर्गत श्वेता बन्सोड व प्रेरणा सावळे यांचा गौरव करण्यात आला. सप्ताहातील कार्यक्रम ८ ते १४ एप्रिलदरम्यान दररोज सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आयोजित करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश वानखेडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्योत्स्ना तिजारे यांनी मानले.




# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कराटे चषक

## पॅन्थर ज्युडो कराटे ॲकडमीच्या खेळाडूंचे सुयश!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - डॉ. बाबासाहेब आंबेडकर कराटे चषक दि. ४ व ५ एप्रिल २०२६ रविवार रोजी जिल्हा क्रिडा संकुल नांदेड येथे घेण्यात आले. याचे सर्व नियोजन रुद्रा स्पोर्ट कराटे ॲकडमी नांदेड यांनी करण्यात आले होते. राज्यातुन व जिल्हयातुन २५० ते ३०० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला होता.



यामध्ये यवतमाळ जिल्हयातुन बहुउद्देशिय सामाजिक संस्था द्वारा संचालित पॅन्थर ज्युडो कराटे ॲकडमी यांनी आपला सहभाग नोंदवून यश प्राप्त केले. काता या प्रकारात विक्की राठोड, श्रीपाल पवार, सर्वेश भालेराव, कु. क्षितीजा पवार यांनी सुवर्ण पदक पटाकवले, तर संभाजी भोसले, स्मीत मोरे, सात्वीक भालेराव यांनी रजत पदक मिळविले. कुमीते म्हणजे (फाईट) प्रकारात संभाजी भोसले, श्रीपाल पवार, सात्वीक भालेराव यांनी सुवर्ण पदक तर स्मीत मोरे, सर्वेश भालेराव यांनी रजत पदक मिळविले. या स्पर्धेला पंच म्हणून पॅन्थर ज्युडो कराटे ॲकडमीचे राज्यस्तरीय रेफरी शिवराज कांबळे सर, गजानन मस्के सर, आकाश मेश्राम सर, जय उचाडे सर, विक्की राठोड सर, आदित्य बगळे सर, कु. मान्यता देशमुख, कु.क्षीतिजा पवार, राज आसोले हे होते. सर्व विजयी खेळाडू आपल्या यशाचे श्रेय आई-वडीलांना व कराटे प्रशिक्षकांना देतात. पॅन्थर ज्युडो कराटे ॲकडमीचे सचिव संतोष कांबळे सर, अध्यक्षा चैताली विजय भगत, नगर सेविका आशंका कांबळे (गोरे),गजानन मस्के सर, गुणवंतराव सावंत सर यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# गौसिया बानो शेख असलमचा सन्मानपत्र देऊन सत्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड़ - येथील डॉ. इक्बाल नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक कन्या शाळेने शैक्षणिक क्षेत्रात आपली मोहोर उमटवत एलिमेंटरी रेखाकला परीक्षा २०२५ मध्ये यश संपादन केले आहे. मुख्याध्यापक राहत रोशन अंसारी यांच्या नेतृत्वाखाली शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, परीक्षेस बसलेले १३ पैकी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



कला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभले असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. परीक्षेमध्ये यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांना सभापती व मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आले यामध्ये ,ब श्रेणीत गोसिया बानो शेख असलम यांनी परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली व मान्यवरांच्या हस्ते तिचे सत्कार करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिक्षण सभापती रसूल पटेल होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये नगर सेवक गनी अली शाह होते या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष मोहम्मद इर्शाद अब्दुल सत्तार हे हजार होते यांच्या हस्ते मुलींना गोल्ड मेडल व बक्षीस देऊन सत्कार करण्यात आले यावेळेस त्यांच्यासोबत शाळा स्थापन सदस्य मुमताज खान व महिला सदस्य हजर होते.

# लिफ्ट मागितली अन् दुचाकी पळविली

यवतमाळ - एका अनोळखी इसमाने लिफ्ट घेऊन विश्वास संपादन केला. आणि त्यानंतर तब्बल ५० हजार रुपयांची दुचाकी घेऊन पोबारा केला. ही घटना शहरातील सरकारी दवाखाना परिसरात एप्रिल रोजी उघडकीस आली आहे. विनोद मेश्राम (३६) रा. दाभाडी ता. झरी जामणी असे फिर्यादीचे नाव आहे. ते ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास आपल्या एमएच २९ एएल ६०५६ क्रमांकाच्या दुचाकीने पांढरकवड्याकडे येत होते. यावेळी कटली बोरगाव परिसरात एका अनोळखी व्यक्तीने त्यांना हात दाखवून लिफ्ट मागितली. मेश्राम यांनी माणुसकी दाखवत त्याला गाडीवर बसवले. मात्र, काही अंतर गेल्यानंतर, मी गाडी चालवतो, तुम्ही मागे बसा, असे म्हणून त्या इसमाने मेश्राम यांचा विश्वास संपादन केला आणि स्वतः गाडी चालवायला घेतली.

# जिजाऊ–सावित्री संवादाने 'समता पर्व–२०२६'ची भव्य सुरुवात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित समता पर्व 2026 ची भव्य सुरुवात मंगळवार, दिनांक 7 एप्रिल रोजी सायंकाळी 7 वाजता उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या पर्वाचा शुभारंभ 'जिजाऊ संवाद' व 'सावित्री संवाद' या प्रभावी सादरीकरणांनी झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता पर्वाचे अध्यक्ष नारायण थूल होते. यावेळी मार्गदर्शक प्रवक्ता उमेश मेश्राम, डॉ. चंद्रकांत सरदार, जनार्दन मनवर, डॉ.विलास कनाके, वनमाला वंजारी,, चंद्रकांत वाळके, प्रा. विजय डोंगरे, मृणालिनी दहिकर, कवडू नगराळे, दीपक नगराळे तसेच प्रसिद्ध संगीतकार डॉ. मधुकर मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आराध्या लोहकरे हिने साकारलेल्या प्रभावी संवादाने झाली. तिच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यानंतर धैर्या देशपांडे हिने 'जिजाऊ संवाद' सादर करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाऊंच्या विचारांचा प्रभावी संदेश दिला.कार्यक्रमात दोन



चिमुकल्यांनी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून वातावरण भावूक केले. यावेळी डॉ. मधुकर मेश्राम यांचा सन्मानही करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पल्लवी कांबळे, रीना वानखडे, हर्षाली बोडके, स्नेहा डोंगरे, ॲड. वैशाली हिरे, बीना नागदिवे, शुभांगी मालखेडे, ज्योती जीवने आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन राहुल कोचे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पल्लवी रामटेके यांनी मानले. समता, बंधुता व सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या या पर्वाची सुरुवात उत्साहात झाली असून पुढील दिवसांत विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांची मेजवानी यवतमाळकरांना मिळणार आहे.

# आता... निकाल लागताच थेट मोबाइलवर येईल मेसेज; अमरावती विद्यापीठाचा 'हायटेक' निर्णय



**अमरावती / का.प्र.**
संत गाडगे बाबा अमरावतीविद्यापीठाच्या परीक्षेचा निकाल लागला की नाही, यासाठी आता विद्यार्थ्यांना सायबर कॅफे किंवा महाविद्यालयाच्या चकरा मारण्याची गरज उरणार नाही. विद्यापीठाने तंत्रज्ञानाचा वापर करत विद्यार्थ्यांच्या थेट मोबाइलवर निकालाचा मेसेज आणि लिंक पाठविण्याची महत्त्वपूर्ण सुविधा सुरू केली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागू झालेल्या या संकल्पनेमुळे पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यांतील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे निकालाची प्रतीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांची धाकधूक कमी होणार आहे.

विशेष म्हणजे, सध्या सुरू असलेल्या हिवाळी परीक्षांच्या निकालांचे मेसेज विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर येण्यास सुरुवात झाली आहे. या सुविधेमुळे विद्यार्थी घरबसल्या एका क्लिकवर आपला गुणतक्ता (मार्क शिट) पाहू शकणार आहेत.

कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यापीठात विविध कामे हे पारदर्शकपणे होण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा वापर सुरू केला आहे. परीक्षा विभागाला डिजिटल हायटेक करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतलेला आहे.

### अशी आहे कार्यप्रणाली:

**थेट मेसेज:** निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाइलवर एसएमएस प्राप्त होतो.

**डिजिटल लिंक:** मेसेजसोबत एक अधिकृत लिंक दिली जाते, ज्यावर क्लिक करताच निकाल ओपन होतो.

वेळेची बचत : विद्यापीठाच्या सर्व्हरवर एकाच वेळी येणारा ताण कमी होऊन विद्यार्थ्यांना त्वरित निकाल मिळतो.

### महत्वाचे ठळक मुद्दे

**सुविधा:** निकाल जाहीर होताच क्षणार्धात मोबाईलवर अलट.

**वर्ष:** शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून अंमलबजावणी.

**व्याप्ती:** पाचही जिल्ह्यांतील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यां साठी लागू.

**फायदा:** अफवांना चाप बसणार आणि विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार.

### पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांना लाभ

अमरावती विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या पाचही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेटच्या अडचणीमुळे किंवा निकालाची माहिती उशिरा मिळाल्यामुळे अनेकदा अडचणी येत होत्या, मात्र आता थेट मेसेज सुविधेमुळे पारदर्शकता आणि वेग वाढला आहे.

### परीक्षार्थीचा आकडा मोठा

या शैक्षणिक वर्षात हिवाळी आणि उन्हाळी सत्रात मिळून लाखो परीक्षार्थी विद्यापीठाच्या परीक्षेला बसतात. हिवाळी परीक्षा २०२५-२६ च्या सत्रात सुमारे २.५ लाख ते ३ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून, टप्प्याटप्प्याने त्यांचे निकाल याच डिजिटल पद्धतीने जाहीर केले जात आहेत.

निकालासोबतच पुनर्मूल्यांकन आणि फोटोकॉपीसाठी अर्ज करण्याच्या लिंकही उपलब्ध करून देण्याचा मानस विद्यापीठाचा आहे.

> 'पुर्नमूल्यांकनाचे एसएमएस पाठवणे सुरू झाले आहे. येत्या सत्रापासून नियमित विद्यार्थ्यांना परीक्षांच्या निकालाचे एसएमएस आणि लिंक पाठवली जाईल. पुढे हीच प्रणाली देखील सुरू असेल.'
>
> **डॉ. नितीन कोळी,** संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ.

### कुलगुरूचे 'व्हिजन'

विद्यापीठाला पूर्णतः डिजिटल आणि विद्यार्थीभिमुख बनवण्यासाठी ही संकल्पना राबवण्यात आली आहे. कागदी घोडे नाचवण्यापेक्षा तंत्रज्ञानाचा वापर करून निकालाची प्रक्रिया वेगवान करण्यावर भर देण्यात आला आहे.

## पशुखाद्य दरवाढीने दूध उत्पादक हैराण

**अंजनगाव बारी** - ग्रामीण भागातील दूध व्यवसायावर पशुखाद्य दरवाढीचे मोठे संकट कोसळले असून शेतकरी आणि दूध उत्पादक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पशुखाद्याचे दर वाढत असल्याने चारा खर्च प्रचंड वाढला आहे. त्यामुळे दुधाळ जनावरांचे संगोपन करणे शेतकऱ्यांसाठी आव्हान ठरत आहे.स्थानिक बाजारात कपाशी सिंगल काडी, भूसा, मका, सोयाबीन पिंड, गव्हाचे पेंड, मुरघास यांसह विविध पशुखाद्यांच्या दरात प्रचंड वाढ नोंदवली जात आहे. पशुखाद्याचे दर २५ ते ३० टक्क्यांनी वाढल्याने दूध उत्पादकांच्या हातात काहीच राहत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.दूध संकलन केंद्रांकडून मात्र दुधाचे दर वाढविण्यात आलेले नाहीत. त्यामुळं खर्च वाढत असला तरी मिळकत वाढत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## शुभम महाराज यांची परशुराम नवयुवक संघटनेच्या अध्यक्षपदी नियुक्ती

**अचलपूर/ वार्ताहर**
अमरावती जिल्हा आणि परतवाडा शहरातील सामाजिक व युवकांच्या विविध उपक्रमांना नवी दिशा देण्याच्या उद्देशाने शुभम पुरोहित महाराज यांची परशुराम नवयुवक संघटनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे शहरातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून संघटनेच्या कार्याला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शुभम पुरोहित महाराज हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या कार्यात सक्रिय आहेत. युवकांमध्ये त्यांचा चांगला प्रभाव असून ते एक लोकप्रिय व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वगुणांवर आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीवर विश्वास ठेवून संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.



अध्यक्षपद स्वीकारल्यानंतरची भूमिका अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर शुभम पुरोहित महाराज यांनी सांगितले की, 'माझ्यावर सोपवलेली जबाबदारी मी पूर्ण प्रामाणिकपणे आणि समर्पणाने पार पाडेन. संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच जास्तीत जास्त युवकांना समाजकार्यात जोडण्याचा माझा प्रयत्न राहील. सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात एकता, बंधुभाव आणि जागरूकता निर्माण करण्यावर आम्ही भर देऊ.भविष्यातील उपक्रमांची आखणी नव्या नेतृत्वाखाली संघटनेतर्फे आगामी काळात विविध सामाजिक अभियान, रक्तदान शिबिरे, सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक सोहळे तसेच युवक मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यामधून समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचून सकारात्मक बदल घडवण्याचा संघटनेचा प्रयत्न राहणार आहे.पदाधिकाऱ्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव या नियुक्तीच्या प्रसंगी संघटनेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजातील मान्यवर उपस्थित होते.ही नियुक्ती केवळ संघटनेसाठीच नव्हे, तर परतवाडा परिसरातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून सामाजिक कार्यात नव्या उमेदीने सहभागी होण्याची संधी निर्माण करणारी ठरत आहे.

## आयएमए अमरावती शाखेचा पदग्रहण समारंभ उत्साहात

**अमरावती/ का.प्र.**
इंडियन मेडिकल असोसिएशन (आय. एम. ए.) अमरावती शाखेची नूतन कार्यकारिणी वर्ष २०२६- २७ चा पदग्रहण समारंभ छत्रपती शिवाजी महाराज ऑडिटोरियम लॉन, डॉ. पी.डि.एम.एम.सी. अमरावती येथे, उत्साहात झाला.



ह्या प्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अनिल बोंडे, डॉ. अनिल देशमुख, (डीन डॉ. पी.डि.एम.एम.सी. अमरावती व इन्स्टालींग ऑफिसर), सन्माननीय अतिथी व प्रमुख वक्ता डॉ राजन बारोकर, (सीनियर क्रिटीकल केअर फिजीशियन आणि ईसीएमओ स्पेशलिस्ट किम्स - किंग्सवे हॉस्पिटल, नागपुर), सन्माननीय अतिथी डॉ वसंत लुंगे (सहसचिव, आय एम ए मुख्यालय, नवी दिल्ली व आय एम ए महाराष्ट्राचे पूर्व उपाध्यक्ष), डॉ उध्दव देशमुख, (आय एम ए महाराष्ट्र चे माजी अध्यक्ष)आणि डॉ दिनेश ठाकरे, (आय एम ए महाराष्ट्र चे माजी अध्यक्ष), ही मान्यवर मंडळी उपस्थित होती. त्याचबरोबर या प्रसंगी वर्ष २०२५-२६ व त्यानंतर वर्ष २०२६-२७ ह्या कार्यकाळातील पदाधिकारी तसेच शहरातील सुप्रसिद्ध डॉक्टर्स व आय. एम. ए. सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आय. एम. ए. प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

डॉ अदिती अंबाडेकर ह्यांनी श्री गणेश वंदना सादर केली. तद्नंतर वर्ष २०२५ च्या अध्यक्षा डॉ अल्का कुथे ह्यांनी स्वागतपर भाषण केले. त्यानंतर वर्ष २०२५ च्या सचिव डॉ. राधा सावदेकर ह्यांनी वर्षभरात केलेल्या कार्यक्रमाचे सादरीकरण पावर पॉईंट द्वारा प्रस्तुत केले. डॉ. अल्का कुथे ह्यांनी भेट वस्तू देऊन माजी कार्यकारिणी सदस्यांचा गौरव केला.

स्थापना अधिकारी डॉ. अनिल देशमुख ह्यांनी वर्ष २०२६-२७ च्या व आय एम ए अमरावती शाखेचे ७६ वे अध्यक्ष डॉ दिनेश वाघाडे ह्यांना पुष्प व अध्यक्षांची पीन दिली. तसेच डॉ अल्का कुथे ह्यांनी आय एम ए अमरावतीची घटना व मेडलिअन (अध्यक्षीय पदक) डॉ. दिनेश वाघाडे यांच्या स्वाधीन केले. त्यानंतर डॉ दिनेश वाघाडे यांनी वर्ष २०२६ - २७ ची कार्यकारिणीची घोषणा केली.

सचिव डॉ. विक्रम वानखडे, कोषाध्यक्ष डॉ रोहन बोबडे, नियोजित अध्यक्ष २०२७ - डॉ संदिप दानखडे व इतर कार्यकारिणी सदस्यांना डॉ. अनिल देशमुख ह्यांनी पुष्प देऊन संपूर्ण कार्यकारिणीला उत्कृष्ट कार्याकरिता शुभेच्छा दिल्या.

## पी. आर. पोटे पाटील शिक्षण महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ



**अमरावती/ का.प्र.**
पी. आर. पाटील एज्युकेशनल ग्रुप व्दारा संचालित पी. आर. पोटे शिक्षण (बि.एड) महाविद्यालयाचा शिक्षणशास्त्र विषयात पदवीधर झालेल्या प्रशिक्षणार्थींना 'शिक्षण स्नातक पदवी' वितरण करून पदवी वितरण सोहळा झाला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. महाविद्यालयात प्रशिक्षण घेऊन विविध शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत झालेले प्रशिक्षणार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ही करण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांनी जुन्या आठवणींना कार्यक्रमाचा अनुषंगाने उजाळा दिला.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले मा. डॉ. अंबादास मोहिते सर तसेच पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग चे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंदिया यांनी शिक्षकाच्या भूमिके संबंधित व त्यांचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारे इष्ट परिणामांविषयी मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यक्रमा मध्ये विद्यापीठ गुणवत्ता यादीत ९ क्रंमाक प्राप्त विद्यार्थीनी दिक्षा काकडे चा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून लाभलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुप्रीता देशमुख यांनी विद्यार्थी जीवनाशी जुळवून घेत असताना शिक्षक-विद्यार्थी नात्यांमध्ये आपुलकीचं भाव असणे गरजेचं असल्याचं सांगितले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजया कंकाळे यांनी सादर केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापिका वर्ग डॉ. कंकाळे, डॉ. धर्माळे, प्रा. ठाकरे व प्रा. दिपा ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. जोस्ना हरदे यांनी केले तर भावी शिक्षणांना सुजाण नाकरिकांचा जबाबदरीसंबंधी प्रतिज्ञा जोस्ना हरदे यांनी दिली. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शन रेणुका पटेल यांनी केले. कार्यक्रमात पदवीधर झालेले व इतर बी.एड प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### पंतप्रधान इंटर्नशिप योजना

## तरुणांसाठी नामवंत कंपन्यांत विद्यावेतनासह प्रशिक्षणाची संधी

**अमरावती/ का.प्र.**
भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६' अंतर्गत आता देशातील पहिल्या ५०० नामवंत कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेचा तिसरा टप्पा आता अधिक व्यापक स्वरूपात सुरू झाला असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

या योजनेमध्ये उमेदवारांची वयोमर्यादा १८ ते २५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. शैक्षणिक पात्रतेमध्ये १० वी, १२ वी उत्तीर्ण, आयटीआय प्रमाणपत्रधारक, पॉलिटेक्निक डिप्लोमा तसेच पदवीधर उमेदवारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, आता पदव्युत्तर आणि एमबीए पूर्ण केलेले विद्यार्थी देखील या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत.

निवड झालेल्या उमेदवारांना विद्यावेतन दरमहा ९ हजार रुपये मिळणार आहे. यापैकी ८ हजार १०० रुपये सरकारकडून थेट बँक खात्यात जमा होतील, तर ९०० रुपये संबंधित कंपनीकडून दिले जातील. याशिवाय, रुजू होताना ६ हजार रुपयांचे एकरकमी सानुग्रह अनुदान देखील दिले जाणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी ६ ते ९ महिन्यांचा असेल, ज्यानंतर उमेदवारांना अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.


ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा कुटुंबातील कोणताही सदस्य कायमस्वरूपी सरकारी कर्मचारी आहे, ते या योजनेसाठी पात्र नसतील. तसेच, आयआयटी, आयआयएम यांसारख्या उच्च संस्थांमधील पदवीधर या योजनेचा लाभ घेऊ शकणार नाहीत.

इच्छुकांनी आपली नोंदणी केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर pminternship.mca.gov.in येथे पूर्ण करावी, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत कळविण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिन साजरा

**आसेगाव पूर्णा** - स्थानिक छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात ७९ विद्यार्थी व १५ कर्मचारी यांनी सहभाग घेतला. सहभागींची वजन, उंची, रक्तदाब, रक्तातील साखर, ऑक्सिजन पातळी, नाडी व रक्तगट तपासणी करण्यात आली. तसेच आरोग्याची काळजी, नियमित तपासणीचे महत्त्व आणि एचपीव्ही लसीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. रविंद्र इचे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. संदेश तायडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक बदल व आरोग्य संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले तसेच तपासणी करून आवश्यक उपचार सुचविले. यावेळी डॉ. घोडेस्वार, डॉ. पारणकर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ नितेश डहाके, सुनील दिवान व मंगला पडोळे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. आशिष काळे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. हरीश काळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. भारत कल्याणकर यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# परीक्षा काळात पटपटताळणीचा ताण; शिक्षकांत नाराजी

## पटपटताळणीला शिक्षक सेनेकडून तीव्र आक्षेप..

**अंजनगाव बारी/ वार्ताहर**
राज्यात सुरू असलेल्या वार्षिक परीक्षांच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने शाळांमध्ये पटपटताळणी करण्याचे आदेश दिल्याने शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी आणि निकाल तयारी या महत्त्वाच्या कामांदरम्यान अतिरिक्त प्रशासकीय काम देण्यात आल्याने शिक्षकांवर मोठा ताण वाढल्याची प्रतिक्रिया मिळत आहे.

एप्रिल महिन्यात ठराविक दिवशी सर्व शाळांची तपासणी करण्याचे निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र याच काळात विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा सुरू असल्यामुळे शाळांमध्ये वेळेचे नियोजन करणे कठीण होत असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. परीक्षेचे नियोजन, विद्यार्थ्यांची उपस्थिती, पेपर तपासणी, निकाल निर्मिती या प्रक्रियेत शिक्षक पूर्णपणे गुंतलेले असताना पटपटताळणी सारखे अतिरिक्त काम व्यवहार्य नसल्याचा मुद्दा शिक्षकांनी उपस्थित केला आहे. या निर्णयाविरोधात शिक्षक सेनेने आवाज उठवण्यास सुरुवात केली असून, ही जबाबदारी परीक्षा पूर्ण झाल्यानंतर द्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. दरम्यान, शिक्षण विभागाकडून शाळांना स्थानिक पातळीवर नियोजन करून दोन्ही कामे समांतर पार पाडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.


> **'परीक्षांच्या काळात अतिरिक्त काम लादणे अयोग्य'**
>
> सध्या राज्यात वार्षिक परीक्षांचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा सुरू आहे. अशा वेळी शिक्षण विभागाकडून पटपटताळणीसारखी अतिरिक्त कामे लादणे हे पूर्णपणे अयोग्य आणि अव्यवहार्य आहे. शिक्षकांवर आधीच परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी आणि निकालाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक असताना प्रशासनाने अशा निर्णयांचा पुनर्विचार करावा. पटपटताळणी प्रक्रियेचा आम्ही विरोध करत नाही, मात्र ती योग्य वेळेत घेण्यात यावी.
>
> **रुपेश टाले** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, अमरावती .



तसेच अधिकाऱ्यांकडून शाळांना भेट देऊन शैक्षणिक कामकाजाची गुणवत्ता तपासली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र या आदेशामुळे दहावी–बारावीच्या पुढील प्रवेश प्रक्रियेवर तसेच नव्या शैक्षणिक वर्षाच्या नियोजनावर अडथळा निर्माण होऊ शकतो, अशी भीती शिक्षक व्यक्त करत आहेत.एकूणच, परीक्षा काळात पटपटताळणी घेण्याच्या निर्णयामुळे शिक्षक संतप्त असून, हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी केली आहे.

## निधन वार्ता

### दिपाली रनालेकर



**तिवसा** - कुऱ्हा येथील अंजलीका इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष हितेंद्र रनालेकर यांच्या पत्नी दिपाली रनालेकर वय ४२ वर्ष यांचे अल्पशा आजाराने ६ एप्रिल रोजी निधन झाले. गेल्या काही दिवसापासून त्यांच्यावर नाशिक येथील अशोका हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते.७ एप्रिल रोजी कुऱ्हा येथे अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या पच्छात पती, एक मुलगा, मुलगी असा परिवार आहे.त्या पुढारी न्यूज चे जिल्हा प्रतिनिधी पत्रकार छगन जाधव यांच्या बहीण होत्या.

### सुनीलआप्पा गुढे



**अमरावती** - जुन्या शहरातील प्रतिष्ठित नागरिक सुनीलआप्पा महादेवआप्पा गुढे यांचे वयाच्या (६६ वर्षी) ८ एप्रिल रोजी निधन झाले. स्व. सुनील गुढे हे माजी खासदार अनंतराव गुढे व प्रभाकरआप्पा गुढे यांचे लहान बंधू होते.त्यांच्या पार्थिवावर रूद्रभूमी अमरावती येथे सायंकाळी अंत्यसंस्कार पार पडले.स्व. सुनील आप्पा गुढे यांच्या पाठीमागे त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती सविता, मुलगा सुशांत, सून स्नेहल, पुतण्या अभिजीत, डॉ महेंद्र व गुढे परिवार आहे.

# विनाअनुदानित शिक्षण व्यवस्थेच्या दिशेने ?



अनुदानित शाळा बंद पडतील असे पाहणे; आणि नव्याने सुरू होणाऱ्या आणि सध्या सुरू असणाऱ्या बिगर इंग्रजी मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळा कायमच्या विनाअनुदानित राहतील, अशी व्यवस्था निर्माण करणे या मार्गांनी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्यातून खरे नुकसान लाखो गरजू विद्यार्थ्यांचे होणार आहे. काहीही करून अनुदानित शिक्षणव्यवस्था बंद पाडायचा चंग सरकारने बांधला की काय अशी शंका कुणालाही यावी. कारण हे काम दोन पद्धतींनी अखंड सुरू आहे. एक म्हणजे, अनुदानित शाळा बंद पडतील असे पाहणे; दुसरे म्हणजे नव्याने सुरू होणाऱ्या आणि सध्या सुरू असणाऱ्या बिगर इंग्रजी मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळा कायमच्या विनाअनुदानित राहतील, अशी व्यवस्था निर्माण करणे.

### अनुदानित शाळांवर प्रहार

अनुदानित शाळांचे अनुदान कमी करून आणि त्यांच्यापुढे हरप्रकारे असंख्य अडचणी निर्माण करून त्या बंद पडतील असे निर्णय आतापर्यंत आलेल्या प्रत्येक सरकारने सातत्याने घेतले आहेत. शिक्षकपदे मोठ्या प्रमाणावर कमी करणे, सेवकांची पदे रद्द करणे, वेतनेतर अनुदान न देणे, अशैक्षणिक कामांसाठी शिक्षकांना जुंपणे अशी काही उदाहरणे वानगीदाखल देता येतील.

### विनाअनुदानित शाळांना अनुदानापासून वंचित ठेवणे

प्रथम मान्यतेसाठी येणाऱ्या आणि सध्या विनाअनुदानित असणाऱ्या मान्यताप्राप्त शाळा अनुदानापासून कायम वंचित राहतील, यासाठीसुद्धा सरकारे प्रयत्नशील राहिली आहेत. सरकारने सुरुवातीला 'कायम विनाअनुदान' तत्त्वावर मान्यता द्यायला सुरुवात केली. उच्च न्यायालयाने 'कायम' शब्द काढायला लावल्यानंतर स्वयंअर्थसाहाय्यित शाळा अधिनियम आणला गेला. या अधिनियमाखाली मान्यता मागणाऱ्या शाळांना आपण कधीही अनुदान मागणार नाही, असे लिहून द्यावे लागते. वास्तविक या कायद्याखाली मान्यता मागणे बंधनकारक नाही. परंतु प्रथम मान्यता मागणाऱ्या शाळांना या कायद्याखाली अर्ज करायला भाग पाडले गेले. अस्तित्वाचा प्रश्न असल्यामुळे त्यांनी अर्ज केले. परिणामी त्या शाळा अनुदानासाठी कायमच्या वंचित झाल्या.

आता तर शासनाने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांसाठी दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी एक आणि ०२ एप्रिल २०२६ रोजी दोन असे एकूण तीन शासन निर्णय जारी केले आणि दोन हजार ८९ बिगर इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना व तुकड्यांना अनुदानापासून कायमचे वंचित केले. इतकेच नाही तर त्यांची मान्यता धोक्यात आणून त्यांच्या अस्तित्वाची समस्या उभी केली.

सदर शासन निर्णयांतील आदेश राज्य शासनातर्फे वेळोवेळी मूल्यांकन होऊनही वारंवार अपात्र ठरलेल्या दोन हजार ८९ शाळा व तुकड्यांना वेतन अनुदानाकरिता कायमस्वरूपी अपात्र घोषित करण्यात येत आहे.सदर शाळांना स्वयंअर्थसाहाय्यित अधिनियमातील तरतुदींनुसार शासन मान्यतेसाठी अर्ज करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल २०२६पर्यंत अखेरची मुदत देण्यात येत आहे. ज्या शाळा वरीलप्रमाणे अर्ज करणार नाहीत, अशा शाळांची मान्यता आपोआप रद्द होईल. त्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांनी नजिकच्या शाळांमध्ये करावे. ३१ मे २०२६पर्यंत समायोजनेचे नियोजन करावे आणि सुट्टीच्या कालावधीमध्ये प्रत्यक्ष समायोजनेची कार्यवाही पूर्ण करावी. मान्यता रद्द झालेल्या शाळा युडायस प्लस पोर्टलमधून आणि सरल पोर्टलमधून कमी कराव्यात. या शासन निर्णयांबाबत काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात.याची सुरुवात दिनांक १५ नोव्हेंबर २०११च्या शासन निर्णयाने झाली. सदर शासन निर्णयाद्वारे विनाअनुदानित बिगर इंग्रजी शाळांना २०१२-१३ पासून अनुदानावर आणण्यासाठी सुधारित अनुदान सूत्र आणले गेले. त्यानुसार ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या शाळांकडून मूल्यांकनासाठी प्रस्ताव स्वीकारले जाणार होते आणि पात्र ठरणाऱ्या शाळांना अनुदान मिळणार होते. त्या तरतुदी स्वागतार्ह होत्या, परंतु एक बाब आक्षेपार्ह होती. ती म्हणजे, सतत तीन वर्षे मूल्यांकनात अपात्र ठरल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्द होण्याची त्यात असलेली तरतूद.

### उच्च न्यायालयाचे आदेश

१५ नोव्हेंबर २०११च्या शासन निर्णयाच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यांनी अनेक शाळांना त्या अनुदानासाठी अपात्र असल्याचे आदेश दिले होते. संबंधित शाळांना सुनावणी दिली नाही या कारणास्तव उच्च न्यायालयाने दिनांक १६ जुलै २०१४च्या आदेशाने ते सर्व आदेश रद्द केले. आता, उपरोल्लेखित दोन हजार ८९ शाळांच्या बाबतीत ही प्रक्रिया पूर्ण केली आहे का, त्याचा सरकारने खुलासा करावा. तसे झाले नसेल तर उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले नाही, असा अर्थ काढावा लागेल. आणखी एक महत्त्वाची बाब. दिनांक १ व २ एप्रिल २०२६च्या शासन निर्णयांत असे नमूद केले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९ डिसेंबर २०१६च्या आदेशाने दिनांक १५ नोव्हेंबर २०११चा शासन निर्णय वैध ठरवला आहे, परंतु हे विधान वस्तुस्थितीला धरून नाही असे दिसते. तसे असले तर ही बाब खूप गंभीर ठरते.

### शासन निर्णयांतील दोष

मुळात शाळा मान्यतेचे निकष आणि अनुदानासाठीचे निकष यात फरक असतो. सुरुवातीपासून माध्यमिक शाळा संहितेतील नियमांनुसार आणि वेळोवेळी संमत केलेल्या आदेशांनुसार शाळा मान्यता दिली जात असे. सन २००९पासून शिक्षणहक्क कायद्यातील तरतुदींनुसार शाळा मान्यता देण्यास सुरुवात झाली. उपरोल्लेखित शाळांना या कायद्याखाली मान्यता मिळाली असणारच आहे. एकदा शिक्षणहक्क कायद्यान्वये मान्यता मिळाल्यावर पुन्हा स्वयंअर्थसाहाय्यित शाळा अधिनियमाखाली मान्यता घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मान्यतेच्या अटी व शर्तींचा भंग झाला तरच मान्यता रद्द करता येईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत अनुदानाच्या निकषांची पूर्तता केली नाही, या कारणासाठी शाळा मान्यता रद्द करणे सारासार चुकीचे आणि बेकायदेशीर ठरते.दुसरे असे की, शासन निर्णय काढून लेखणीच्या एका फटकाऱ्याने शाळा मान्यता रद्द करता येणार नाही. त्यासाठी प्रत्येक शाळेला रीतसर कारणे दाखवा नोटीस द्यायला हवी. मान्यतेसंबंधीच्या कोणत्या अटी व शर्तींचा भंग झाला, ते लेखी कळवायला हवे. त्यावर शाळांना उत्तर देण्याची पुरेशी संधी आणि सुनावणी द्यायला हवी.तिसरे असे की, काही शाळांना खरोखरच अनुदान नको असल्यामुळे त्यांनी मूल्यांकनासाठी प्रस्ताव पाठवले नसतील अशा शाळांची मान्यता सरकार रद्द करणार आहे का

त्याचबरोबर अनुदानाच्या संदर्भात मूल्यांकनासाठी तीन वेळा अपात्र ठरल्यामुळे अनुदानासाठी कायमचे अपात्र ठरवणे हा निर्णय बेकायदेशीर तर आहेच, पण तो मुलांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत असंवेदनशील ठरतो. या शासन निर्णयांमुळे त्या शाळा बंद पडतील किंवा त्यांना अनुदानास कायमचे मुकावे लागेल. त्यामुळे सर्वात जास्त नुकसान लाखो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे होणार आहे. त्यांच्या शाळा किंवा तुकड्या बंद पडल्या तर त्यांचे समायोजन दुसऱ्या शाळांमध्ये करणे हा त्यांच्यावरचा अन्याय ठरेल. त्या शाळांमध्ये पुरेशा वर्गखोल्या आहेत का? समायोजन झालेली शाळा घरापासून दूर असली तर विद्यार्थ्यांचे आणि विशेषकरून विद्यार्थिनींचे शिक्षण बंद पडेल का? या प्रश्नांचा विचार सरकार करू इच्छित नाही असे म्हणावे लागते. त्यामुळे सदर शासन निर्णय न्यायालयापुढे गेल्यास ते अवैध ठरतील यात शंका नाही.

### मोफत शिक्षण हे कायद्याने ठरवून दिलेले कर्तव्य

संविधानाने आणि शिक्षणहक्क कायद्याने मोफत शिक्षणाची हमी दिली आहे आणि त्यावर कार्यवाही करण्याची सक्ती सरकारवर केली आहे. असे असताना मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे सरकारचे प्रयत्न अनाकलनीय ठरतात. प्रगत देशांमध्ये शिक्षण आणि आरोग्य हे विषय अग्रक्रमात सर्वात वर असतात. आपल्याकडे या विषयांना अग्रक्रम देणे दूर राहिले, त्या विषयांची दखल घ्यायलाही आपले सरकार तयार नाही. आणखी एक गंभीर बाब म्हणजे, सत्तेत असताना आम्ही काय हवे ते करू, मग ते बेकायदेशीर असले तरीही, अशी वृत्ती संबंधितांमध्ये स्थिरावली असल्याचेही जाणवते. यावर नागरिकांनी आता उघडपणे व्यक्त होण्याची नितांत गरज आहे.मान्यता रद्द करण्याची भीती घालून सरकार दोन हजार ८९ बिगर इंग्रजी विनाअनुदानित शाळा आणि तुकड्यांना (यात बहुसंख्य मराठी शाळा आहेत) स्वयंअर्थसाहाय्यित शाळा अधिनियमाखाली आणण्याचा अश्लाघ्य प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मान्यताप्राप्त शाळांनी त्यासाठी अर्ज करण्याची गरज नाही, असे माझे मत आहे.

**गिरीश सामंत**

---


# गुजरा जमाना फिर याद आया...

**आया है मुझे फिर यादओ जालिम !गुजरा जमाना बचपन का हायरे अकेले छोड़ के जाना!**
**और ना आना बचपन का, आया है मुझे फिर याद ओ जालिम !**

अगदी या गीता प्रमाणे बालवयातील अनेक गोष्टी आठवतात.बाल वयातील गमती जमती मोठ्या आगळ्यावेगळ्या आहे.आमचे बालपण आणि वर्तमान काळातील बालकांचे बालपण यामध्ये भयंकर तफावत आहे दिसून येते. आमच्या लहानपणी मनोरंजनाची साधने नव्हती.केवळ आणि केवळ जे मिळेल त्यामध्ये मनोरंजनाचा आस्वाद आम्ही घेत होतो. खेळामध्ये सुद्धा फार बदल झाला.खेळाचे साहित्य नव्हते. झाडावर बसून डाबडुबली खेळत होतो .काही मुले झाडावर चळवळ तर काही झाडांच्या खाली त्यांच्या सुद्धा खेळत असत.दोन-चार मुलं मिळून कांचाचा खेळ खेळायचे.हाताच्या बोटांनी एक काचा हातात धरून दुसऱ्या कांच्यावर नेम धरायचा तर कधी जमिनीमध्ये थोडा गड्डा करून त्यामध्ये हाताने फेकून गड्यांमध्ये टाकला की त्याची जीत होत असे.सायकल प्रत्येकाकडे नव्हती.कोणी भाड्याने सायकल घेत असत आणि चालवित आनंद घेत होते.तसे एखाद्याला सायकल चालवणे शिकायचे असेल तर तो भाड्याने सायकल आणून त्यावर शिकायचा. छोटी सायकल मिळायची. त्याला आम्ही डूगडूगी म्हणायचं.शिकण्याची विशिष्ट पद्धत होती. सुरुवातीला सायकलचे पायडल पूर्ण मारीत नव्हते तर अर्धे पायडल मारत असत. अर्ध्या पायडलला कैची म्हणत त्यांना पहिल्यांदा कैची पायडल मारून शिकायचे असते.कैची शिकून झाले की पूर्ण पायडल मारण्यास सुरुवात होत होती.पूर्ण पायडल मारता आले की थोडा फार शिकला असे समजत होते.नंतर सायकलच्या दांड्यावर पायडल मारणे आणि ही दोन प्रक्रिया काही दिवसात पूर्ण झाली की सीटवर बसून पायडल मारीत सायकल चालवीत होतो. सायकल चालवण्यात मध्ये पास झाला असे संबोधत होते.

शाळेमध्ये तर वेगळीच मजा यायची शाळेमध्ये आम्ही पिशवीमध्ये पुस्तके - वह्या घालून जात होतो.यामध्ये कधी जेवणाचा डबा तर कधी घरी जे पदार्थ असायचे ते नेत होतो. या शाळेच्या पिशवीला आम्ही दप्तर म्हणत होतो. शाळेत गेल्यानंतर मध्येच शाळा सोडून पळायचे असल्यास वर्गाच्या मागील दरवाजातून किंवा एखाद्या तुटलेल्या खिडकीतून प्रसार होत होतो. शाळेमध्ये जाऊन मधल्या सुटी मध्ये कोणी शाळे शेजारी असलेल्या नदीत पोहण्याचा आनंद घेत होतो तर कोणी अर्ध्या लेखणीमध्ये जवळचे ज्येष्ठमध, आमसूल विकत असे.घरी अभ्यास करतांना दोन चार मित्र मिळून अभ्यास करीत होतो.बऱ्याच लोकांकडे वीज नसायची मग कंदिलाचा प्रकाश तर केव्हा केव्हा तेंव्हा टेंभा पेटवून अभ्यास होत होता.काही ठिकाणी वीज असायची परंतु भारनियमन असायचे.बाल वयाच्या गमतीजमती सांगत असताना बालवयातील अनेक गोष्टी जाणवतात. जग हे झपाट्याने बदललेले आहे जीवनात व्यतित करणाऱ्या पद्धतीमध्ये अगणित परिवर्तन झाले आहे. दिवसेंदिवस बदल होत आहे.१८ व्या शतकापासून तर २१व्या शतकापर्यंत परिवर्तन झालेले दिसून येते.आमच्या लहानपणाच्या अनेक गमती जमती आहे. पुरुषाचे पोशाख,स्त्रियांचे पेहराव, अलंकार यामध्ये अनेक बदल झालेले दिसून येते. एकेकाळी पुरुष धोती बंडी किंवा कुर्ता परिधान करीत होता पण आता पॅन्ट आणि शर्ट वाटले तर शेरवानी केव्हा केव्हा पार्टी सूट वापरत आहे. गळ्यामध्ये जाडसर सोन्याची चैन, हाताच्या बोटांमध्ये चार-पाच अंगठ्या आणि हातांमध्ये सोन्याचेच कडे वापरत आहे. एकेकाळी लुगडं परिधान करणारी महिला नऊवारी साडी, ब्लाउज घालित आहे, अलंकारांमध्ये बदल दिसून येत असून एकेकाळी गरसळी व बहुतांचे चांदीचे दागिने घालत असे त्यापूर्वी गळ्यात काचाच्या मन्याच्या माळा घालित होत्या आता मात्र चपलाहार, राणीहार आणि हातांमध्ये बोटांमध्ये अंगठ्या तर हातात पाटल्या घालतात.

वाहनांमध्ये झालेल्या बदल सुद्धा प्रकर्षाने लक्षात येतो.पूर्वी नातेवाईकांकडे विवाह,पाहुणचार किंवा मामानकडे जायचे असल्यास बैलबर्डीचा प्रवास असायचा.बैलांवर झूल टाकून दमनीमध्ये प्रवास करायचा. श्रीमंताकडेच याची सोय असायची सदन कास्तकाराकडे बैलगाडी , दमनि असायची, गरीब शेतकरी, शेतमजूर मात्र पायदळ प्रवास करायचा. संकल्पना बदलली आधुनिक युगामध्ये दमनी, बैलगाडी कालबाह्य झाली. पूर्वी ॲम्बेसेडर गाडी लक्झरी समजण्यात येत होती. सरकारी अधिकारा, उद्योगपती, श्रीमंत ही गाडी वापरत असेल पण मध्यंतरीच्या काळ इतका बदलला की लक्झरी गाड्या आता आल्या इनोव्हा,मर्सिडीज मध्ये लोक फिरत आहे.संगीतामध्ये सुद्धा फरक पडलेला आहे.आम्ही त्यावेळेस टेप रेकॉर्ड आणल्यानंतर एवढा आनंद होत होता.त्याची कॅसेट लावायची,त्याच्यावर गाणे लावायचे .त्यानंतर सीडी वर गाणे,संगीत तर आता मात्र पेनड्राईव लावल्या जाते.दूरदर्शनचा जमाना सुद्धा बदलला. तो काळ होतो कृष्ण धवल टी. वी. चा चित्र दिसले नाही किंवा टी. वी.मध्ये खरखर आवाज झाल्यास घरच्या वर चढून अँटिनत्वी दिशा बदलवीत होतो.



**डॉ. संजय साळीवकर**
अमरावती.
९४२३४२४८५१

---

# जागतिक कोकणी भाषा दिन

आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. प्रख्यात कोकणी कार्यकर्ते शेनाई गोंबेब यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. कोकणी भाषेला प्रोत्साहन देणे आणि तिची प्रतिष्ठा वाढवणे, कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार करणे हे मुख्य उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहे. या दिवशी कोकणी भाषेतील लेखकांचा आणि कलाकारांचा गौरव केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे.गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज




भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणी ही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाकां असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे. कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील जेष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००८ साली तर दामोदर मावजो यांना २०२१ साली मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा.

**श्याम ठाणेदार**

---

# भारत - नेपाळ संबंध सुधारतील?

नेपाळ हा भारताचा शेजारी देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. भारतातही बहुसंख्य हिंदुधर्मीय लोक असून भारताचा सर्वाधिक विश्वासार्ह देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नेपाळशी आपले मैत्रीचे आणि सौहार्दाचे संबंध राहिले आहेत. भारत आणि नेपाळ यांच्या दरम्यानची सीमारेषाही आपण मुक्त केली आहे म्हणजे नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करू शकतो तसेच भारतात व्यवसायही करू शकतो. नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव्य करून आहेत. दोन्ही देशात रोटीबेटीचा व्यवहार देखील होतो असे असले तरी तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात प्रचंड कटुता निर्माण झाली आहे. दोन्ही देशातील सौहार्दपूर्ण संबंध बिघडले आहेत. एकेकाळी भारताला सच्चा मित्र मानणारा नेपाळ आता भारताला स्पर्धक समजू लागला आहे. इतकेच नाही तर भारताचा भूभाग आपल्या नकाशात दाखवून भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान देऊ लागला आहे. के पी ओली शर्मा नावाचे गृहस्थ जेंव्हा नेपाळचे पंतप्रधान बनले तेव्हापासून दोन्ही देशातील कटुता वाढत गेली. के पी ओली शर्मा हे नेपाळचे पंतप्रधान बनल्यावर त्यांनी भारताशी असलेले सौहार्दाचे संबंध तोडून टाकले आणि भारताला आपला प्रतिस्पर्धी म्हणून घोषित केले अर्थात याला चीन जबाबदार आहे. के पी ओली शर्मा चीन धार्जिणे होते. चीनच्या नादी लागून त्यांनी भारताच्या सतत खोड्या काढण्याचा उद्योग केला. कधी त्यांनी भारताचा भूभाग नेपाळच्या नकाशात दाखवला तर कधी नेपाळच्या चलनी नोटांवर भारताचा भूभाग छापून भारताला चिथावले. अर्थात हा सर्व चीनच्या रणनीतीचा भाग होता. भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गांचा वापर करून भारताविरुद्ध फितवायचे आणि स्वतःकडे वळवायचे आणि त्याद्वारे भारतावर दबाव आणायचा ही रणनीती होती अर्थात आजही ती आहे याच रणनितीला के पी ओली शर्मा हे बळी पडले आणि त्यांनी भारताला थेट आव्हान दिले त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. आता मात्र चित्र बदलत आहे कारण चीन धार्जिणे के पी ओली शर्मा यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात नेपाळच्या जेन झी ने मागील वर्षी मोठा उठाव केला त्यात के पी ओली शर्मा यांना आपली खुर्ची सोडावी लागली.

---

# तुम्ही प्रेरित असाल तर...

**अगर हौसला बुलंद हो तो! कोई भी मुश्किल आपको रोक नही सकती!**
**हौसले के दम पर, इन्सान समंदर को भी पार कर सकता है !**

अलीकडेच बँकॉकमध्ये झालेल्या आर्चरी पॅराऑम्लिपिक स्पर्धेत बालपणी झालेल्या भीषण अपघातात आपले दोन्ही हात आणि दोन्ही पाय गमावलेल्या पायल नाग या १९ वर्षीय वयाच्या युवतीने कृत्रिम अवयवांच्या आधारे जागतिक तिरंदाजी स्पर्धेत आपली सहकारी आणि गेल्या वर्षीची विश्वविजेती शीतलदेवीला हरवत सुवर्णपदक जिंकत दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धेत नवा इतिहास रचत आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा चमत्कार जगाला दाखवला आहे. ज्याची हिम्मत अमर्याद असते तो अनेक संकटांवर मात करत यशाचे गौरीशंकर गाठतोच. या हिंदी कवितेची प्रचिती तिने साऱ्या जगाला घडविली आहे. अविश्वसनीय वाटेल अशी तिची संघर्षमय जीवन गाथा असली तरी पायलने मिळवलेले हे यश सत्य आणि वास्तव आहे. या देदीप्यमान यशानेच एका रात्रीत तिच्या पराक्रमाचा डंका जगभर वाजतो आहे. बँकॉकमध्ये झालेल्या दिव्यांगांच्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत तिने या आधी सांघिक गटात दोन सुवर्ण पदके मिळवली आहेत. तिरंदाजीच्या अंतिम स्पर्धेत तिने प्रतिस्पर्धी शीतलदेवीचा १३९ विरुध्द १३६ गुणांनी पराभव करत आपल्या अथक संघर्षाची विजयगाथा केली आहे.

ओडिसा राज्यातल्या बालंगीर जिल्ह्यातल्या जामुनबहाल या खेड्यात राहणारी पायल ही इयत्ता तिसरी शिकत होती. वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी घराच्या छपरावर खेळत असताना आधीच तुटलेल्या ११ हजार व्होल्टच्या विजेच्या प्रवाहाने ती कोसळली. वडिलांनी तिला



उपचारासाठी भुवनेश्वरच्या रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरने तिचे प्राण वाचवले पण या आघातात तिचे दोन्ही हात आणि दोन्ही पाय कापावे लागले. खेळण्या बागडण्याच्या वयात तिच्या डोळ्यासमोर फक्त अंधार होता तर गावातील लोक, शेजारी या मुलीला पायावर उभेही राहता येत नाही, ही पूर्णपणे अधू झालेली आहे. तिला विष देवून मारून टाका, असे कुचेष्टेने विजयकुमार नाग आणि तिच्या आईला हिणवत होते. आई-वडिलांनी हिम्मत न हारता तिला अनाथ आश्रमात दाखल केले आणि तिचा नवा संघर्ष सुरू झाला. शाळेत शिकता शिकता ती अपंगत्वावर मात करत जिद्दीने पाय नसतानाही यश मिळवण्याची स्वप्ने पहात होती. तोंडाने ती सुरेख चित्रे काढायला लागली. तिची ही अद्भुत चित्रकला पाहून जम्मूच्या माता वैष्णवदेवी देवस्थान मंडळाच्या क्रीडा संकुलाच्या तिरंदाजीचे प्रशिक्षक कुलदीप वेदवान हे तिला आश्रमशाळेत जावून भेटले आणि तिला बरोबर घेऊन आपल्या क्रीडा संकुलात आले. अवघ्या तीनच वर्षांपूर्वी ती क्रीडा संकुलात आली आणि तिच्या संघर्षमय जीवनाला नवी कलाटणी मिळाली. वेदवान यांनी तिच्यासाठी कृत्रिम हात-पाय बनवून घेतले आणि या निर्धारी मुलीला धनुर्विद्येत कुशल आणि पारंगत केले. तिरंदाजी विद्येचे द्रोणाचार्य असा लौकिक असलेल्या या शिक्षकाने तिच्यावर मातृ-पितृवत मायेची पाखर धरली. तिला तिरंदाजीची विद्या शिकवली, नव्हे जग जिंकण्याची नवी उमेद दिली. याच क्रीडा संकुलात दोन्ही हात अपघातात गमावलेल्या शीतलदेवीने गेल्या वर्षी दिव्यांगांच्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते आणि शीतलदेवी पायलची प्रेरणास्थानही आहे. आपल्या या सहकारी मैत्रिणीला अंतिम स्पर्धेत हारवत पायलने जिद्द, निर्धार, आत्मविश्वास, परिश्रम व अपार आत्मविश्वासाच्या बळावर आभाळालाही गवसणी घालता येते हे आपल्या पराक्रमाने सिध्द करून दाखवले आहे. आपल्या यशाचे श्रेय पायल आपले गुरू वेदवान आणि देशाला अर्पण करते.

**- श्रीहरी**

# बाळापूरात ११२ किलो गांजा जप्त

## ५५.७८ लाखांचा मुद्देमाल, दोघे अटकेत : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

*जिल्हा पोलीस दलाच्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत बाळापूर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांच्या संयुक्त पथकाने मंगळवारी (दि. ८) बेलदारपुरा परिसरात धडक कारवाई करत तब्बल ११२.०९ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत सुमारे ?५५ लाख ७८ हजार ०५७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.*



पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेला बेलदारपुरा भागात मोठ्या प्रमाणात गांजा साठवणूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठांना कळवून बाळापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रकाश झोडगे यांच्यासोबत समन्वय साधत संयुक्त छाप्याचे नियोजन करण्यात आले.

पथकाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संशयित ठिकाणी धाड टाकली असता घरासमोर एक ट्रक (MH-30-BD-3130) व पांढऱ्या रंगाची फॉर्च्यूनर (MH-05-BA-1010) उभी आढळली. पंच व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वाहनांची झडती घेतली असता फॉर्च्यूनरमध्ये एका पोत्यात ओलसर हिरवट रंगाचा गांजा आढळून आला. तसेच ट्रकच्या केबिनमध्ये दोन पोती गांजाची साठवणूक केलेली आढळली. या झडतीत एकूण ११२.०९ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची बाजार किंमत सुमारे २५ लाख ७८ हजार ०५७ रुपये इतकी आहे. तसेच गांजा वाहतुकीसाठी वापरलेला ट्रक (अंदाजे २० लाख) व फॉर्च्यूनर कार (अंदाजे १० लाख) असा एकूण ५५ लाख ७८ हजार ०५७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सीलबंद करण्यात आला. या प्रकरणी मोहम्मद असलम मो. आजम (वय ४९) व मोहम्मद अजमल मो. आजम (वय ४२, दोघेही रा. बेलदारपुरा, बाळापूर) यांना अटक करण्यात आली आहे. दोघांनी संगनमताने आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या गांजा साठवून विक्रीचा प्रयत्न केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यांच्या विरोधात अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (NDPS Act) कलम ८, २० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### यांनी केली कारवाई

*ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.*

*कारवाईत ठाणेदार प्रकाश झोडगे, पीएसआय गोपाल जाधव, पीएसआय नयन पाटील, पीएसआय शरद सैदाने, पीएसआय संभाजी हिवाळे, पीएसआय माधुरी पाटील, हेड कॉन्स्टेबल शेख हसन, रवि खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, मो. एजाज, शेख, वसीमोद्दीन, अ. माजिद, श्रीकांत पातोंड, अशोक सोनोने, चालक मनीष ठाकरे तसेच अंकुश मोरे, सोहेल खान, शुभम गई, संदीप पेड, सुरेश भारसाकळे, मोहन ढाकरे आदींचा सहभाग होता.*

# ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल, महाराष्ट्राचा १ ट्रिलियन वाटा महत्त्वाचा

**अकोला :** भारताला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे आणि त्यात महाराष्ट्राचा १ ट्रिलियन डॉलरचा वाटा सुनिश्चित करण्यावर विशेष भर दिला जात असून, या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि गावपातळीवरील समस्या शासनापर्यंत नेणे हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. 'अंत्योदय'चा खरा अर्थ हाच असल्याचे सांगत, प्रत्येक कार्यकर्ता या भावनेने काम केल्यासच 'विकसित भारत'चे स्वप्न साकार होईल, असे त्यांनी नमूद केले.

सोमवारी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन असून, ६ एप्रिल १९८० रोजी स्थापन झालेल्या पक्षाने ४६ वर्षे पूर्ण करून ४७व्या वर्षात पदार्पण केले आहे.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४४६/२०२६ — प्रोसेस नं.४३४३/२०२६
चौ.ता. १२/०६/२०२६ — दिनांक : ०१/०४/२०२६

**अर्जदार :** १. सुशांत भगवानदास अग्रवाल २. आयुष भगवानदास अग्रवाल दोघेही रा. गीता नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सीमा भगवानदास अग्रवाल
**पत्ता :-** रा. गीता नगर, विवेकानंद आश्रम जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सीमा भगवानदास अग्रवाल यांचे दि. ०५/०२/२०२६ रोजी राहत्या घरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५१९/२०२६ — प्रोसेस नं.४५७८/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ — दिनांक : ०६/०४/२०२६

**अर्जदार :** १. शांताबाई रामभाउ उमाळे २. पुष्पा गणेश उमाळे ३. कु. खुशी गणेश उमाळे ४. प्रणव गणेश उमाळे सर्व रा. महादेव मंदिराजवळ, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गणेश रामभाउ उमाळे
**पत्ता :-** रा. महादेव मंदिराजवळ, माळीपूरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गणेश रामभाउ उमाळे यांचे दि. १४/०४/२०२५ रोजी राहत्या घरी बोरगाव मंजू, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३३५/२०२६ — प्रोसेस नं.३०४७/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. सुलोचना प्रकाश इंगोले २. सिमा प्रकाश इंगोले दोन्ही रा. न्यु भिम नगर, आर.टी.ओ. ऑफिस रोड, गौतम नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रकाश नारायण इंगोले
**पत्ता :-** रा. न्यु भिम नगर, गौतम नगर, गॅस गोडाउन जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश नारायण इंगोले यांचे दि. २४/०८/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५०८/२०२६ — प्रोसेस नं.४४६१/२०२६
चौ.ता. ०६/०५/२०२६ — दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती आशा गजानन सोळंके २. पल्लवी गजानन सोळंके ३. पवन गजानन सोळंके ४. राधिका गजानन सोळंके सर्व रा. श्रद्धा नगर, डी-१२, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गजानन ज्ञानसिंग सोळंके
**पत्ता :-** रा. श्रद्धा नगर, डी-१२, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गजानन ज्ञानसिंग सोळंके यांचे दि. ०३/१२/२०२५ रोजी एम्स हॉस्पिटल, नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लिमिटेड मार्फत १०० 'रुग्णांना पोषण आहार किट'चे वाटप



**अकोला :** बाळापूर तालुक्याअंतर्गत येणाऱ्या गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लिमिटेड व्याळा येथे प्रधानमंत्री टी.बी मुक्त भारत अभियान अंतर्गत तालुक्यातील १०० क्षय रुग्णांना पोषण आहार किट करण्यात आले.. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रिजमोहन चितलांगे अध्यक्ष गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लिमिटेड, अनिल जोशी, डॉ. प्रियेश शर्मा वैद्यकीय अधिकारी जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालय अकोला, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पारस चे डॉक्टर . योगेश्वर उमक, डॉक्टर कोमल वारोकर, डॉ.पल्लवी गिरी , डॉ.इम्रान देशमुख, डॉ. तौफिक इकबाल, व जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालयातील वसंत उन्हाळे, कपिल होळकर, नावेद अन्सारी आदी उपस्थित होते प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षय मित्र हा उपक्रम सुरू असून यामध्ये क्षय रुग्णांना सामुदायिक सहाय्य हा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा एक प्रमुख उपक्रम आहे. ज्याच्या द्वारे रुग्णांना अतिरिक्त साह्यय मिळावे, यासाठी निक्षय मित्र बनवून त्यांच्या मार्फत पोषण आहार कीट वाटप करण्यात येतात गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लिमिटेड यांचे मार्फत १०० क्षयरुग्णांना ६ महिने करिता दत्तक घेतले असून दरमहा पोषण आहार किट चे वाटप कंपनी मार्फत करण्यात येणार आहे या पोषण आहार कीट मध्ये :- ज्वारी, तुरडाळ, शेंगदाणे, तेल, मटकी, गुळ ई. समावेश आहे. हा उपक्रम डॉ बळीराम गाढवे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा मार्गदर्शनात सुरु आहे समाजातील सहकारी संस्था कार्पोरेट एनजीओ वैयक्तिक व्यक्ती निवडून आलेले प्रतिनिधी या सर्वांनी उपक्रमामध्ये सहभागी होऊन निक्षय मित्र बनवून क्षय रुग्णांना सहाय्य करावे असे आवाहन डॉ मनीष शर्मा जिल्हा क्षयरोग अधिकारी अकोला यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४५३/२०२६ — प्रोसेस नं.४१२५/२०२६
चौ.ता. २९/०४/२०२६ — दिनांक : २४/०३/२०२६

**अर्जदार :** १. समाधान मुकिंदा गोपनारायण रा. न्यु भिम नगर, कृषी नगर जवळ, अकोला. ता. जि. अकोला. २. बापुराव मुकिंदा गोपनारायण रा. पंचशिल नगर, कृषी नगर जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ३. इंदू किसन गवई रा. सिद्धार्थ नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. ४. श्रीमती लता शेषराव गोपनारायण ५. अमर शेषराव गोपनारायण ६. पूनम शेषराव गोपनारायण अर्जदार क. ४ ते ६ रा. मांगूळ, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सिंधूबाई श्रीकृष्ण सिरसाट
**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सिंधूबाई श्रीकृष्ण सिरसाट यांचे दि. १४/१०/२०१९ रोजी बोरगाव मंजू, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३८०/२०२६ — प्रोसेस नं.४६२६/२०२६
चौ.ता. १३/०४/२०२६ — दिनांक : ०६/०४/२०२६

**अर्जदार :** राजेश सहदेव दवंडकर रा. देविदास सहारे हॉटेलच्या मागे, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सहदेव बाबुराव दवंडकर
**पत्ता :-** रा. देविदास सहारे हॉटेलच्या मागे, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सहदेव बाबुराव दवंडकर यांचे दि. २२/०२/१९८३ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## Change In Name

I have Changed My Name Form
**NAJHEEYA ANJUM SHE NASEER**
-TO-
**NAZIYA ANJUM MOHAMMAD SHAFI**
My residential Address in 21 Mail, Mahan TQ.Barshitakli Dist.Akola 444405

## Change In Name

I have Changed My Name Form
**NAJMA BI M USMAN**
-TO-
**NAJMABI RAFIQ KHAN**
My residential Address in Majediya Plot, Akot Dist. Akola 444101

## Change In Name

I have Changed My Name Form
**MOHD SHAFIQUE MODH RAFIQUE**
-TO-
**MOHAMMAD SHAFIK ABDUL RAFIK**
My residential Address in 21 Mail, Mahan TQ.Barshitakli Dist.Akola 444405

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ९३४/ २०२६ — दि. ०७/०४/२०२६
अर्ज क्रमांक :- ३३/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक**- श्री.संत भारत भाऊजी महाराज आध्यात्मिक ट्रस्ट बाभूळगाव जहा. ता.जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. संत भारत भाऊजी महाराज उर्फ (भारत प्रकाश खंडारे) रा.मु.पो. बाभूळगाव जहा. ता. जि. अकोला.

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रोख रक्कमरु. ७०७/- श्री. संत भारत भाऊजी महाराज उर्फ (भारत प्रकाश खंडारे) यांचे ताब्यात आहे.

**आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- ०७/०४/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकाला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५००/२०२६ — प्रोसेस नं.४३१८/२०२६
चौ.ता. ०७/०५/२०२६ — दिनांक : ३०/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती आशा सुनिल डोंगरे २. सतीष सुनिल डोंगरे ३. सुरज सुनिल डोंगरे सर्व रा. पाळोदी, पो. खांबोरा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुनिल सुर्यभान डोंगरे
**पत्ता :-** रा. पाळोदी, पो. खांबोरा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुनिल सुर्यभान डोंगरे यांचे दि. १०/०३/२०२६ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४५७/२०२६ — प्रोसेस नं.४४४२/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** १. देविदास अशोक तायडे २. गजानन अशोक तायडे ३. किसन अशोक तायडे क. १ ते ३ रा. अशोक नगर, उगवा, ता. जि. अकोला. ४. अरूण अशोक तायडे (मयत) ४अ. सविता अरूण तायडे ४ब. अजय अरूण तायडे ४क. विजय अरूण तायडे सर्व रा. हातरुण, ता. बाळापूर, जि. अकोला ४ड. नंदिनी जितेंद्र इंगळे रा. निमकर्दा, ता. बाळापूर जि. अकोला. ५. छाया देविदास वानखडे ६. सोनू जयदिप इंगळे दोन्ही रा. निमकर्दा, ता. बाळापूर, जि. अकोला. ७. विमल सुधाकर अंभोरे रा. सोनला बोरगाव मंजु, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक तुकाराम तायडे
**पत्ता :-** रा. अशोक नगर, उगवा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक तुकाराम तायडे यांचे दि. २७/०७/२०१५ रोजी अशोक नगर, उगवा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३००००६७३१४ (आर) | एएमसी फॉर जीई–आयपी (एफएएनयूसी) मेक पीएलसीज इंस्टॉलड अॅट व्हेरियस लोकेशनस ऑफ यू–६अँड ७ अॅट आय अँड सी–१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ३.९५ लाख ७४५०/– | ०९.०४.२०२६ ते १६.०४.२०२६ | १७.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६६६८८ (आर) | सप्लाय ऑफ स्टेबल ब्लीचिंग पाऊडर , ग्रेड–२, आयएस–१०६५/१९८९ फॉर डब्ल्यूटीपी यू–८, स्टेज –२, टीपीएस, परळी वै. | १३.१४ लाख १६६४०/– | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७१४१ (आर) | अॅन्युअल सर्विस कॉंट्रॅक्ट फॉर मेंटेनंस ऑफ एलेक्ट्रोनिक वै ब्रिज अॅट सीएचपी–ईएम – २,५०मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | १.९४ लाख ५४४६/– | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७१५८ (आर) | वर्क ऑफ प्रोव्हायडिंग सफिशयंट मॅनपॉवर फॉर चोक अप रिमोव्हल ऑफ वोब्लर फीडर्स अॅट सीएचपी–२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४६.०९ लाख ४९५९६/ | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७३१६ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस टाइप्स ऑफ ट्रान्सड्युसर अॅट ईटी यू–६अँड ७, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४.०६ लाख ७५६१/ | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७३१७ (आर) | टेक्निकल सर्विसेस ऑफ टेस्टिंग अँड कॅलिब्रेशन ऑफ एलेक्ट्रोनिक मॉड्यूल फॉर बीटीएस २००० सिस्टिम ड्यूरिंग एओएच ऑफ यू–७ अॅट ईटी यू–६अँड ७,२५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २.०३ लाख ५५३१/– | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७३३९ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ मायक्रोप्रोसेसर बेस्ड डिजिटल इलेक्ट्रॉनिक एनर्जि मिटर फॉर एनर्जि मॅनेजमेंट सिस्टम (ईएमएस) अॅट ईटी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.६१ लाख ६११६/– | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७३८५ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस साइज फास्टनर्स फॉर एओएच ऑफ यू–७ अॅट एएचपी–१, टीपीएस, परळी वै. | ३.०४ लाख ६५४८/– | ०९.०४.२०२६ ते २४.०४.२०२६ | २५.०४.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५९७२ | सप्लाय ऑफ स्टॅकर रिक्लेमर स्पेयर्स फॉर १४०० एमएम कन्व्हेयर्स अॅट सीएचपी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १२.१२ लाख १५६२०/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६६२९१ | सप्लाय ऑफ फ्लेक्सिबल पिन बुश कपलिंग फॉर व्हेरियस कन्वेहर्स इंस्टॉलड अॅट सीएचपी–२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ६.९२ लाख १०४२३/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६६७७४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेयर्स फॉर एचपी अँड बी अँड एस पंप्स फॉर कोल मिल बीबीडी–४७७२ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ५४.३४ लाख ५७८४८/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६६९०९ | एएमसी फॉर प्रिवेंटिव अँड ब्रेकडाउन मेंटेनेंस ऑफ स्नायडर पीएलसी अॅट डीएम, पीटीपी, एससीएसएस फॉर आय अँड सी –२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३.१७ लाख ६६७६/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६६९२२ | टू इयर अॅन्युअल वर्क ऑफ डोर टू डोर कलेक्शन ऑफ गारबेज बाय रिंगिंग बेल इन फ्रंट ऑफ बिल्डिंगज क्वार्टर्स अँड डीसपोजल ऑफ गारबेज फ्रॉम कॉलनी अॅट टीपीएस, परळी वै. | ८५.९७ लाख ८९४७८/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६६९८६ | वर्क ऑफ रीडक्शन ऑफ टोटल अॅसिडिटी नंबर (टीएएन) ऑफ एफआरएफ यूज्ड इन टर्बाइन गव्हर्निंग सिस्टिम ड्यूरिंग यू–७ एओएच अॅट टीएम–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४९.९८ लाख ५३४८०/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७१७७ | एएमसी फॉर वॉल सूट ब्लोवर अॅट इलेक्ट्रिकल टेस्टिंग, यूनिट–६अँड ७ ,२५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४.२० लाख ७७०८/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६७३७९ | एएमसी फॉर सर्विसिंग ऑफ कोल मिल जर्नल रोलर असेम्ब्ली ऑफ एक्सआरपी–९०३ कोल मिल अॅट यू–८, बीएम, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४.८९लाख ८३९५/– | ०९.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ | ०२.०५.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्तीः मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

# सेलूच्या बँकेत ग्राहकांची 'गोची', कर्मचाऱ्यांची मनमानी

## सेलूकरांचा प्रश्नः ग्राहक सेवा की त्रास देण्याची शाळा?

**सेलू । अभय बेदमोहता**

स्थानिक बँक ऑफ इंडिया शाखेत नेहमीच ग्राहकांची गोची होत असून एकाच काऊटंरवरून व्यवहार केले जात असल्याने पैसे काढण्यासाठी आलेल्यांना तास न तास रांगेत उभे राहावे लागते. येथील या शाखेचा कारभार हा ग्राहकांच्या सुविधेसाठी की गैरसोयीसाठी असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहे.

या बँकेतील ग्राहक संख्या तथा होणारे व्यवहार पाहता येथे दोन काऊटंर नियमीत सुरु पाहीजे. पण येथे एकाच काऊटंरवरून सर्व व्यवहार चालते. ग्राहकांची गर्दी पाहता दुसरे काऊटंर सुरू करण्याचे सौजन्य या येथील अधिकारी तथा कर्मचाऱ्यांकडे नाही. यामुळे व्यवहारासाठी आलेल्या




वयोवृध्दांची येथे फरफट होत आहे. लोकांना तास न तास रांगेत उभे राहावे लागत असल्याने अनेक जण या बँकेचे कामकाजाला कंटाळलेआहे. या बँकेत कामानिमित्त आलेल्या नागरीकांना त्रास देण्याचे धोरण या येथील कर्मचारी वर्गाचे असून त्यांचे चुकीचे मार्गदर्शन तथा उर्मट वर्तणुकीमुळे अनेक जण त्रस्त झाले आहे. यामुळे बँकेच्या कारभाराविषयी येथे प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे. ही बँक ग्राहकांना चांगली सेवा देण्यापेक्षा त्यांना त्रास देण्यात धन्यता मानतात असे चित्र येथे पाहायला मिळते.

येथील कर्मचाऱ्यांची मानसिकता काम करण्याची नसल्याचे यावरून स्पष्ट होते. अनेकांचे खात्याला नॉमीनी दर्ज असतांना ती रेकॉर्डवर घेतली

येथे या बँकेत नेहमीच अशी अवस्था असते आमचेसारखे जेष्ठ नागरीकांना येथे तास न तास रांगेत उभे राहावे लागते याबाबत व्यवस्थापकाकडे विचारणा केल्यास आमचेकडे स्टाफ कमी आहे असे उत्तर दिले जाते

**मनोहर सोमनाथे,** माजी वरिष्ठ भूजल वैज्ञानिक,सेलू

गेली नसल्याचे यापूर्वी निदर्शनास आले आहे. पासबुकवर नॉमीनी समोर एस असा उल्लेख असताना नॉमीनी नसल्याचे सांगतात. यावरून येथील कामकाजाची कल्पना येते. तसेच अनेक मैय्यत खातेदारांचे पैसे यांचे अशा धोरणामुळे तसेच पडून आहे.त्यांचे वारसानाची येथे अडवणूक होत असून त्यांना त्रास देण्याचे धोरण येथील कर्मचाऱ्यांचे असल्याने अनेकांनी बँकेचा रस्ता ओलांडने सोडून दिले हा खातेधारकावर अन्याय आहे.

येथे कर्मचारी मनमानी पद्धतीने कारभार करीत असून वरिष्ठांचा त्यांचेवर वचक राहिलेला नाही. वरिष्ठांना ते जुमानत नसल्याचे स्पष्ट होत आहे.येथे ग्राहकांची होणारी गैरसोय आणि कर्मचाऱ्यांची अशी वागणूक पाहता संबधीत वरिष्ठांनी याकडे जातीने लक्ष वेधून त्वरीत उपाययोजना करावी व यास जबाबदार असणाऱ्या वर कायदेशीर कारवाई करून ग्राहकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी नागरिकांची मागणी आहे.

### वारंवार सांगुनही नगरसेवकांचेच ऐकेना...!

# नगरसेवक महोदयांना शेवटी घ्यावा लागला सोशल मीडियाचाच आधार

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** वार्डातील स्वच्छतेसाठी वारंवार सांगून सुद्धा नगरसेवकाचेच ऐकत नसल्याने शेवटी नगरसेवक महोदयांनी सोशल मीडियाचाच आधार घेत वार्डातील कचऱ्याचा व्हिडिओ बनवुन सोशल मीडियावर टाकल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे. विशेष म्हणजे नगरसेवक प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रवादीचा असल्याने तर हा दुधाभाव होत नाही ना असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सिंदी रेल्वे नगरपालीकेत भारतीय जनता पक्षाचे स्पष्ट बहुमताचे सरकार असुन राणी कलोडे अध्यक्ष तर अकील शेख उपाध्यक्षपदी विराजमान असुन पाणीपुरवठा आणि स्वच्छता समीतीचे ते पदसिद्ध सभापती आहे. मात्र ९ सदस्य संख्येच्या असलेल्या तुल्यबळ विरोधी गटाचे राष्ट्रवादीचे (शरद पवार) नगरसेवक असलेले तुषार हिंगणेकर यांच्या वार्डातील स्वच्छतेचा विषय असतांनी नगरसेवक हिंगणेकर यांनी पालीकेच्या सफाई कर्मचाऱ्याला वारंवार सुचना करुन सुध्दा जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करीत त्यांनी या साचलेल्या कचऱ्याचा व्हिडिओ बनवित समाज



माध्यमांवर पोस्ट केल्याने सत्ताधारी आणि विरोधी गटातील संघर्ष उघड झाल्याचे पाहायला मिळाले. वाढलेल्या लोकसंख्येनुसार शहरात १७ वार्डाची संख्या वाढवुन २० करण्यात आली.परिणामता पालीकेची सदस्यसंख्या सुध्दा २० झाली मात्र २५ हजार लोकसंख्येच्या शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी केवळ १३ सफाई कर्मचा?ी कसे पार पाडतील हा मोठा प्रश्न अनुत्तरित आहे. सफाई कर्मचाऱ्याची संख्या वाढविणे अगत्याचे झाले आहे अन्यथा अशा समस्या दररोजच्या होईल एवढे मात्र खरे.....!

# शिळया कढीला ऊत आणून श्रेय लाटण्याचा खासदारांचा प्रयत्न

## पुलगाव-आर्वी-वरूड रेल्वेः जुना निधी घेऊन नव्या यशाचा दावा



**आर्वी जनमाध्यम –** पुलगाव-आर्वी-वरूड रेल्वे मार्गाच्या ब्रॉडगेज परिवर्तन प्रकल्पाचा जुना निधी घेऊन खासदार अमर काळे आता नव्या यशाचा दावा करत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया आ. सुमित वानखेडे यांनी दिली आहे. रेल्वे मंत्रालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी मंजूर केलेला निधी आता २०२६ मध्ये श्रेय घेण्यासाठी वापरण्याचा खासदारांचा प्रयत्न चर्चेत आहे.

एप्रिल २०२४ मध्ये तळेगावात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रकल्पासाठी निधीची घोषणा केली होती. प्रशासकीय प्रक्रियेनुसार ऑगस्ट २०२४ मध्ये पहिल्या लाईनचे सर्वेक्षण टेंडर काढण्यात आले होते.

आमदार सुमित वानखेडे म्हणाले, या प्रकल्पासाठी आधीच २.५ कोटी रुपये मंजूर झाले असून यंदाच्या अर्थसंकल्पातही उर्वरित कामासाठी २.५ कोटी रुपये निश्चित झाले आहेत. केंद्र-राज्य सरकार जनतेच्या आश्वासनांची पूर्तता करण्यास कटिबद्ध आहेत.

उपलब्ध कागदपत्रांनुसार, खासदारांचा दावा फोल ठरत असून जुना निधी घेऊन श्रेय लाटणे म्हणजे 'शिळ्या कढीला ऊत' आणण्यासारखे आहे. लोक खोटे दावे मानणार नाहीत, असा सूर मतदाराच्या वतीने आ, सुमित वानखेडे यांनी केला आहे.

जनतेच्या सुविधा वाढवणे आणि विकासकामांना गती देणे हेच आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. त्यामुळे केवळ राजकीय हेतूने केलेले आरोप पूर्णपणे चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहेत. मी कोणत्याही श्रेयासाठी नाही, तर जनतेच्या विकासासाठी काम करत असून प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे.

**अमर काळे, खासदार वर्धा**

### सरकारी पगारावर साहेबांची गुलामी

# कर्मचारी कार्यालय सोडून वैयक्तिक घरकामासाठी राबतात

**सेलू जनमाध्यम**

एकीकडे सर्वसामान्य जनता करांच्या दबावाखाली पिळली जाते, तर दुसरीकडे तिच्या घामाच्या पैशातून पगार घेणारे सरकारी कर्मचारी स्वतःच्या कार्यालयातील बड्या अधिकाऱ्यांच्या, पांढरपेशा नेत्यांच्या व संस्थाचालकांच्या घरी घरकामासाठी राबत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. महाराष्ट्र शासनाचे आदेश असूनही हा नियम राजरोसपणे पायमल्ली होत असल्याचे अनेक ठिकाणी दिसत आहे.

जिल्ह्यातील आणि महाराष्ट्रातील अनेक अधिकारी, राजकीय नेते आणि स्वयंभू सहकारी संस्थांचे संचालक आपल्या चतुर्थी श्रेणी कर्मचाऱ्यांना कार्यालयातील कामाऐवजी वैयक्तिक कामासाठी वापरत आहेत. शिपाई, मदतनीस यांची उपस्थिती कागदोपत्री कार्यालयात दाखवली जाते, परंतु प्रत्यक्षात ते साहेबांच्या घरातील भाजीपाला आणणे, मुलांची शाळा-ने आण करणे, साफसफाई



व अन्य घरकामात व्यस्त असतात.

रिक्त पदांचा गैरफायदा घेत शिपाई 'टेबल वर्क' करत आहेत. आरोग्य विभाग, तहसील कार्यालय, पंचायत समिती, शिक्षण व खाजगी सहकारी संस्था या सर्व ठिकाणी चतुर्थी श्रेणी कर्मचाऱ्यांना कारकुनी कामांमध्ये लावले जाते, तर त्यांचा पगार सरकारच्या तिजोरीतून दिला जातो. ही घोर अनैतिकता आणि सरकारी निधीचा बेशिस्त वापर उघड आहे.

विभागीय परिपत्रकानुसार, सरकारी अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कामासाठी वापरणे कायदेशीर गुन्हा आहे. तरीही शासनाच्या आदेशांची पायमल्ली होत असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण असून त्यांना बदली व नोकरीवरून हटवण्याची धमकी दिली जाते.यावर उपाय म्हणून तातडीने रिक्त पदे भरणे, सरकारी कार्यालयांमध्ये आकस्मिक तपासणी, बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य करणे, गोपनीय तक्रार निवारणाची सोय आणि नियम भंग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई आवश्यक आहे. प्रश्न फक्त इतकाच उरतो नियम बनवणारे शासन आपल्याच नियमांची अंमलबजावणी कधी करणार की 'साहेबांची मर्जी' कायद्यापेक्षा मोठी ठरेल, असा प्रश्न उपस्थित होत आहे,

# आईवरच मुलाचा हल्ला!

## जागेच्या वादातून वृद्धेला बेदम मारहाण

**पुलगाव जनमाध्यम :** जागेच्या किरकोळ वादाने थेट आईवरच हात उगारण्यापर्यंत प्रकरण चिघळल्याची धक्कादायक घटना नाचणगाव परिसरातील खडकपुरा येथे घडली. या घटनेत इंदू दोनारकर (वय ७५) या वृद्ध महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदू दोनारकर या मुलीसह वास्तव्यास असून रोजमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचा मुलगा गजानन दोनारकर हा शेजारीच राहतो. घराच्या जागेवरून आई-मुलामध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. गजाननने घर बांधकामासाठी खड्डे खोदून सेंट्रिंगचे साहित्य आणले होते. मात्र, जागेचा वाद सुटलेला नसताना काम सुरू करण्यास इंदू यांनी विरोध केला. याच कारणावरून संतापलेल्या गजाननने आईवर सेंट्रिंगच्या पाटीने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता वाद सोडविण्यासाठी मध्ये पडलेल्या बहिणीलाही मारहाण करण्यात आली.

या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून 'आईवर हात उगारणाऱ्या' मुलाविरोधात नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, जखमी इंदू दोनारकर यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

# वर्धा तालुक्यात 'समग्र शिक्षा' जनसुनावणी

**वर्धा जनमाध्यम –** वर्धा तालुक्यातील शाळांचा विकास, विद्यार्थ्यांचे कल्याण आणि निधीचा योग्य वापर तपासण्यासाठी मंगळवार, ७ एप्रिल २०२६ रोजी पंचायत समिती सभागृह, वर्धा येथे 'समग्र शिक्षा सामाजिक अंकेक्षण जनसुनावणी पार पडली. ही सुनावणी महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

जनसुनावणीसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) चे ज्येष्ठ अधिव्याख्याता संजयकुमार नवले, दत्तपूर ग्रामोपयोगी विज्ञान केंद्राचे प्रकल्प सहाय्यक राहुल डंबारे, सामाजिक अंकेक्षण सोसायटीचे जिल्हा साधन व्यक्ती नेमीचंद चव्हाण,



उमेद तालुका कार्यालयाच्या शुभांगी कोहळे, गटशिक्षणाधिकारी धर्मपाल कुमरे आणि तालुका साधन व्यक्ती शुभम कंटाळे उपस्थित होते.

कार्यक्रमात रोखपाल व वरिष्ठ लेखा लिपिक रविकांत देशमुख यांनी अंकेक्षणाच्या सर्व मुद्द्यांचे वाचन केले. मुख्य चर्चा शालेय पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांचे कल्याण, निधी पारदर्शकता आणि सामुदायिक सहभाग यावर केंद्रित होती. यामध्ये शाळांमधील वर्गखोली, पिण्याचे पाणी, शौचालयांची स्थिती, गणवेश, पाठ्यपुस्तके, प्रवास भत्ता व ऍेए- विद्यार्थ्यांसाठी लाभ यावर सविस्तर चर्चा झाली. या सुनावणीला वर्धा तालुक्यातील १३२ शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी, सर्व विशेष शिक्षक आणि समग्र शिक्षा अभियानातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांनी शाळांमधील अडचणी, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आवश्यक उपाययोजना आणि निधीचा परिणाम याबाबत मते मांडली. पॅनल सदस्यांनी अंकेक्षण प्रक्रियेमुळे शालेय कामकाज अधिक पारदर्शक होईल आणि त्रुटी दूर करता येतील असा विश्वास व्यक्त केला. वर्धा तालुक्यातील 'समग्र शिक्षा' जनसुनावणीमुळे शाळांचा विकास, विद्यार्थी कल्याण आणि निधीचा योग्य उपयोग या बाबींवर ठोस कामकाज सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

# अपघातात सायकलस्वार जखमी

**सेलू :** दुधाच्या कॅन नेणाऱ्या भरधाव मालवाहूने सायकलला जबर धडक दिली. या अपघायात विलास भांडेकर (वय ५७, रा. वडगाव (जंगली) हे जखमी झाले. हा अपघात वडगाव शिवारात झाला. नामदेव कोटनाके (वय ५५) आणि विलास भांडेकर हे दोघेही सायकलने कामाला जात होते. दरम्यान, सुरेश रहाटे यांच्या शेताजवळ मागाहून येणाऱ्या मालवाहू ने सायकलला जोरदार




धडक दिली. यात विलास भांडेकर हे जखमी झाले. या प्रकरणी तक्रारीवरून सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# सिंदी रेल्वे ग्रामीण रुग्णालय मंजुरीसाठी आरोग्य मंत्री आंबीटकर यांची बैठक

## १५३७ रक्ताने लिहिलेली पत्रे सरकारसमोर, आमदार-पदाधिकारींनी केली जोरदार मागणी

**हिंगणघाट जनमाध्यम**

सिंदी रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालय मंजुरीसाठी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आंबीटकर यांची आमदार रोहित पवार व वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी भेट घेऊन सकारात्मक चर्चा केली. ही बैठक सिंदी-रेल्वे परिसरातील आरोग्य सुविधांचा अभाव दूर करण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे.सिंदी-रेल्वे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळावा, हि मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या मागणीला राष्ट्रवादी काँग्रेस नेते आमदार जयंत पाटील व प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित करून जोरदार पाठपुरावा दिला होता, तर अतुल वांदिले यांनी शासनदरबारी सातत्यपूर्ण प्रयत्न केले. त्यामुळे राज्य सरकारने या विषयावर सकारात्मक निर्णयाची अधिकृत घोषणा केली. याआधी २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेले 'रक्ताने पत्र' आंदोलन नागरिकांच्या इच्छाशक्तीची जाणीव करून



देणारे ठरले. १५०० पेक्षा जास्त नागरिकांनी स्वतःच्या रक्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आपली व्यथा मांडली होती. या आंदोलनाचे नेतृत्व अमोल सोनटक्के व आशिष देवतळे यांनी केले, तर जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी स्वतः रक्ताने स्वाक्षरी करून पाठपुराव्याला नवी ऊर्जा दिली. आंबीटकर यांना झालेल्या भेटीत सिंदी-रेल्वेच्या आरोग्य समस्यांवर थेट चर्चा करण्यात आली. आमदार आणि पदाधिकारी यांनी प्रशासकीय अडथळ्यांविरुद्ध जोरदार मागणी केली आणि राज्य सरकारला त्वरीत कार्यवाही करण्याची विनंती केली.या प्रसंगी प्रदेश सरचिटणीस सुनिल राऊत, प्रदेश प्रवक्ते नितेश कराळे, अमोल सोनटक्के व नगरसेवक आशिष सोनटक्के उपस्थित होते.

जय हो पाताळ मातेशी

# ३०७ वर्षांच्या गळयाच्या रथयात्रेने पवनुर नगरीत रंगवले भावनिक सोहळा

**वर्धा जनमाध्यम –** वर्धा तालुक्यातील धार्मिक दृष्ट्या अत्यंत मानली जाणारी पवनुर गावातील गळ्याची रथयात्रा मंगळवार, ७ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता संपन्न झाली. पंचक्रोशीतील भाविकांनी उत्साह आणि श्रद्धेच्या भावनांनी या रथयात्रेला प्रचंड गर्दी केली. गावाच्या मध्यभागातून सुरू झालेली ही यात्रा पाताळ माता मंदिरात समारोपाला आली, जिथे भगत अरुण लांडे आणि मारोती दाभेकर यांनी गावाभर



लाकडी जुल्यावर लटकून परिक्रमा केली.

**३०७ वर्षांची परंपरा**

गेल्या ३०७ वर्षांपासून ही रथयात्रा गावात पारंपरिक धार्मिक महत्त्वाची मानली जाते. या यात्रेचा उद्देश पवनुर गावाला कुठलाही अरिष्ट येऊ नये, सामाजिक सलोखा अबाधित राहावा आणि ग्रामस्थांमध्ये एकात्मता वाढावी, असे ठरवून दरवर्षी आयोजन केले जाते. यात्रेत दोन लाकडी भगत लटकवले जातात आणि हे भक्त सुमारे ५० फूट उंचीवर जुल्यावर लटकून रथाचा परिक्रमा करतात.

**भक्तिभाव, उत्साह आणि सजावट**

या वर्षीचा रथ अतिशय आकर्षकपणे सजविला गेला. यात्रेला आलेल्या भाविकांची संख्या खूप होती, तर गावकरी, ग्रामीण भागातील नागरिक आणि शेजारी गावातील लोक देखील या सोहळ्याला उपस्थित होते. रथ सजविण्यात प्रवीण महात्मे, प्रवीण चौधरी, आशिष दाभेकर, गणेश कारणकर, खुशाल राऊत, राजेश कडू, विक्रम कडू, रोशन धाकुलकर, रामजी देशमुख, निळकंठ राऊत, अनुप चौधरी, नयन चौधरी, धनराज कोंडलकर, दिनेश कोंडलकर, रोशन पांडे आणि सुरेंद्र कारणकर यांनी सहभाग घेतला.

**सुव्यवस्था आणि सुरक्षिततेची जबाबदारी**

यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी खरंगना पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत पाटील, गोपनीय शाखा विभागाचे पोलीस कॉन्स्टेबल सतीश अहेर, दिनेश धवणे, किशोर वाडेकर, प्रशांत चिंचोणे आणि पोलीस पाटील हेमलता गवळी पाटणकर यांनी कायदा व सुव्यवस्था सांभाळली. तर महावितरणच्या सहायक अभियंता पियुष कायरकर आणि कनिष्ठ तंत्रज्ञ निलेश झुंझुरकर यांनी विजेची सोय सुरळीत ठेवली.

**भाविकांचा उत्साह आणि श्रद्धा**

भक्तांनी रथाभोवती जयघोष करत परिक्रमा केली, तर भगत जुल्यावर लटकत रथाचा समारोप पाताळ माता मंदिरात केला. हे मंदिर गावाचे ग्रामदैवत असून गावकऱ्यांची मातेशी निस्सीम श्रद्धा आणि भक्तिभावाची खरी झळक आहे.

छायाचित्रात दिसते की लाकडी जुला गावाभर फिरताना भगत लटकलेले आहेत आणि भक्त भावपूर्ण नजरेने त्यांच्याकडे पाहत आहेत. पवनुरच्या या ऐतिहासिक रथयात्रेत धार्मिक श्रद्धा, भावनिक एकात्मता आणि ग्रामस्थांचा उत्साह एकत्र दिसून आला. येथील प्रत्येक व्यक्तीने मातेशीच्या दर्शनाचा आनंद घेतला, तर परंपरेचा भाव कायम ठेवण्याचे ध्येय पुन्हा एकदा सिद्ध झाले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १३२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com


## संक्षिप्त



### आ.जगताप यांच्या उपस्थितीत इंटक पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

**आसेगाव पूर्णा-**शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन (इंटक) अध्यक्ष आमदार भाई जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. बैठकीत संघटनेच्या सभासदांच्या विविध तक्रारींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या तक्रारींचे लवकर निवारण करण्यात येईल, अशी ग्वाही भाई जगताप यांनी दिली. तसेच वीज क्षेत्रातील संभाव्य खाजगीकरण, नवीन कामगार संहितांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांची माहिती देत पुढील वाटचालीबाबत मार्गदर्शन केले.संघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्यांना ठराविक लक्ष्य देण्यात आले असून, स्थानिक पदाधिकाऱ्यांनीही संघटनेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.यावेळी राज्य सचिव नितीन करडे, राज्य उपाध्यक्ष अमोलकुमार बोके यांच्यासह या बैठकीमध्ये इंटक संघटनेचे राज्य सचिव (महापारेषण) श्री नितीन करडे, राज्य उपाध्यक्ष अमोलकुमार बोके, हनुमंत भोम्बे ,किरणकुमार घाटोळ ,संजय म्हाला, सागर उघडे,प्रितेश पेटकर ,राहुल काळे,नामदेवराव जाधव,तन्मय राऊत,अक्षय गोरटे, आशिष पवार ,निलेश राठोड, संदीप राठोड ,श्याम पुनसे , प्रज्वल निघोट ,जयकुमार निघोट,नंदू झाडे अनेक पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

### श्री.संकट मोचन हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव



**अमरावती-**महेंद्र कॉलनी प्रभाग क्रमांक पाच मध्ये रोजी हनुमान जयंती निमित्त श्री पांढरी हनुमान मंदिर व गाडगेबाबा शाळेजवळ असलेले श्री संकट मोचन हनुमान मंदिर येथे परीसराताल सर्व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला या मध्ये श्री संकट मोचन हनुमान मंदिर यांचे अध्यक्ष राजू काळे व त्यांचे मित्र मंडळी व ज्येष्ठ नागरिक यांनी सहकार्य केले.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात ‘शाश्वत प्रगत भविष्य’ या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद

# प्रगत आणि शाश्वत विकासाची मूळ भाऊसाहेबांच्या कार्यकर्तृत्वामध्ये-हर्षवर्धन देशमुख

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथे ‘नवनिर्मिती आणि शाश्वत प्रगत भविष्य’ या विषयावर एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेत संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख यांच्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ पंजाबराव देशमुख यांच्या शाश्वत विकासाच्या उदाहरणातून सद्यस्थितीमध्ये असणारा बदल विशद केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी नमूद केले की,‘आधुनिक काळात केवळ प्रगती पुरेशी नाही, तर ती शाश्वत असणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना अशाच नाविन्यपूर्ण आणि बहुविद्याशाखीय विचारांकडे प्रवृत्त करणारे आहे.’राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे डॉ महेंद्र ढोरे यांनी आपल्या भाषणामध्ये नवनिर्मिती आणि शाश्वत विकास या संकल्पनेचे महत्त्व विशद केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या इनोवेशन सेंटरच्या डायरेक्टर डॉ स्वाती शेरेकर या परिषदेला बीजभाषक म्हणून उपस्थित होत्या. विविध महाविद्यालयातील तज्ज्ञ, प्राचार्य मीनल भोंडे, प्राचार्य डॉ कुलट, प्राचार्य डॉ गावंडे, प्राचार्य डॉ हांडे उपस्थित होते. बीजभाषण करताना डॉ स्वाती शेरेकर यांनी तंत्रज्ञान, पर्यावरण आणि मानव्य विद्याशाखा यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच शाश्वत भविष्य घडवता येईल, असा विश्वास व्यक्त केला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. त्या म्हणाल्या की, ‘संशोधकांनी केवळ ग्रंथालयापुरते मर्यादित न राहता समाजाच्या गरजा लक्षात घेऊन नवनवीन प्रयोग करणे आवश्यक आहे. ही परिषद विज्ञान, वाणिज्य आणि कला अशा सर्व शाखांना एकाच व्यासपीठावर आणून शाश्वत विकासाच्या वाटा शोधण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.’

परिषदेच्या विविध तांत्रिक सत्रांमध्ये १२० हून अधिक शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने हरित ऊर्जा, डिजिटल तंत्रज्ञान, शाश्वत शेती, आणि सामाजिक विकास या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

परिषदेच्या निमित्ताने एका स्मरणिकेचे विमोचनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.शेवटच्या सत्रात डॉ संजय खेर्डे यांनी उपस्थिताना सखोल मार्गदर्शन केले.

शिक्षक संशोधक या सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन संयोजन समितीद्वारे करण्यात आले. या परिषदेमुळे शैक्षणिक वर्तुळात एक वैचारिक ऊर्जा निर्माण होऊन संशोधकांना नवी दिशा मिळाली आहे.

## आठवडी बाजाराचा मुख्य रस्ता खड्ड्यात

**खल्लार-**दर्यापूर शहरातील आठवडी बाजार हा नागरिकांच्या दैनंदिन गरजांसाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो. मात्र या बाजाराकडे जाणारा मुख्य रस्ता सध्या पूर्णपणे खड्डेमय झाला असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांचीही मोठी गैरसोय होत आहे.विशेषत बाजाराच्या दिवशी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.

पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून परिस्थिती आणखी बिकट होते. तरीही संबंधित विभागाकडून या समस्येकडे पूर्णत दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांकडून अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही.

त्यामुळे संताप व्यक्त होत असून तात्काळ रस्ता दुरुस्तीची मागणी जोर धरत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे. सदर रस्त्याच्या मधोमध खड्डे निर्माण झाले असून त्यामधून दररोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत तरी या महत्त्वाकांक्षी बाबीची दखल घेऊन संबंधित विभागाने ताबडतोब रस्ता डागडुजी करावी

## पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे ‘Understanding Architecture through Practice’ या विषयावर एक मार्गदर्शक व प्रेरणादायी तज्ज्ञ व्याख्यानाचे आयोजन प्राचार्य संजय देशमूख यांच्या मार्गदर्शनाने व आर्किटेक्ट स्नेहल विधळे यांच्या सहकार्याने करण्यात आले.

या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. राम विघे यांनी केली. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले की आपले महाविद्यालय विध्यार्थ्यांकरिता वेगवेगळ्या विषयावर सतत मार्गदर्शन सत्र आयोजित करीत असते त्याचाच भाग म्हणून आज एक्स्पर्ट टॉक



आयोजित केला आहे.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आर्किटेक्ट आदिश मेहता यांनी आपल्या सादरीकरणातून आर्किटेक्चरमधील विविध प्रॅक्टिकल अनुभव, प्रोजेक्ट्स हाताळताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन केलत्यांनी विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, नवकल्पना आणि वास्तववादी दृष्टिकोन यांचा समतोल साधण्याचा सल्ला दिला.

तसेच, व्यावसायिक आयुष्यात यशस्वी होण्यासाठी सातत्याने शिकत राहणे किती गरजेचे आहे, यावर त्यांनी भर दिला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात प्रमुख वक्ते आर्किटेक्ट तेजस पाटील यांनी, प्रकल्पाची planning, ventilation, staircase arrangement, elevation , landscape, Aesthetic view इत्यादी आवश्यक बाबींवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी आर्च प्रथम वर्षाची विध्यार्थीनी सारा अलबीना यांनी उत्कृष्टरीत्या केले व संपूर्ण कार्यक्रम सुरळीत व प्रभावीपणे पार पाडला.कार्यक्रमाला प्रा. अमित घाडगे,प्रा. कीर्ती हिंगे,प्रा.पलाश अग्रवाल, प्रा.अंकुश खंडारे,प्रा.तृप्ती भामकर, प्रा.भूपेंद्र जयस्वाल, तसेच मोठ्या संख्येने विध्यार्थी व सर्व कार्यलयीन कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रहित सर्वोपरी ठेवत आपल्या वर्तनात आपणच बदल घडवू शकतो-चारुदत्त चौधरी



**अमरावती-** देशहित व आपले वैयक्तिक हित यात विरोधाभास न ठेवता देशहिताला अपेक्षित अशीच आपली उक्ती व कृती व्हावी असे महत्वपूर्ण प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांत सचिव डॉ. चारुदत्त चौधरी यांनी केले. ते ग्राहक पंचायत, अमरावती व आयुष आरोग्य वर्धिनी उपकेंद्र, नांदगाव पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला सक्षमीकारण व महिला योग प्रशिक्षिका यांच्या गौरव सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून आपले मत व्यक्त करत होते.

याप्रसंगी अध्यक्षास्थानी डॉ. शोभाताई गायकवाड, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा उपाध्यक्ष आशाताई दाभाडे,आरोग्य अधिकारी डॉ. संदीप शेंडगे, डॉ.ललिता मेश्राम, ग्राहक पंचायतचे महानगर अध्यक्ष प्रदीपजी सगणे उपस्थित होते विविध उदाहरणे देत चारुदत्त चौधरी पुढे म्हणाले की आपल्या वर्तनात सकारात्मक सुधार हा थोडया चिंतन मंथनानंतर नक्कीच होऊ शकतो. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. शोभा गायकवाड यांनी म्हटले की डॉ. मेघा ठाकरे व हा योगप्रकार सर्वदूर पसरवा यासाठी अत्यंत संघर्ष करणाऱ्या सर्व योग प्रशिक्षिका यांचे कार्य अत्यन्त प्रेरणादायी आहे. ग्राहक पंचायतीच्या लज्जागौरी या विभागाविषयी माहिती देताना त्या म्हणाल्या की योग्य देशरेखीखाली नियमित योग करत राहिल्यास सामान्य प्रसूती होऊन सीझरिंग करण्याची गरज शक्यतो पडत नाही. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप सगणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मेघा ठाकरे यांनी, स्वागत गीत ज्योती बावणे यांनी व आभारप्रदर्शन स्वाती लोंढे यांनी केले. या कार्यक्रमात सुशांत वांगे, शिवाजी कोकाटे, ज्योत्स्ना मातकर, निलीमा पाटील, रोशनी कळमकर, दक्षता मानकर, विजया रूपाने, साक्षी कांडलकर, पूनम बहोकार, कल्पना वासनकर यांचा त्यांनी निःस्वार्थ योगप्रचार प्रसार केल्याबद्दल व स्वाती लोंढे यांचा उत्कृष्ट योग कलात्मक रांगोळी बद्दल विशेष सत्कार करण्यात

## पदवीधर विद्यार्थ्यांसाठी ‘फ्रीलान्सिंग करिअर संधी’ या विषयावर मार्गदर्शनपर

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील युवकांच्या सर्वांगीण विकासाकरिता सुरु असणारा करिअर कट्टा हा उपक्रम. या उपक्रमाअंतर्गत राजर्षी शाहू सायन्स कॉलेज,चांदूर रेल्वे येथे पदवीधर विद्यार्थ्यांसाठी ‘फ्रीलान्सिंग करिअर संधी ’ या विषयावर मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले.

आजच्या AI युगात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना पर्यायी करिअर संधींचे महत्त्व लक्षात घेऊन हे सत्र विद्यार्थ्यांकरिता आयोजित



करण्यात आले होते. या सत्राचे आयोजन आणि मार्गदर्शन प्रा.ममता पळसपगार (करिअर कट्टा समन्वयक) यांनी केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शन सत्रात फ्रीलान्सिंगची मूलभूत संकल्पना, त्यातील विविध क्षेत्रे जसे की कंटेंट रायटिंग, ग्राफिक डिझाईन, वेब डेव्हलपमेंट, डिजिटल मार्केटिंग, डेटा एंट्री इत्यादींबाबत सविस्तर माहिती दिली.

तसेच Fiverr, Upwork, Freelancer यांसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे विद्यार्थी कसे काम मिळवू शकतात याचे मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांना फ्रीलान्सिंगसाठी आवश्यक असणारी कौशल्ये, वेळेचे नियोजन, क्लायंटशी संवाद साधण्याची पद्धत, स्वतःचा पोर्टफोलिओ तयार करणे आणि कामातील सातत्य राखण्याचे महत्त्व यावरही त्यांनी विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना ‘Learn, Earn and Grow’ या संकल्पनेचा अवलंब करून शिक्षणाबरोबरच आर्थिक स्वावलंबन साधण्याच्या दिशेने कशी वाटचाल करता येते यावर विशेष भर दिला. या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले.

अशा प्रकारचे उपक्रम आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांचे नेहमीच सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. सोबतच IQAC समन्वयक प्रा. एस. ए. वाणी आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांचे सुद्धा सहकार्य लाभले. महत्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे मार्गदर्शन सत्र पूर्णत्वास गेले.

## छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिवस साजरा

**खल्लार/वार्ताहर**

आजच्या या धावपळीच्या आयुष्यामध्ये स्वतःकडे व आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. कोरोनाच्या निमित्ताने सर्व समाजाला आरोग्याचे महत्व पटले आहे, परंतु तरी काही कारणास्तव आपण आरोग्याची तपासणी करण्याचे टाळतो. महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विद्यार्थीनी त्यांच्या आरोग्याकडे गांभिर्याने बघताना दिसून येत नाही. विशेष करून विद्यार्थीनी आपल्या अडचणी कोणालाच सांगत नाही.तसेच कर्मचारी यांचेही आरोग्य सुस्थितीत ठेवणे, हे महाविद्यालयाचे कर्तव्य आहे, यासर्व गोष्टीचा आढावा लक्षात घेता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब, गृहअर्थशास्त्र विभाग व प्राथमिक आरोग्य केन्द्र संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयातील कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यात ७९ विद्यार्थी व १५ कर्मचारी यांनी या शिबीराचा लाभ घेतला.शिबीरामध्ये सर्व कर्मचाऱ्यांचे तसेच विद्यार्थ्यांचे वजन, उंची, रक्तदाब, शुगर लेव्हल, ऑक्सीजन लेव्हल, नाडी, रक्तगट इ. तपासण्यात आले तसेच आरोग्याबाबत घ्यावयाची काळजी व एच. पी. व्ही. लसीकरण या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. रविंद्र इचे , प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संदेश तायडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शरीरात होणारे बदल व त्यावरील उपाययोजना यावर मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची तपासणी करून रोगनिदानाअंती उपचार सुचविले, प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगाव पूर्णा येथिल वैद्यकीय अधिकारी डॉ. घोडेस्वार, डॉ. पारणकर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ नितेश डहाके, सुनिल दिवान, श्रीमती मंगला पडोळे यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आशिष काळे यांनी केले, प्रास्ताविकातून कार्यक्रमामागची भूमिका व उद्देश क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरीश काळे यांनी मांडली तर प्रा. डॉ. भारत कल्याणकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात पुण्यतिथी व अखंड नामजपयज्ञ सप्ताह

**अमरावती-** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित आरोग्यसेवा कॉलनी रहाटगाव अमरावती येथे ९ एप्रिल पासून श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व अखंड नामजप यज्ञ सप्ताहाला सुरवात होणार आहे. सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ७ ते ९ गुरुचरित्र वाचनास सुरुवात होईल. सकाळी ७-३० ते ८ औदुंबर प्रदक्षिणा,यज्ञ मंडपातील रोजचे कम. सकाळी ८ वा. भूपाळी आरती, १ माळ श्री स्वामी समर्थ सामुदायिक नाम जप. सकाळी ८. १० ते १०.२५ नित्य स्वाहाकार, श्री स्वामी समर्थ महाराजांचे मूर्तीचे पूजन व अभिषेक.सकाळी १०.३० वाजता नैवेद्य आरती ( मंत्र पुष्पांजली सह होईल) सकाळी १०.४५ ते दुपारी १२ पर्यंत दुर्गा सप्तशती व स्वामी सारा मृताचे पारायण, दुपारी ३ ते ५ प्रश्नोत्तरे, हस्तरेषा,जन्म कुंडली पाहणे, प्रश्न सोडवणे,वास्तुशास्त्रावर मार्गदर्शन होईल. दुपारी २ ते ५.३० ला सांस्कृतिक कार्यक्रम ,गीताई मनाचे श्लोक वाचन होईल. सायंकाळी ५.३० ते ६ औदुंबर प्रदक्षिणा सायंकाळी ६ .३०वाजता आरती ,व मार्गदर्शन होईल. सायंकाळी ७ वाजता सायंकाळची नित्यसेवा, गीतेचा १५ वा अध्याय विष्णुसहस्त्रनाम रामरक्षा वाचन होईल. सप्ताहातील कार्यक्रम बुधवार दिनांक ८ एप्रिल रोजी ग्रामदेवता



सन्मान मंडळ मांडणी, ९ एप्रिल ला मंडप स्थापना, अग्निस्थापना,स्थापित देवता हवन होईल. १० एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार, गणेश याग व मनोबोध याग.११ एप्रिल रोजी नित्यस्वाहाकार,रुद्र याग ,मल्हार याग १२ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार, स्वामी याग. १३ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार,गीताई याग, विष्णू याग १४ एप्रिल रोजी नित्य स्वाहाकार, चँडीयाग.१५ एप्रिल रोजी नित्यस्वाहाकार,श्री सत्यदत्त पूजन, व सांगता समारोह अलंकार यज्ञाद्वारे अर्पण केले जाईल व सत्यदत्त पूजनानंतर पुरणाच्या दिव्याची महाआरती, यज्ञाला नारळ अर्पण व भव्य काला होईल तरी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व अखंड नामजप यज्ञ सप्ताहात भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वस्त मंडळी कडून करण्यात आले आहे.

# शालेय शिक्षणमंत्र्यांकडे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केल्या विविध मागण्या

**अमरावती/का.प्र.**

राज्यपदाधिकारी यांच्या समवेत वेळ, दिनांक मिळावी यासाठी ७ एप्रिलला मंत्रालय मुंबई येथे शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांची भेट घेतली असता त्यांनी आश्वासित केले तसेच नाशिक जिल्ह्यातील व महाराष्ट्र राज्यातील समायोजन, अगोदर शासन निर्णयानुसार प्रथम पदोन्नती नंतर समायोजन त्यानंतर बदली करण्यात येणार असे सुचना शिक्षणमंत्री यांनी दिल्या या प्रसंगी शिक्षक नेते उदय शिंदे,माजी राज्याध्यक्ष काळुजी बापु बोरसे पाटील,राज्याध्यक्ष विजय कोंबें,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांचे या कामी मार्गदर्शन लाभले भेटी प्रसंगी राज्य उपाध्यक्ष आनंदा दादा कांदळकर, सुनिल दादा भामरे विभागीय अध्यक्ष,जिभाऊ तात्या बच्छाव,जिल्हाध्यक्ष नाशिक,अनिल गडाख शिक्षक नेते शिक्षक समिती सिन्नर उपस्थित होते अशी माहीती राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थी व शिक्षकांच्या विविध मागण्या प्रदीर्घकाळ प्रलंबित आहेत. या मागण्यांच्या सोडवणुकीसाठी शासन स्तरावर चर्चा होणे आवश्यक आहे.त्या माध्यमातून मागण्यांच्या निरसनाचा मार्ग प्रशस्त होईल असा शिक्षक समितीचा विश्वास आहे.प्रलंबित मागण्या मध्ये संचमान्यता शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ रद्द करणे.TET अर्हता परीक्षेतून २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना सुट देणे.

शिक्षण सेवक पद रद्द करणे. केंद्र सरकारच्या शाळांतील शिक्षकांप्रमाणे विनाअट



निवड श्रेणी लागू करणे अथवा १०-२०-३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे.पवित्र पोर्टल ने भरतीपूर्वी आंतरजिल्हा बदलीचा टप्पा राबविणे.जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या मुख्यालयी राहण्याबाबतचे शासन निर्णय रद्द करणे, सर्व विषय पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे, नपा/मनपा शिक्षकांसाठी स्वतंत्र वेतन पथक गठित करून शासनाकडून १००% अनुदान देणे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत स्वाध्याय पुस्तिका देणे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्याध्यर्थ्यांसाठी डेक्स-बेंच आणि आसन पट्ट्या पुरविणे,मुख्याध्यापक-शिक्षकांना दिल्या जाणारी विविध प्रकारच्या ऑनलाइन ऑफलाईन दैनंदिन अध्यापनावर विपरीत परिणाम करणारी शैक्षणिक व अशैक्षणिक कामे बंद करणे.

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ग्रामीण भागातील कॉन्व्हेंट मधून बसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी शिष्यवृत्ती परीक्षेचेय धर्तीवर ठरविणे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये इमारत आणि शौचालये स्वच्छतागृह सफाईसाठी व्यवस्था निर्माण करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी दर तीन महिन्यांनी संघटना समन्वय बैठक आयोजित करणे. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ आदेश व मा. सर्वोच्च न्यायालयातून राज्य शासनाने मागे घेतलेल्या याचिकेनंतर राज्य शासनाने घेतलेल्या दि. २२ जून २००७ च्या निर्णयानुसार विदर्भातील शाळा सुरु करण्याचा निर्णय कायम ठेवणे आणि २६ जून पासूनच शाळा सुरु करणे,यासह अन्य महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी आपण आपल्या अत्यंत व्यस्ततेतून सवड अमूल्य वेळ द्यावा आणि नियोजित सभेसाठी शालेय शिक्षण, ग्राम विकास, नगर विकास व अर्थ विभागाच्या संबंधित अधिकारी उपस्थित ठेवावे अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने विनंती केली आहे.

गाजीपूरात खाणमाफियांचा हैदोस

# ‘भूदान’च्या जमिनीवर हजारो ब्रास गौण खनिजाचे ‘संतोष’जनक उत्खनन

## परवाने, रॉयल्टी संशयाच्या भोवऱ्यात; महसूल प्रशासनाची अर्थपूर्ण डोळेझाक

**समीर ठाकूर**

**अकोलाः** अकोट तालुक्यातील गाजीपूर येथे खाणमाफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून ‘भूदान’ चळवळीतून शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनीवरच हजारो ब्रास गौण खानिजाचे ’संतोष’जनक उत्खनन सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रकरणात महसूल प्रशासनाचा भोंगळ आणि संशयास्पद कारभार उघडकीस येत असून, संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. प्रत्यक्ष स्थळ पाहणीदरम्यान मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक ५२/२ या जमिनीवर मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू असल्याचे दिसून आले. ही जमीन मूळतः भूदान यज्ञ मंडळामार्फत शेतीसाठी देण्यात आली होती. मात्र, २००९ मध्ये या जमिनीचा काही भाग ‘पोटखराब’ दाखवून बेकायदेशीररीत्या वाणिज्यिक वापरासाठी अकृषक करण्यात आला. याच निर्णयाच्या आडून खाणमाफियांनी संधी साधत मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या जमिनीच्या ७/१२ आणि नमुना ८ वर मालक म्हणून उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांचे नाव नोंदविलेले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय किंवा माहितीशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन होणे शक्यच नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. भूदान यज्ञ मंडळाची परवानगी घेण्यात आली का? तत्कालीन महसूल अधिकाऱ्यांची मान्यता होती का? या सर्व प्रश्नांची उत्तरे मात्र अद्याप मिळालेली नाहीत.

दरम्यान, खाणकाम, पर्यावरण आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक परवानग्या न घेता थेट तात्पुरते उत्खनन परवाने देण्यात आल्याची चर्चा खुद्द महसूल विभागाच्या असंतुष्ट कर्मचारी वर्गात रंगली आहे. तहसील कार्यालयाकडून रॉयल्टी स्वीकारून या उत्खननाला मोकळीक देण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पट्टेधारक ‘बळीचा बकरा’?

गट क्रमांक ५२/२ चे पट्टेधारक महादेव भोई बेलसरे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यानेच त्यांना भूदान यज्ञातून जमीन देण्यात आली होती. मात्र सध्या सुरू असलेल्या कोट्यवधींच्या उत्खननाशी त्यांचा थेट संबंध असणे अशक्य मानले जात आहे. यामागे मोठा खाणमाफिया सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

यासाठी बेलसरे यांच्या बँक खात्याचा तपशील तपासल्यास रॉयल्टी व परवान्यांसाठी निधी कुठून आला, याचा उलगडा होऊन या घोटाळ्यामागील खरे सूत्रधार समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### २२ हजार ब्रास परवानगी; ६० हजार ब्रास अतिरिक्त उत्खनन!

या गटावर २०२४ पर्यंत तब्बल २२,२०० ब्रास उत्खननाचे परवाने देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष मोजमापात ६० हजार ब्रासपेक्षा अधिक अतिरिक्त उत्खनन झाल्याचे उघड झाले आहे. एवढी मोठी तफावत असूनही कारवाईचा ठोस अभाव दिसून येत आहे. उलट आजही तात्पुरत्या परवान्यांच्या नावाखाली उत्खनन सुरूच असल्याची धक्कादायक माहिती आहे.

### प्रशासन झोपेत, माफियांचा धुमाकूळ

गाजीपूरमध्ये सुरू असलेल्या या प्रकारामुळे महसूल विभाग, खाणकाम विभाग आणि पर्यावरण यंत्रणा यांच्यात समन्वयाचा पूर्णपणे अभाव की अर्थपूर्ण संगनमताचा बनाव ? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तर प्रशासन कुंभकर्णी झोपेत असताना खाणमाफिया मात्र निर्धास्तपणे कोट्यवधींचा माल उपसत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची नितांत गरज आता निर्माण झाली आहे.

### खाणकाम आराखड्यात समावेशच नाही?

गट क्रमांक ५२/२ चा जिल्हा खाणकाम आराखड्यात समावेश आहे की नाही, याबाबतही संभ्रम आहे. जर समावेश नसेल, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन कसे सुरू आहे? आणि जर समावेश असेल, तर कोणत्या अटींवर? या प्रक्रियेत ‘चिरीमिरी’चा खेळ झाला का, असा संशय व्यक्त होत आहे.

# खाण परवानग्यांचे अधिकार आता थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे

## परवानगी नियमात आवश्यक ते बदल करण्यात येणार

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मोठा निर्णय



**मुंबई/प्रतिनिधीः-** राज्यभरात मोठ्या प्रमाणावर होत असलेले अवैध उत्खनन आणि नियमबाह्य स्टोन क्रशरवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य सरकारने मोठा प्रशासकीय बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ५०० ते २००० ब्रासपर्यंतच्या खाणकामासाठी दिल्या जाणाऱ्या परवानग्यांचे अधिकार आता स्थानिक स्तरावर न ठेवता, ते थेट जिल्हाधिकारी स्तरावर सोपविण्यात येणार आहे. यासाठी नियमामध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत याबाबत लक्षवेधी मांडली होती. त्या अनुषंगाने मंत्रालयात महसूल मंत्र्यांच्या दालनात ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील विषयांच्या अनुषंगाने पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे कनिष्ठ स्तरावरील अधिकारी आणि खाण व्यावसायिक यांच्यातील गैरप्रकारांना चाप बसणार असून संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. या बैठकीला ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाल, पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड आणि रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्यासह महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली स्वतंत्र 'सेल' -** यापूर्वी कमी क्षमतेच्या (५०० ते २००० ब्रास) उत्खननासाठी ☞(पान २ वर)

# ड्रग्स प्रकरणातील मुख्य आरोपींना पोलीस कोठडी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात गाजत असलेल्या ३.३० कोटी रुपयांच्या एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स प्रकरणात अमरावती पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत मुख्य आरोपींना अटक केली आहे. राजस्थान येथून ताब्यात घेऊन आणलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.या प्रकरणातील आरोपी विष्णू उर्फ विजय मोहनलाल गायरी (ड्रग्स फॅक्टरी संचालक) याला १२ एप्रिलपर्यंत तर त्याचा साथीदार मांगीलाल सिंघावत (राजस्थान) याला १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या कोठडीदरम्यान पोलिसांकडून सखोल चौकशी करून संपूर्ण ड्रग्स रॅकेटचा तपास केला जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती गुन्हे शाखेने सुमारे एक महिन्यापूर्वी शहरात ३.३० कोटी रुपयांचा एमडी ☞(पान २ वर)

# महावितरण डीपीला भीषण आग

## कार जळाली

### बसस्थानक मार्गावरील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बसस्थानक रोडवरील उस्मानिया मशिदीजवळ बुधवारी दि. ८ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास महावितरणच्या डीपीला अचानक आग लागून मोठी धावपळ उडाली. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, डीपीजवळ साचलेल्या कचऱ्यामुळे आग भडकली आणि त्याने ट्रान्सफॉर्मरला वेढा घातला. आगीच्या ज्वाळा उसळताच शेजारी उभी असलेली टाटा पंच (एमएच २७ डीएल ६१५८) ही कारही आगीच्या विळख्यात सापडली. या घटनेत कारचे टायर जळून मोठे नुकसान झाले. आगीमुळे बसस्थानक रोडवरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. धूर आणि ज्वाळांमुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसताच नागरिकांनी तात्काळ अग्निशमन दलाला कळविले. माहिती मिळताच अमरावती महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे पथक अवघ्या दोन मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. चालक सारंग राठोड, राजू शेंडे, लिडिंग फायरमन विशाल भगत आणि फायरमन प्रशांत गोळे यांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. विद्युत प्रवाह सुरू असल्याने तातडीने महावितरण कंट्रोल रूमला कळविण्यात आले आणि पुरवठा खंडित करून आग आटोक्यात आणण्यात आली. या घटनेत महावितरणची डीपी पूर्णपणे जळून खाक झाली असून परिसरातील ☞(पान २ वर)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी कडक बंदोबस्त

### प्रक्षोभक पोस्टवर सायबर पोलिसांची ‘नजर’



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात शांतता आणि सौहार्द अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक तयारी सुरू केली आहे. ८ एप्रिल रोजी पोलीस आयुक्त कार्यालयात आयुक्त राकेश ओला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. ‘उत्सवाच्या काळात सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची खैर केली जाणार नाही,’ असा स्पष्ट इशारा आयुक्तांनी दिला.

उत्साहाच्या भरात कायदा हातात घेणाऱ्या तरुणांबाबत चिंता व्यक्त ☞(पान २ वर)

# धमकी देत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### वरुडमध्ये संतापाची लाट



**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड तालुक्यातील एका धक्कादायक घटनेने पुन्हा एकदा कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. धमकी देत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना बुधवारी उघडकीस आली असून, यामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पीडित मुलगी घरासमोर उभी असताना आरोपी कन्हैय्या गजानन कलाने (वय २०) याने तिला डॅमवर भेटण्यासाठी जबरदस्तीने बोलावले. ‘तू आली नाहीस तर तुझ्या आई-वडिलांना तू कोणाशी बोलतेस, कुणाला भेटतेस हे सर्व सांगून टाकेन,’ अशी धमकी देत त्याने मुलीवर मानसिक दबाव टाकला. भीतीपोटी मुलगी त्याला भेटायला गेली असता, आरोपीने ☞(पान २ वर)

# लाच घेताना महावितरणचा सहाय्यक अभियंता जेरबंद

### धारणीत एसीबीची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** धारणी येथील महावितरण कार्यालयातील सहाय्यक अभियंता सुशांत हरिदास बावनगडे (वय ४५) यांना ४,००० रुपयांची लाच स्वीकारताना अँटी करप्शन ब्युरोने रंगेहात पकडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून भ्रष्टाचाराविरोधातील लढ्याला बळ मिळाले आहे.

तक्रारदार हे सोलर पॅनल बसविण्याचा व्यवसाय करतात. त्यांनी ग्राहकांच्या सोलर मीटर रिलिज ऑर्डरसाठी महावितरण कार्यालयात अर्ज केले होते. मात्र, या कामासाठा ☞(पान २ वर)

### अचलपूर नगरपालिकेची कर वसुलीत ऐतिहासिक झेप

# मार्चअखेर तब्बल १० कोटी रुपयांची तिजोरीत भर

### नगराध्यक्षा रूपाली माथने यांच्या नेतृत्वाने गाठली यशाची शिखरे!’



**अचलपूर/प्रतिनिधीः-** आर्थिक वर्षाच्या अखेरीस अचलपूर नगरपालिकेने कर वसुलीत ऐतिहासिक झेप घेत मार्चअखेर तब्बल १० कोटी रुपयांची भर तिजोरीत टाकली आहे. अनेक वर्षे कर वसुलीत पिछाडीवर असलेल्या पालिकेसाठी हे यश उल्लेखनीय ठरले असून, यामागे नगराध्यक्षा रूपाली माथने यांचे नेतृत्व, प्रशासनाची विशेष मोहीम आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली घरपट्टी, पाणीकर, व्यावसायिक गाळे भाडे यांची कोट्यवधींची थकबाकी वसूल करण्यासाठी यंदा नगरपालिकेने विशेष अभियान ☞(पान २ वर)

# स्मशानभूमीत झाडाला गळफास

### -आत्महत्या की घातपात याबाबत संशय

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शहरातील संन्यासपेंड परिसरातील स्मशानभूमीत बुधवारी (दि.८) एका इसमाचा झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आत्महत्या की घातपात याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.



मृत इसमाचे नाव विजय किसनराव वाघमारे (वय ४५, रा. बिलनपूरा, अचलपूर) असे आहे. ते आपल्या कुटुंबापासून विभक्त राहात होते. पत्नीही वेगळी राहत असल्याची माहिती समोर आली आहे. वाघमारे हे एकटेच वास्तव्यास होते.

घटनेची माहिती मिळताच अचलपूर पोलिसांनी ☞(पान २ वर)

### शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्टता

‘प्राथमिक पाहणीत घातपाताचे ठोस पुरावे आढळले नाहीत. मात्र शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होईल.’
**-गजानन मेहत्रे,** पोलीस निरीक्षक- पोलीस स्टेशन अचलपूर

# तरुणीला लॉजमध्ये डांबून विनयभंग



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नांदगाव पेठ परिसरात एका १९ वर्षीय तरुणीचा पाठलाग करून, मारहाण आणि ब्लॅकमेलिंग केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने तरुणीला धमकावत लॉजमध्ये डांबून ठेवल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, ६ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास रहाटगाव बायपास रोड परिसरात ही घटना घडली. पीडित तरुणी एकटी असताना आरोपी हर्ष उर्फ सामित नारायण भुसुम (वय १९, रा. परतवाडा) याने तिचा पाठलाग सुरू केला. काही अंतरावर तिची दुचाकी अडवून ☞(पान २ वर)

# नवीन महा-ई-सेवा केंद्राला मंजुरी देऊ नका

### आधार केंद्र संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यामध्ये नवीन महा-ई-सेवा केंद्राला मंजुरी देण्यात येऊ नये, अशी मागणी अखिलस्तरीय महा-ई-सेवा व आधार केंद्र संघटनेच्या वतीने आज बुधवार ८ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की ई सेवा केंद्र संदर्भात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ येथे रीट प्रकरण दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये शासनाने नवीन सेंटर मंजूर करू नये हा मुद्दा समाविष्ट आहे. संदर्भ ☞(पान २ वर)

# १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन सोहळा

### प्रसिध्द वक्ते संजय आवटे यांचे व्याख्यान



**अमरावती/प्रतिनिधीः-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्यीकरण समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात येत आहे. सर्वपक्षीय अभिवादन सोहळा १४ एप्रिल रोजी सकाळी साडेनऊ वाजता इरविन चौकात होणार आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी व सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने प्रसिद्ध विचारवंत व वक्ते संजय आवटे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आज बुधवार ८ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेमध्ये ☞(पान २ वर)

# रेल्वे पोलिसांनी दुचाकी चोरट्याला घेतले ताब्यात

### बडनेरा येथील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा रेल्वे स्टेशनच्या पार्किंग मधून दुचाकी चोरणाऱ्याला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून चोरीची दुचाकी बजाज सिटी १०० जप्त करण्यात आली आहे. अक्षय संजय गवई (वय २९, रा.जय श्रीराम नगर ) असे अटक आरोपीचे नाव आहे. माहिती नुसार बडनेरा रेल्वे स्टेशन येथील बुकिंग क्लार्क रुपेश बागडे यांची बजाज सिटी १०० मोटरसायकल ३१ मार्च रोजी पार्किंग मधून चोरी गेली होती. या प्रकरणात रेल्वे पोलिसांनी तपास करून आरोपी अक्षय संजय गवई (वय २९, जय श्रीराम ☞(पान २ वर)